Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

66 म
२१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या..... 665/71

पञ्जिका संख्या.....

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

गुरुकुल पुस्तकालय
का सस्नेह भेंट
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र वाचनमाला

२८-११-५३

इयत्ता ५ वी

२८२१४
१५-८-५४

ओ३म्
यह पुस्तक श्री पं. वेदकुमारजी शास्त्री
गुरुकुल निवासी की ओर से गुरुकुल
पुस्तकालय को भेंट में प्राप्त हुई।

CHECKED 1973

प्रकाशक .....

केमकर आणि मंडळी, मुंबई ४

[सर्व हक्क प्रकाशकाधीन]

६६५/९९
स्टाक प्रमाणित १९८४-१९८५

आवृत्ति १ ली] [सन १९५०

किंमत १-२-०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशकांचें निवेदन

प्राथमिक व दुय्यम शाळांतील भाषाशिक्षणासाठीं सध्या सहासात माला चालू असतांना ह्या नव्या 'महाराष्ट्रवाचनमालेची' भर त्यांत कशाला, असा प्रश्न कित्येकांच्या मनांत येणें साहजिक आहे. याचें उत्तर असें आहे कीं, शिक्षणाचें क्षेत्र यापुढें झपाट्यानें वाढणार आहे व लोकांची रुचि भिन्न भिन्न असते, ती पुरी करण्यासाठीं अशा प्रकारच्या अनेक माला निघणें अवश्य आहे. तींच तीं पुस्तकें शिकवून शिक्षकांना कंटाळा येतो व त्यांच्या शिक्षणांत जिवंतपणा राहत नाहीं असा अनुभव येतो. रोजच्या अन्नांतील गोडी भिन्न रुचि होण्यानेंच राहते तसेंच वाङ्मयाचेंहि आहे. वाङ्मयांतील विचार, कल्पना व भावना इत्यादि कांहीं वारंवार पालटत नसतात; तर त्या व्यक्त करण्याची शैली किंवा पद्धति मात्र वारंवार पालटत असते. त्यामुळें नवीनपणाचा भास होतो व वाचनाची इच्छा कायम राहते; तेव्हां रुचिभिन्नतेची आवड लक्षांत घेऊन ही माला काढण्यास आम्ही प्रवृत्त झालों आहों.

दोन तीन वर्षांपूर्वी आपण परतंत्र्यांत होतों; त्यामुळें शिक्षणखात्याला सरकारी धोरणाकडे पाहूनच पुस्तकांतील विषयांकडे–विचार-भावनांकडे पाहणें भाग पडे. ही अयोग्य मर्यादा किंवा हें दडपण स्वातंत्र्यलाभामुळें आतां राहिलेलें नाहीं. भावी पिढी स्वतंत्र भारतांतील नागरिक व्हावयाची आहे, हें मनापुढें वागवून तिला योग्य असेंच वाङ्मय पुरविणें अगत्याचें आहे. स्वतंत्र देशांतील नागरिक हा नुसता स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा ह्यांचाच अभिमानी असून भागणार नाहीं; मानवधर्माचीहि ओळख त्याला तारुण्याच्या द्वारांत प्रवेश करीत असल्यापासूनच झाली पाहिजे, हेंहि उद्दिष्ट आमच्यापुढें आहे.

वाङ्मयाच्या अभ्यासापासून आनंद मिळावा हा प्रमुख हेतु असला तरी हा आनंद सात्त्विक, पौष्टिक व श्रेयस्करहि असला पाहिजे, हा आमचा कटाक्ष आहे. वाङ्मयापासून होणाऱ्या आनंदाला 'विद्यानंद' असें नांव देतां यावें, असें आम्हांस वाटतें. ही दृष्टि ठेवूनच आम्ही वेंच्यांची निवड केली आहे.

सरकारचें व्यापक धोरण संभाळलें आहे हें तर स्पष्टच आहे. वाङ्मयाच्या सर्व प्रकारांची ओळख या मालेवरून होईल; तशीच अखिल महाराष्ट्रांतील वाङ्मयभक्तांच्या लेखनाचीहि ओळख व्हावी ही ह्यापुढची आवश्यक पायरी ध्यानांत घेतलेली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरुषलेखकांबरोबर स्त्रीलेखिकांनींहि वाङ्मयांत कशी योग्य भर घातलेली आहे हें या मालेंतील वेंच्यांवरून मुलांमुलींच्या ध्यानांत यावें अशी योजना मुद्दाम केली आहे.

स्वातंत्र्यावरोवर समता व बंधुता यांचा परिपोष होणें आवश्यक आहे हें लक्षांत घेऊन गद्य व पद्य यांची निवड केली आहे हेंहि सांगणें आवश्यक आहे.

घेतलेल्या उताऱ्यांची व त्यांच्या लेखकांची ओळख आम्ही जरुरीपुरती व महत्त्वाची अशीच दिली आहे. अभ्यासासाठींहि निवडक प्रश्न दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळावी, त्यांनीं स्वतःच्या बुद्धीनें विचार करावा ही दृष्टि, हे प्रश्न देतांना व रसग्रहणाचें मार्गदर्शन करितांना ठेवलेली आहे.

पुष्कळ प्रश्न देऊन शिक्षकांच्या स्वतंत्र बुद्धीला व कौशल्याला मर्यादा मुद्दाम घातलेली नाहीं ! दिवसेंदिवस शिक्षकवर्ग हा मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र व पद्धति यांत जाणताच होऊन आलेला असणार, तेव्हां शिक्षकानें स्वतःच्या बुद्धीनें प्रश्न वगैरे तयार केले म्हणजे विद्यार्थ्यांना आपल्या गुरूच्या ज्ञानाची, कौशल्याची व पद्धतीची जिवंत ओळख होऊन योग्य तो आदर त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होतो व तो तसा उत्पन्न होणें हें शिक्षण योग्य होण्याच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त आहे असें वाटतें, म्हणूनहि या बाबतींत हात आंखडता घेतलेला आहे, हें सांगणें आवश्यक वाटतें.

शब्दाचा निश्चित अर्थ शोधून काढण्याचा किंवा शिक्षकांनीं सांगितलेले अर्थ लिहून घेऊन लक्ष्यांत ठेवण्याचा प्रयत्न विद्यार्थी बहुधा करीतच नाहींत; त्यामुळें भाषेंतील खरें मर्म, सौंदर्य व अर्थ त्यांस कळत नाहीं असा आमच्या शिक्षकबंधूंचा अलीकडील अनुभव आहे; तो लक्षांत घेऊन कित्येक गद्यपाठांवरील शब्दांचे अर्थहि आम्हीं मुद्दाम दिले आहेत. त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांकडून अगत्यानें करवावा.

वेंच्यांची निवड करतांना पुढील गोष्टीहि साधण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

(१) उताऱ्यावरून वाङ्मयाचें कलात्मक स्वरूप समजावें.

(२) भाषाशैलीच्या दृष्टीनें शिकण्यासारखें अधिक असावें.

(३) कल्पना, विचार व भाषा यांची मांडणी विद्यार्थ्यांचें वय व बुद्धि हीं लक्षांत घेऊन असावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(४) विद्यार्थ्यांची विचारशक्ति व भावना ह्या व्यापक व शुद्ध व्हाव्या असा उतारा असावा.

(५) विद्यार्थ्यांची मनोवृत्ति समाजोन्मुख व राष्ट्रोन्मुख व्हावी; समाजांतील विषमता कमी व्हावी, ही दृष्टि यावी.

(६) उताऱ्यापासून निघणारा निष्कर्ष, ध्वनि किंवा बोध हीं नीतीला पोषकच असावीं.

(७) उतारा स्वयंपूर्ण असावा.

ह्या सर्व गोष्टी कितपत साधलेल्या आहेत हें शिक्षकांनीं ठरवावयाचें आहे, म्हणून या मालेंतील पुस्तकांचा उपयोग आपापल्या शाळांतून करणाऱ्या शिक्षक–बंधुभगिनींनीं आपले अनुभव व सूचना आम्हांला वेळोवेळीं कळवीत जाव्या अशी विनंति आहे.

शेवटीं ज्या लेखकांच्या व कवींच्या गद्य-पद्य उताऱ्यांचा वा लेखांचा व कवितांचा ही माला सजविण्याच्या कामीं उपयोग झाला त्यांचे व ज्यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन या मालेचें संपादकीय काम आस्थेनें केलें त्यांचे मनःपूर्वक आभार मानून हें अल्प निवेदन पुरें करतों.

प्रकाशक :—**श्रीकृष्ण दामोदर कुलकर्णी,**
माधव पुरुषोत्तम कुलकर्णी, बी. ए.
केमकर आणि मंडळी, बुकसेलर्स, पब्लिशर्स व स्टेशनर्स,
विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४.

मुद्रक :—**र. रा. बखले,** मुंबई वैभव प्रेस, सँडहर्स्ट रोड, गिरगांव मुंबई ४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

——×——

		पृष्ठ
१	पाया खंबीर पाहिजे, ना. ह. आपटे	१
२	ईश्वराचें दयालुत्व, वि. दा. सावरकर	६
३	नदीचें गाणें, (कविता) शांताराम आठवले ...	९
४	शांतिदूत शन्, शं. धों. सार्दळ	११
५	बुद्धिर्यस्य बलं तस्य, के. ग. अलूरकर... ...	१७
६	न्याहरी, (कविता) ग. ल. ठोकळ	२६
७	आर्य लोकांचें हिंदुस्थानांत आगमन	२९
८	हास्यकथा, प्र. के. अत्रे	३३
९	चिमा, (कविता) वि. ज. करंदीकर	३८
१०	तानाजीचें प्रसंगावधान	४०
११	म्हाताऱ्यांचें गांव, वि. द. घाटे	४५
१२	दीपगृह, (कविता) काशीताई नाटेकर	५३
१३	पाहुणे व पाहुणचार, कॅ. गो. गं. लिमये ...	५५
१४	स्वामी विवेकानंद यांचें एक पत्र	६०
१५	घाल घाल पिंगा वाऱ्या ! (कविता) कृ. ब. निकुंब	६४
१६	प्रायश्चित्तानें नवा जन्म, गो. स. सरदेसाई ...	६६
१७	सारनाथ, गो. चि. भाटे	७४
१८	देवाचें चिंतन, (कविता) तुकाराम	७९
१९	राष्ट्रमाता कस्तुरबा	८१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२० शंभर वर्षांपूर्वींचें स्वप्न, विष्णुबुवा ब्रह्मचारी ... ८८
२१ भलऽरी, (कविता) गिरीश ९१
२२ सीतेचा रावणास उपदेश, चिं. वि. वैद्य ... ९३
२३ दगडी कोळशाची खाण, म. शि. गोळे ... ९८
२४ जगीं गरिबांचे कोणि नाहिं वाली ! (कविता) वा. गो. मायदेव ... १०१
२५ मुंबईचा सिंह, अ. वा. मराठे १०४
२६ पाडशी म्हैस, वि. ल. वर्वे ११०
२७ धर्माचेंच रक्षण करतों ! (कविता) मोरोपंत ... १२२
२८ प्रियकर गेला नि रुमालही गेला ! १२६
२९ आंगळ्याचा प्रताप, रामतनय १२९
३० हिंवाळा, (कविता) अनिल १४०
३१ मास्टर कृष्णाचें गायन, वा. वा. फाटक ... १४२
३२ तिबेटच्या स्वतंत्र वनिता, सौ. मालतीबाई दांडेकर... १५३
३३ घनश्याम सुंदरा-(कविता) होनाजी बाळा ... १६१
३४ जळाविण मासा, ज. नो. कर्वे १६४
३५ पहाटे निजणाऱ्या मुलांस, (कविता) श्री. वा. गाडगीळ १७०
३६ न्यायालयाची प्रतिष्ठा, शिवराम वाशीकर ... १७२
३७ आधुनिक मनाचे श्लोक, (कविता) १७८
३८ व्यसन, ना. म. ताम्हनकर १८०
३९ दारुड्याचें जीवन, (कविता) रामभाऊ भोगे ... १८७
४० नन्दिनीचा प्रकोप, स. रा. नारगोलकर ... १८८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामुदायिक प्रार्थना

665
97.

(१)

या कुन्देंदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥

(२)

व्हावी इच्छा सकलांचीच एक,
सर्वत्रांचीं हृदयें एक व्हावीं,
सर्वत्रांचें मन तें एक होवो
ज्या योगें संघटना, श्रीहि लाभे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्रगीत

(राम गणेश गडकरी)

मंगलदेशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा !
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा,
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा,
अंजन कांचन करवंदाच्या कांटेरी देशा,
बकुळफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा,
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा,
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा,
ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी, नाच तें करी
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि वैराग्यासी
जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकाचि देशा,
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा.
भिन्नवृत्तिचीं, भिन्न भिन्न हीं एक जीव सत्त्वें.
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवसत्त्वें.
चित्पावनबुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी
देशस्थांच्या खुल्या दिलांची तुजला दिलदारी.
कायस्थांचें इमान फिरवी रक्ताचा फेर,
ठाक मराठा मनगट दावी तुझें हाडपेर.
ध्येय जें तुझ्या अंतरीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र वाचनमाला

इयत्ता ५ वी

१ पाया खंबीर पाहिजे

परिचय

श्री. नारायण हरी आपटे हे अल्पवयांतच लेखन व्यवसायांत पडलेले गृहस्थ आहेत. कादंबरी, लघुकथा, बोलपटकथा इत्यादि वाङ्मयप्रकार ते सारख्याच कुशलतेनें हाताळतात. यांची भाषा साधी, सोपी व प्रासादिक असते. 'कुंकू' या प्रसिद्ध बोलपटाचें कथानक त्यांनींच लिहिलेलें आहे. पुढील उतारा त्यांच्या 'आयुष्याचा पाया' यांतून घेतला आहे.

[इमारत जितकी मोठी तितका तिचा पाया खोल व मजबूत असावा लागतो. जगांत मोठेपणा प्राप्त करून घेऊं इच्छिणाऱ्यांनाही हाच न्याय लागू आहे. विद्यार्थीदशा हा या महान् आयुष्याचा पाया होय. तो कसा मजबूत करावा हें येथें सांगितलें आहे.]

सुखार्थी च त्यजेद्विद्यां विद्यार्थी च त्यजेत्सुखम् ।
सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥

'सुख पाहिजे असेल तर विद्या नाहीं आणि विद्या पाहिजे असेल तर सुख नाहीं,' असा या सुभाषिताचा मथितार्थ आहे. मला वाटतें याचा अनुभव प्राचीन काळच्या विद्यार्थ्यांना चांगला येत असला पाहिजे. कारण, त्या वेळचें विद्यार्जन तसेंच कठीण होतें. त्या कालीं विद्यादान करणारे गुरु लोकवस्तीपासून दूर अरण्यांत राहत असत. तेव्हां विद्याभिलाषी मुलाला अगदीं लहान वयांत आपले मातापिता, घरदार, गणगोत व गांव सोडून गुरुगृहीं जावें लागे. नंतर गुरुजी सांगतील तीं कामें करून मग त्यांना विद्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकावी लागे. गुरुजी एकटे असल्यामुळें त्यांचें मन प्रसन्न राखण्याकरतां सदैव तत्पर राहावें लागे. अर्थात हें सारें आयुष्य मोठें कष्टाचें असे. आणि म्हणूनच वरील सुभाषित रचलें गेलें.



आजही विद्यार्जन करणाऱ्या मुलास कष्टावांचून विद्या प्राप्त होणार नाहीं—होत नाहीं हें निश्चित आहे; पण त्यांतील इतर दुःखें निःसंशय कमी झालीं आहेत. आपल्या मातापित्यांच्या प्रेमळ छत्राखालीं राहून प्राथमिक शिक्षण सुखानें घेण्याची सोय आहे. विद्याप्राप्तीचीं साधनें व स्थानें विपुल झाल्यामुळें गरिबापासून धनवन्तापर्यंत सर्वांना आपापल्या सोयीप्रमाणें विद्यार्जन करतां येतें. तात्पर्य आजचा विद्यार्थी या दृष्टीनें भाग्यवान आहे.

तरुण विद्यार्थ्यांनीं ही गोष्ट अवश्य ध्यानीं घ्यावी आणि आपलें विद्यार्थी–जीवन रेखीव करून पुढील आयुष्य सुखासमाधानांत जाईल, असा क्रम मुळांतच आंखावा.

या दृष्टीनें विचार केला तर विद्यार्थीदशा ही पुढील आयुष्याचा पाया आहे, हें स्पष्ट ध्यानांत येतें. अर्थात हा पाया जितका बळकट, खोल, लांबरुंद व दोरीसूद असेल तितका वरचा इमला बळकट व सुरक्षित होईल. लहानमोठ्या घरांपासून मोठमोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजवाड्यापर्यंत कोणतेंहि बांधकाम पाहा; वरच्या इमारतीस अनुसरून पायाची बळकटी साधावी लागते. म्हणून घराच्या मांडणींत पायाला फारच महत्त्व आहे. पक्क्या पायावर कच्ची इमारत बांधली तरी चालते पण कच्च्या पायावर पक्की इमारत बांधतांच येत नाहीं, नवलाची गोष्ट एवढीच कीं, पाया भूमीमध्यें गाडला जात असल्यामुळें त्याचें महत्त्व उघड दिसत नाहीं. ताजमहालासारखें शिल्पसौंदर्य पाहून आपण आश्चर्यमूढ होतों, पण त्याचा सारा डौल खालीं असलेल्या पायांत आहे, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

आयुष्याच्या पायाला म्हणजे विद्यार्थीदशेला हाच नियम लागू आहे. पुढच्या आयुष्यांत तिचें महत्त्व एकदम ध्यानांत येणार नाहीं; पण त्या वेळच्या चरित्रावरून पायाची कल्पना सहज करतां येईल. तरुण विद्यार्थ्यांनीं स्वतःस आवडलेल्या जिवंत किंवा दिवंगत थोर पुरुषाचें एखादें चरित्र डोळ्यापुढें आणावें आणि त्या थोर पुरुषाची विद्यार्थीदशा कशी होती, याचा शोध घ्यावा. जसा पाया तशी इमारत असा त्यांना अनुभव येईल. विद्वानांनाच हा नियम लागू आहे असें नाहीं. सत्कीर्तीनें चिरंजीव झालेली कोणतीहि व्यक्ति घ्या ती स्त्री असो कीं पुरुष असो, त्याचें पूर्वायुष्य म्हणजेच तरुणपण अत्यंत नियमबद्ध, सदाचार व सुविचार यांनीं युक्त आणि कांहींतरी उच्च ध्येयाला धरून असल्याचें आढळून येईल.

'आतां मी लहान नाहीं. मी मोठा झालों आहें. माझें मला सर्व कांहीं कळतें' इत्यादि वाक्यें वरचेवर बोलून आपलें स्वातंत्र्य प्रगट करूं पाहणाऱ्या विद्यार्थ्यानें वरील अनुभवाचा विचार करावयास नको काय? आणि जर त्यानें असा कांहीं सुविचार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला नाहीं तर त्याचें स्वातंत्र्य त्यास हितावह होईल काय? स्वतःच्या मोठेपणाच्या दिमाखांत आईबापांचें सांगणें ऐकलें नाहीं किंवा शिक्षकांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष केलें तर त्यांत त्या लोकांचें काय नुकसान आहे? 'मुलगा आपलें ऐकत नाहीं; ठीक आहे. त्याचें दैव त्याच्याबरोबर' असें म्हणून ते दुःखित अंतःकरणानें चुप्प बसतील; पण सर्वांची परीक्षा घेणारा काल थोडाच गप्प बसतो! तो सारखी निवड करीत राहतो. योग्यता दाखवितात ते वर राहतात; बाकीचे पाखडून बाजूला पडतात. सोळाव्या वर्षानंतर मिळालेल्या स्वातंत्र्यामध्यें सावधचित्त राहण्याचें प्रमुख कारण हें आहे.

कोणी कोणी विद्यार्थी म्हणतील, "तुमचें म्हणणें उक्त आहे. आम्ही याचा विचार सवड सांपडेल त्याप्रमाणें करूं. आयुष्याची केवढी मोठी चढण चढावयाची आहे. तेव्हां जरा थांबत गंमत करीत, मिळालेल्या नवीन स्वातंत्र्याचा उपभोग घेत गेलों तर कुठें बिघडलें? आईबापांच्या धाकधपटशांतून आतां कुठें बाहेर पडलों आहों, तों तुम्ही म्हणणार : सावध राहा! सावध राहा! म्हणजे पुन्हा धाक आलाच! अन्याय नव्हे का हा!" स्वच्छंदानें बागडूं पाहणाऱ्या मनाची ही कुरकूर सकृद्दर्शनीं खरी भासत असली तरी तिचा बुडबुडा उद्यां निःसंशय फुटणार आहे. म्हणून स्वतःचें कल्याण इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं मनाची ही कुरकूर न ऐकतां आयुष्याचा पाया कसा आंखावयाचा व भरावयाचा तें आतां—या घडीलाच ठरविलें पाहिजे.

जाते घडि ही अपुली साधा। करा काय तें अतां करा॥ असें कालाचें बजावणें आहे. इथें एका क्षणाची दिरंगाई खपणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सृष्टीचें रहाटगाडगें पाहा, अगदीं नियमबद्ध सुरू आहे. उन्हाळा वेळचे वेळीं येतो, पाऊस वेळेवरच पडतो आणि हिंवाळा पण योग्य वेळींच अवतरतो. सृष्टीच्या या वेळापत्रकांत सहसा बदल होत नाहीं. मग मनुष्यानें अनियमित वागून कसें चालेल ? शेतकऱ्याकडेच पाहा ना. उन्हाळ्यांत त्यानें शेताची मशागत केलीच पाहिजे; तरच त्यास पावसाळ्यांत पेरणी करण्याचें साधतें. या गोष्टी त्यानें योग्य वेळीं केल्या नाहींत तर ? सृष्टिक्रम थांबत नाहीं आणि शेतकऱ्याला मात्र पश्चात्तापांत पडावें लागतें.

आयुष्याचा पाया बळकट करण्याची वेळ म्हणजे विद्यार्थीदशाच होय. पुढें सबंध आयुष्यांत संधि मिळत नाहीं. कारण, विद्यार्थीदशा बहुशः निर्बंध असते. या वेळीं अन्नवस्त्राची, पैशा-अडक्याची किंवा पुढें काय याची चिन्ता असत नाहीं. मग अशा निश्चित कालांत भावी आयुष्याची सारी सिद्धता निश्चयानें व सुरळीतपणें कां करून घेऊं नये ? पण अनेक विद्यार्थ्यांच्या हातून असें होत नाहीं. त्यांची अडवणूक कोण करतें ?—दुसरें कोण करणार ? ते स्वतःच स्वतःला अडवतात !

अभ्यास

(अ) **विद्याभिलाषी**—(विद्या+अभिलाषी) विद्येची इच्छा करणारा. **विद्यार्जन**—विद्या संपादन करणें. **शिल्प** :—बांधणीचें काम. **उक्त**—योग्य. **सकृद्दर्शनीं**—पाहतांक्षणींच, प्रथम दर्शनीं.

(आ) १ या धड्यांतील अधोरेखित वाक्यांचा अर्थ सांगा.

२ 'सृष्टीचें रहाटगाडगें' यांतील रूपक समजून घ्या.

३ या धड्यांतील विचारांचें मनन करा.

४ पूर्वकालच्या विद्यार्थ्यांचे कष्ट आणि आतांच्या विद्यार्थ्यांच्या सोयी यांची तुलना करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ ईश्वराचें दयालुत्व

परिचय

श्री. विनायक दामोदर सावरकर हे पहिल्या श्रेणीचे देशभक्त व क्रांतिवीर म्हणून प्रसिद्ध आहेत. आणि ही क्रांति राजकीय बाबतींतच नव्हे तर धार्मिक व सामाजिक बाबतींतही झाली पाहिजे असें ते प्रतिपादीत असतात. त्यांची भाषा ओजस्वी व ठसठशीत असते. शिवाय ते उत्कृष्ट वक्ते व कवीही आहेत. [सावरकरांची एक विशिष्ट भाषाशैली आहे ती या साध्यासुध्या धड्यांतही पाहावयास मिळेल.]

खरोखर, मनुष्याच्या सुखसोयीसाठीं त्या दयाळू देवानें ही सृष्टीची रचना किती ममताळूपणें केली आहे पाहा ! हा सूर्य, हा समुद्र—किती प्रचंड हीं महाभूतें ! पण मनुष्याच्या सेवेस त्यांना देखील त्या देवानें लावलें. दुपारीं तहान तहान करीत मुलें खेळून दमून येतील तेव्हां त्यांना थंडगार गोड पाणी मिळावें म्हणून आई सकाळींच विहिरीचें पाणी भरून कुज्यांत घालून गारत ठेवते, तशा ममतेनें उन्हाळ्यानें नद्या सुकून जाण्याच्या आधींच हा सूर्य त्या समुद्रांतलें पाणी किरणांचे दोर खोलखोल सोडून भरतो, ' मेघांच्या कुज्यां 'तून सांठवून ठेवतो आणि तेंही मध्यंतरीं अशी कांहीं हातचलाखी करून, कीं समुद्रांत असतांना तोंडीं धरवेना असें खारट असणारें तें पाणी किरणांच्या कालव्यांतून त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आकाशाच्या विस्तीर्ण सरोवरांत सांचतांच इतकें गोड नी गार व्हावें कीं, जें पाणी पिण्यासाठीं देवांच्याही तोंडास पाणी सुटावें ! पुन्हा समुद्राचें खारट पाणी माणसासाठीं गोड करून देण्याच्या धांदलींत साराचा सारा समुद्र गोड करून टाकण्याची भलतीच चुकीही न होईल अशी तो दयाळू देव सावधगिरीही घेवविती. एका वर्षांत हवें तितकेंच पाणी गोड करून आटविण्याइतकीच शक्ति सूर्य-किरणांत आणि सांठविण्याइतकीच शक्ति मेघांत ठेविली जाते. नाहींतर सारा समुद्रच गोड झाल्यानें मनुष्यास मीठ मिळणें बंद होऊन त्याचा सारा संसार अळणी व्हायचा !

हे पशु पाहा ! मनुष्याच्या सेवेला आणि सुखाला हवे तसेच विविध, हवे तितकेच बुद्धिवान. वाळवंटांतलें तें मनुष्याचें तारूं म्हणून कांटे खाऊन पाण्यावांचून महिनोगणती चालण्याची युक्ति त्या उंटाला शिकविली. तो घोडा किती चपल ! त्याच्यावर स्वारी भरणाऱ्या मनुष्याला भर रणांगणांतही संभाळून वाहण्याइतकी नी मनुष्याशीं अत्यंत प्रामाणिकपणानें वागण्याइतकी बुद्धि त्याला देवानें दिली. पण मनुष्यावरच स्वारी भरण्याइतकी बुद्धि मात्र दिली नाहीं ! ही गाय पाहा ! एका बाजूला सुकें गवत ढकलावें नी दुसऱ्या बाजूला त्याचें बनलेलें ताजें ताजें जीवनप्रद दूध चरव्या भरभरून काढीत बसावें ! असें तें आश्चर्यकारक रासायनिक यंत्र ज्या देवानें घडविलें तो खरोखरच किती दयाळू असला पाहिजे !

एक गव्हाचा दाणा पेरला कीं, त्याचे शंभर दाणे ह्या जगांत होऊन उठतात. एक आंबा ! रसानें, स्वादानें, सत्त्वानें कोण भरपूर भरलेलें तें फळ ! तें इतकें सुपीक कीं, एक आंबा रुजविला कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा वृक्ष होऊन प्रतिवर्षीं हजार हजार आंबे त्याला लागावे नी असा क्रम वर्षानुवर्षें चालावा; फार काय सांगावें, एका आंब्याच्या फळापासुन होणारीं तीं लाखों फळें सगळींची सगळीं जरी मनुष्यांनीं खाल्लीं तरी पुनः आंब्यांचा तोटा पडूंच नये, यासाठीं आंब्यांच्या झाडाच्या फांदीचींच कलमें करून त्यांच्या आंबरायांच्या आंबराया भरभराटण्याची सोय जगांत देवानें केली आहे ! एका कणाचा मण होणारीं हीं तांदूळ, बाजरी, जोंधळे प्रभृति नानाविध सत्त्वस्थ धान्यें; एक बी पेरली कीं, एका पिढीस सहस्रावधि रसाळ फळें पुरविणारीं हीं फळझाडें; हे फणस, पपनस, अननस, द्राक्षें, डाळिंबें, या गवता-सारख्या उगव म्हणतांच उगवणाऱ्या अति रुचकर, बहुगुणी विविध-रस शाकभाज्या, फळभाज्या, ज्या जगांत पुरून उरताहेत, ज्याचा गाभाच गोड आहे तो साखरेच्या पाकानें ओतप्रोत भरलेला ऊस देखील ज्या जगांत इतका पिकतो कीं, त्याचे मळेच्या मळे माणसांना नकोसे झाले म्हणजे बैल खाऊन टाकतात, त्या जगास निर्मिण्यांत देवानें मनुष्यावर जी अमर्याद दया केली आहे तीविषयीं मनुष्य त्याचा उतराई होणार तरी कसा ?

अभ्यास

(अ) **महाभूतें**—पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश यांना महाभूतें म्हणतात. **विविध**—निरनिराळ्या जातीचे. **स्वारी भरणें**—घोड्यावर स्वार होणें. **जीवनप्रद**-शक्तिवर्धक, उत्साहदायक. **स्वाद**-रुचि. **सत्त्वस्थ**-गोड, मिष्ट.

(आ) सूर्याच्या उष्णतेनें समुद्राच्या पाण्याची वाफ होते, तिचे ढग बनतात व त्यांचाच पाऊस पडतो, ह्या वस्तुस्थितीवर येथें कशा कल्पना केल्या आहेत पाहा. 'पाणी गोड करण्याची धांदल झाली आहे' अशी कल्पना करून 'पुन्हा सारा समुद्र गोड करून मीठ नाहींसें करण्याची चुकी न करण्याची देव सावधानता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवतो ' हें म्हणणें किती गमतीचें आहे ! ' मीठ नसलें तर संसार अळणी व्हावयाचाच ' ही कल्पनाही मौजेची आहे नाहीं ? त्या पुढील प्रत्येक वर्णनांतही अशाच गमती आहेत, त्या तुम्हीच शोधून सांगा.

गाईला ' आश्चर्यकारक रासायनिक यंत्र ' म्हटलें आहे ! झाडांपासून फळें होणें ही सुद्धां रासायनिक क्रियाच नव्हे का ? विचार करा.

आंब्याचें वर्णन पाहा कसें वाढविलें आहे तें !

---

३ नदीचें गाणें

परिचय

श्री. शांताराम आठवले हे ' प्रभात ' चित्रपटसंस्थेचे पद्यलेखक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. तुकाराम बोलपटांतील ' आधीं बीज एकलें ' हें यांचेंच पद्य. यांची शब्दयोजना प्रासादिक व घडण बांधेसूद असते.



[एका नदीच्या कांठानें फिरतां फिरतां पाण्याच्या मंजुळ आवाजानें मन तल्लीन होतें, त्या वेळीं नदी जणूं एकादें गीतच गात आहे कीं काय अशी कल्पना करून ती काय म्हणत असेल हें कवीनें येथें सांगितलें आहे.]

वाहतें सुनिर्मल मी सरिता ।
नित गात गात मधु संगीता ॥
जनन लाभलें मज गिरिशिखरीं ।
शेवट तर उदधीच्या उदरीं ॥
जनन-मरण योजना ईश्वरी ।
जगताची त्यासच चिंता ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्तव्यीं परि सतत असें रत ।
कुठें दरी वा कोठें पर्वत ॥

अशीं संकटें उभीं सदोदित ।
जीवनपथ मी आक्रमितां ॥

विशाल माझें करुनी अंतर ।
सदा राहतें परहिततत्पर ॥

अर्पुनि जीवन वनें मनोहर ।
तटीं फुलवितें पुष्पलता ॥

तहानलेलीं गुरें-वासरें ।
व्याकुळलेलीं रान-पाखरें ॥

सान पुरें अन् अफाट नगरें ।
यांची मी वत्सल माता ॥

प्रभुनें मंगल जीवन दिधलें ।
भलें जगाचें करण्या सजलें ॥

सौख्य लाभतां जगा मजमुळें ।
त्यांतच जीवन-सार्थकता ॥

अभ्यास

(अ) **सुनिर्मल**—(सु + निर्मल) चांगलें स्वच्छ. **सरिता**—नदी. **मधु**—गोड. **संगीत**—गाणें. **जनन**—जन्म. **गिरि**—पर्वत. **शिखर**—पर्वताचें उंच टोंक. **उदधि**—समुद्र. **रत**—रमलेली. **जीवन**—आयुष्यक्रम. **पथ**—मार्ग. **पर-हित-तत्पर**—दुसऱ्याचें हित करण्यांत दक्ष. **जीवन**—पाणी. **सान**—लहान. **वत्सल**—प्रेमळ. **मंगल**—कल्याणकारक. **सजलें**—तयार झालें. **सार्थकता**—सफलता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(आ) १ या कवितेंतील वरेचसे शब्द संस्कृत भाषेतील आहेत. आपल्या मराठी भाषेंत संस्कृत शब्द पुष्कळ आहेत. (आपली मराठी भाषा संस्कृत भाषेपासूनच उत्पन्न झाली आहे. हें कसें तें तुम्हांला पुढें समजेल.)

२ नदी परोपकार करण्यांत तत्पर कशी राहते हें सांगा.

३ नदीला आपल्या जन्माचें सार्थक झालें असें कां वाटतें ?

४ नदीच्या मार्गांत कोणकोणतीं संकटें येतात ?

५ 'अंतर विशाल करणें' या शब्दांनीं काय सुचविलें आहे ?

---

४ शांतिदूत शन्

परिचय

श्री. शंकर धोंडो सार्दळ हे महात्मा गांधींच्या 'वर्धा-शिक्षण योजने'च्या कार्याशीं निकट संबंध असलेले गृहस्थ आहेत. मुलांचे शिक्षक, 'ट्रेनिंग कॉलेज' मध्यें प्राध्यापक आणि व्यवस्था-कामांत पर्यवेक्षक अशा त्रिविध अनुभवाचे हे गृहस्थ आहेत.

[आपल्याकडच्या किंवा जगाच्या इतर देशांतल्या इतिहासांत काय, तरवारीच्या जोरावर राज्यें कमविल्याचीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. पण क्षमा आणि सात्त्विक वृत्तीच्या जोरावर राज्य मिळाल्याचें उदाहरण क्वचितच दिसून येतें. चीन हा आपल्या शेजारचा देश आहे. त्याचा विस्तार हिंदुस्थानासारखाच मोठा व इतिहास वैभवशाली आहे. तिकडच्या लोकांचीं नावें आपल्या कानाला चमत्कारिक लागतात, तशींच त्यांच्या राजांचींही. या धड्यांत चीनच्या प्राचीन इतिहासांतील एका राजाची कथा सांगितली आहे.]

चिनी इतिहासाच्या पौराणिक काळांतील शेवटचा बादशहा शन् हा होय. याचा जन्म एका गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबांत झाला होता. तो स्वतः हातांत नांगर धरून शेती करी, रानांत जाऊन लाकडें तोडी, नदींत मासे मारी, व नदीच्या कांठची माती गोळा करून तिचीं भांडीं बनवी. अशा रीतीनें आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा एक गरीब शेतकरी, रंकाचा राव कसा झाला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांगर धरणाऱ्या हातांत चीनसारख्या एका प्रचंड देशाचा राजदंड कसा आला, ही गोष्ट अद्भुतरम्य असून बोधप्रदहि आहे.

शन्‌चा बाप आंधळा असून हेकट स्वभावाचा, तर सावत्र आई अत्यंत गर्विष्ठ आणि आपल्या सावत्र मुलाचा पूर्ण तिटकारा करणारी होती. अशा प्रतिकूल कौटुंबिक परिस्थितींतहि शन् हा संयम राखून आपली शांति ढळूं न देतां कुटुंबाची जबाबदारी उत्तम रीतीनें पार पाडीत असे. त्याच्या वेळीं चीनमध्यें हिंदुस्थान-प्रमाणेंच एकत्रकुटुंबपद्धति होती. चिनी कुटुंब म्हणजे एक छोटे-खानी संस्थानच शोभे ! प्रत्येक कुटुंबाची स्वतंत्र अशी वसाहत असे. आजोबा, आजी, आईबाप, मुलगे, सुना आणि नातवंडें यांनीं कुटुंबाची वसाहत नेहमीं गजबजलेली दिसे. कन्या पतिगृहीं जात, त्यांची जागा सासरीं आलेल्या सुनांनीं भरून निघे. इतर कोणाला कुटुंब सोडण्याचा प्रसंग क्वचितच येई. कुटुंबांतील प्रत्येक माणूस वृद्ध कुटुंबाधिपतीची आज्ञा शिरसावंद्य मानी. वृद्धांची सेवा, कनिष्ठांची काळजी, समवयस्कांशीं बंधुभाव अशा कौटुंबिक भावनांचा परिपोष चिनी कुटुंबांत उत्कृष्ट रीतीनें होत असे. मृतांचे श्राद्धपक्ष करण्याची चालहि चीन देशांत पुरातन काळापासून आहे. कौटुंबिक भावना दृढ करण्याचाच उद्देश या चालींत दिसून येतो. आपल्या कुटुंबाचा कारभार ज्याला उत्कृष्ट रीतीनें चालवितां येतो, कुटुंबांत ज्याला शांति आणि सौख्य नांदवितां येतें तोच मोठमोठ्या राज्यांचा कारभार करण्यास पात्र ठरतो अशी चिनी लोकांची भावना आहे.

शन् याचें कुटुंब फार मोठें होतें. तें त्यानें इतक्या उत्तम रीतीनें चालविलें कीं, एक 'आदर्श कुटुंबचालक' अशी त्याची कीर्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जिकडे तिकडे लवकरच पसरली. त्या वेळचा बादशाह येवो याच्या कानांवर ती गेली व येवोनें त्याची कसोटी पाहण्याचें ठरविलें.

बादशहा येवो यानें आपल्या दोन सुंदर कन्या शन्कडे कन्यादानाच्या हेतूनें पाठविल्या. (चीनमध्यें बहुपत्नीकत्वाची चाल आहे.) शेतकरी शन् यानें राजकन्यांचा अर्थातच मोठ्या प्रेमानें व आदरानें स्वीकार केला. त्या कुरंगनयना गळ्यांत निव्वळ हळकुंड बांधून आलेल्या नव्हत्या. तें सालंकृत कन्यादान होतें. शिवाय आंदण म्हणून गुरें-मेंढरें व विपुल धनधान्य यांचाहि स्वीकार करणें शन् याला भाग पडलें!

अशा रीतीनें शन् यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें एकाएकीं वैभवसंपन्न झाला! पण त्याचें वैभव जसजसें वाढूं लागलें तसतसा त्याच्या कुटुंबांतील कांहीं मंडळींचा मत्सरहि वाढूं लागला! कांहींचा मत्सराग्नि तर इतका भडकला कीं, त्यांनीं राहत्या घराला आग लावून त्याला ठार करण्याचा प्रयत्न केला! तो प्रयत्न निष्फळ झाल्यावर एकदां शन् विहीर उपसून साफ करण्याकरतां विहिरीच्या तळाशीं उतरला असतां त्याच्यावर दगडमातीचा वर्षाव करून त्याला गाडून टाकण्याचाही प्रयत्न करण्यांत आला. पण शन्ला विहिरींत एक भुयार सांपडलें, त्यांतून तो निसटून गेला!

स्वतःच्या प्राणावर घाला घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाऊ-बंदांसंबंधीं शन्नें सूडबुद्धि धरली नाहीं. सियांग नांवाचा त्याचा एक भाऊ एक दिवस त्याला जगांतून नाहींसा करण्याच्या उद्देशानें त्याच्या खोलींत शिरला. शन् वीणा वाजवीत बसला होता. निर्वैर व सात्त्विक वृत्तीचें तेज त्याच्या चेहऱ्यावर झळकत होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सियांगवर त्याचा परिणाम झाला. त्याचा दुष्ट हेतु गळून पडला. "तुझी खुशाली विचारण्याकरतां आलों होतों" सियांग शरमून म्हणाला. शन् समजला! पण त्यानें सियांगला एका शब्दानेंहि दुखविलें नाहीं! यानंतर मात्र भाऊबंदांनीं त्याला मारण्याचा नाद सोडून दिला.

शन्च्या सहवासांत राजकन्यांच्या जीवनाचा झपाट्यानें विकास होत चालला होता. त्यांनीं आपल्या पतीची ज्याप्रमाणें एकनिष्ठपणें सेवा केली त्याचप्रमाणें सासूसासऱ्यांचीहि मनोभावें सेवा केल्यामुळें शन्च्या सावत्र आईची वृति बदलली. शन्च्या कुटुंबांत प्रेम व सौख्य नांदूं लागलें. बादशहा येवो याच्या कसोटीला शन् आतां पूर्णपणें उतरला. येवोनें त्याला दरबारांत बोलाविलें व मुख्य प्रधानाचीं वस्त्रें व जबाबदारी त्याच्या अंगावर टाकिली! मुख्य प्रधान झाल्याबरोबर येवोनें त्याला पहिली कामगिरी सांगितली कीं, शांततेनें व सुखासमाधानांत कसें राहावें याचें शिक्षण देशांतील सर्व कुटुंबांना दे. शन्नें देशभर दौरा काढून शांततेचा संदेश चीनमधील प्रत्येक कुटुंबांत पोंचविला. राज्यांतहि सर्वत्र शांततेचें साम्राज्य पसरलें. चीन देशाची भरभराट होऊं लागली. या सर्वांचें श्रेय शांतिदूत शन् यालाच दिलें पाहिजे.

पंतप्रधान म्हणून कित्येक वर्षें शन् यानें कारभार केल्यानंतर लवकरच बादशहा येवो निधन पावला. येवोच्या निधनानंतर शन् यानें स्वतः आपण होऊन राज्यासिंहासनाची अभिलाषा धरली नाहीं. येवोचा पुत्र 'चू' याच्याकरितां त्यानें सिंहासन मोकळें केलें. पण प्रजेच्या हृदयसिंहासनावर शन्ची स्थापना केव्हांच होऊन गेली होती. तेथें 'चू' ला थारा नव्हता. अर्थात प्रजेच्या इच्छेला व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विनंतीला मान देऊन व जनतेची इच्छा मानून शन् ताबडतोब सिंहासनारूढ झाला. अशा रीतीनें नदींत मासे मारणारा व नांगर धरणारा पूर्वींचा गरीब शेतकरी शन् चीनच्या भव्य साम्राज्याचा पालक व मालक बनला.

राज्याचीं सूत्रें हातीं घेतल्यावर शन् यानें प्रथम राज्यकारभाराचीं निरनिराळीं खातीं पाडून शिवाजीप्रमाणें अष्टप्रधानांची नेमणूक केली. तो म्हणे, "ज्याप्रमाणें हात, पाय, डोळे व कान हीं इंद्रियें मनाची हुकमत मानून त्याची सेवा करितात—अर्थात मानवी शरिरांत हस्तपादादि इंद्रियांना जें महत्त्व—तेंच राज्यरूपी देहांत प्रधानांना आहे." शन् यानें प्रधानांच्या कार्याचें महत्त्व ओळखून (१) उद्योगमंत्री (२) शिक्षणमंत्री (३) जंगलमंत्री (४) कृषिमंत्री (५) पुरातनमंदिरमंत्री (६) गायनमंत्री (७) दळणवळणमंत्री व या सर्वांवर (८) मुख्य मंत्री अशा अष्ट-प्रधानांची योजना केली. त्यामुळें राज्यकारभारांत शिस्त आली व राज्याची सुधारणा भराभर होऊन प्रजा सुखासमाधानांत आणि शांतेंत कालक्रमणा करूं लागली व शन्ला धन्यवाद देऊं लागली. अशा रीतीनें प्रजेचे धन्यवाद कित्येक वर्षें घेतल्यावर शन् यानें इहलोकींची यात्रा संपवली.

शन्च्या निधनाची वार्ता पसरतांच देशभर शोकसागराच्या लाटा उसळूं लागल्या. शन्च्या मृत्यूनंतर तीन वर्षें प्रजेनें रंगीत कपडे अंगावर घातले नाहींत कीं, गळ्यांतून गाण्याचा सूर काढला नाहीं ! विण्यांच्या तारा गंजून गेल्या ! शन् रंकाचा राव कसा झाला या संबंधाच्या रम्य कथा चिनी आया मुलांना सांगत व मुलें कान टवकारून ऐकत. मुलांपुढेंच काय, पण सर्व जगापुढें जीवनाचा स्पृहणीय आदर्श शन् यानें ठेवून दिला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(अ) **राजदंड**—राजाचे अधिकार. (पूर्वी राजाचा अधिकार दाखविणारा एक मोठा गदेसारखा दांडा राजाच्या सन्निध अथवा राजदूताशीं असे) **संयम राखणें**—मन ताब्यांत ठेवणें. **कुटुंबाधिपति**—(कुटुंब+अधिपति) कुटुंबांतील मुख्य पुरुष. **शिरसा वंद्य मानणें**—पूर्णपणें व आदरानें मान्य करणें. **परिपोष**—विकास; वाढ. **श्राद्ध**—श्रद्धेनें केलेलें पितरांविषयीचें धार्मिक कृत्य. (हें पितरांच्या मृत्यु-तिथीलाच करतात.) **पक्ष**—पितरांसंबंधीं धार्मिक विधि. (हा भाद्रपद वद्य पक्षांत पितरांच्या मृत्युतिथीला अगर सवडीनें त्या पंधरा दिवसांत करावयाचा असतो. या वेळीं आप्त मंडळींना भोजनास बोलावितात.) **पुरातन**—फार जुनी. **कसोटी पाहाणें**—परीक्षा करणें (कसोटी-सोनें पारखण्याचा दगड) **कुरंग-नयना**—हरणासारखे डोळे असलेल्या मुली किंवा स्त्रिया. **अभिलाषा**—इच्छा. **स्तृहणीय**—स्तुति करण्यासारखें.

(आ) १ पुढील शब्दांचे अर्थ सांगा—पौराणिक, उदरनिर्वाह, रंक, अद्भुतरम्य, बोधप्रद, हेकट, समवयस्क, पात्र ठरणें, आदर्श, कन्यादान करणें, हळकुंड बांधून येणें, यक्षिणीची कांडी.

२ खालील प्रश्नांचीं उत्तरें द्या.

(अ) हिंदूंच्या चालीरीतींसारख्याच कोणत्या चालीरीती चीनमध्यें होत्या ?

(आ) चिनी कुटुंबाची व्यवस्था कशी असे ?

(इ) राज्याचा कारभारी होण्याची पात्रता कशी ठरविण्यांत येई ?

(ई) राजाच्या कसोटीस 'शन्' कसा उतरला ?

(उ) भाऊबंदांनीं 'शन्' चा छळ कसा केला ?

(ऊ) 'शन्' नें स्वीकारलेला वागणुकीचा मार्ग आपल्याकडे कोणीं उपदेशिला आहे काय ?

(ए) 'शन्' नें प्रत्येक कुटुंबांत कोणता संदेश पोहोंचविला ?

(ऐ) 'शन्' नें राज्यकारभाराची नवी व्यवस्था कशी केली ?

३ पुढील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.
कसोटी पाहाणें, यक्षिणीची कांडी फिरणें, सूत्रें हातीं घेणें, कन्यादान करणें.

४ 'शन्' च्या उलट 'रावाचा रंक' झाल्याचीं तुम्हांला माहीत असलेलीं उदाहरणें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५ बुद्धिर्यस्य बलं तस्य !

परिचय

श्री. केशव गणेश अलूरकर हे पूर्वी मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीचे शाळेंत शिक्षक होते, हल्लीं अमळनेरच्या 'प्रताप हायस्कूल' मध्यें शिक्षक आहेत. मुलांसाठीं गोष्टी व नाटिका लिहिण्यांत ते पटाईत आहेत.

[प्राचीन कालापासून कोणत्याही कार्याच्या आरंभीं श्री गणपतिपूजन करण्याचा हिंदु लोकांचा प्रघात आहे. श्री गणपति ही बुद्धिप्रधान देवता आहे. आणि 'शक्तीपेक्षां बुद्धि श्रेष्ठ' हा प्रत्यय पदोपदीं येत असतोच. या प्रत्ययाच्या आधारावरच गणपतीला सर्व देवांत अग्रपूजेचा मान कां मिळतो याचें कारण या काल्पनिक गोष्टींत वसविलें आहे. लेखकानें या गोष्टीला 'अग्रपूजा' असें नांव दिलेलें आहे. आम्ही या गोष्टींत थोडा बदल करून वेगळें नांव दिलें आहे.]

एकदां काय गंमत झाली, वैकुंठांत कसला तरी मोठा उत्सव होता व त्याकरतां श्रीविष्णूनीं सर्व देवांस बोलावलें होतें. इंद्र, चंद्र, अग्नि, वरुण, मरुत्, सारे देव जमले होते. ब्रह्मदेव, शंकर नि त्याचे मुलगे गजानन आणि कार्तिकेय हेही आले होते. उत्सव मोठ्या थाटानें पार पडला. देवाच्या घरीं काय कमी ? ज्याला जीं आवडतील तीं पक्वान्नें खावयास पुरविलीं होतीं. सर्वांनीं तीं यथेच्छ खाल्लीं. आमच्या गजानन महाराजांनीं मोदकांवर तर चांगलाच हात मारला अन् आधींच त्यांचें डेब्यासारखें असलेलें पोट खूपच मोठें झालें ! जो तो गणपतीच्या त्या पोटाकडे पाहून हसूं लागला. त्यांतल्या त्यांत इंद्र त्याची उघड उघड चेष्टा करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारखा फिदी फिदी हसत होता अन् चंद्र त्याला साथ करीत होता. गणपतीला तें सहन झालें नाहीं.

गणपति म्हणाला, "काय हो, तुम्ही एवढे मोठे अन् माझ्या-सारख्या लहान मुलाची टिंगल करतां, तेव्हां तुम्हांला काय म्हणावं? तुम्हांला वाटत असेल, याचं एवढं मोठं पोट, या जडजंबालाच्या हातून काय होणार? पण तुम्हांला मी सांगून ठेवतों कीं, तुम्हां सर्वांहून मी कोणतीही गोष्ट अधिक त्वरेनें करून दाखवीन."

गणपतीची ही हिरिरीची भाषा ऐकून पुन्हा हशा पिकला! गणपति चिडला व विष्णूंना म्हणाला, "विष्णो, तुम्हीच या गोष्टीचा आतां निकाल लावा." त्यावर विष्णु म्हणाले, "हें पाहा, देव हो, आपण आतां असें करूं. गणपतीनें सर्व देवांना एक प्रकारें आव्हानच दिलें आहे. तेव्हां आतां आपल्या आजच्या उत्सवाचा शेवट आयताच मौजेचा होणार आहे! आपण एक गंमतीची चढाओढ ठेवूं. ज्यानें त्यानें आपल्या वाहनावर बसून किंवा पायींच धावून आपल्या स्वर्गलोकाभोंवतीं प्रदक्षिणा घालायची. ज्याची प्रदक्षिणा सर्वांच्या आधीं संपेल त्याला एक छानदार बक्षीस मिळेल."

गणपतीनें उत्सुकतेनें विचारलें, "काय बक्षीस द्याल, बोला?"

विष्णु म्हणाले, "या चढाओढींत पहिला येणारा जें मागेल तें."

"काय हो, कबूल आहे सर्वांना?" गणपतीनें प्रश्न केला.

"हो, हो, कबूल, त्रिवार कबूल!" सर्वजण ओरडून म्हणाले व इंद्रानें हसत हसत चंद्राच्या हातावर जोरानें टाळी लगावली! ते दोघेहि गणपतीच्या पोटाकडे अन् सोंडेकडे आळीपाळीनें डोळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

नाथविश्वनाथ

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिचकावीत पाहूं लागले ! पुन्हा एकदां हशाला भरती आली; पण गणपति मात्र अगदीं स्वस्थ बसला. एक चकार शब्द बोलला नाहीं. पण त्याची मुद्रा मात्र गंभीर झाली होती. त्याच्या बारीक डोळ्यांत एक विलक्षण झांक मारत होती आणि कसला तरी जबरदस्त गूढ विचार त्याच्या त्या भव्य डोक्यांत त्या क्षणींच चालू होता, असें सूक्ष्म पाहणाऱ्याला दिसलें असतें. असो.

देवांच्या या अपूर्व शर्यतीची सर्व जय्यत तयारी झाली. विष्णूंनीं सर्व देवांना एका रांगेंत उभे केलें. इंद्र आपल्या ऐरावतावर, ब्रह्मदेव आपल्या हंसावर, शंकर नंदीवर, यमराज महिषावर, अग्नि मेषावर, चंद्र हरणावर, सूर्य आपल्या सात घोड्यांच्या रथांत, असे बहुतेक सर्व देव आपापल्या वाहनांवर आरूढ होऊन शर्यतीसाठीं सज्ज होऊन उभे होते. प्रत्यक्ष विष्णूही त्यांत सामील झाले. त्यांनीं शंख फुंकतांच सर्वांनीं धावायला सुरुवात करायची असें ठरलें. इतक्यांत गणपति आपल्या उंदरावर बसून जेव्हां देवांच्या रांगेंत येऊन उभा राहिला, तेव्हां फिरून एकदां हशा पिकला ! पण या वेळीं गणपति मुळींच न रागावतां त्या हशांत जोरानें सामील झाला !

ठरल्या वेळीं शंख जोरानें वाजला आणि ही स्वर्गींची अपूर्व शर्यत चालू झाली. हा सोहळा पाहण्यासाठीं यक्ष, गंधर्व, विद्याधर, सिद्ध, किन्नर वगैरे प्रेक्षकांच्या विमानांची आकाशांत एकच दाटी झाली !

पहिल्या पहिल्यांदा ऐरावतानें सर्वांना मागें टाकलें; परंतु थोड्या वेळानें हंस इतक्या वेगानें उडूं लागला कीं, ऐरावतच काय पण बाकीचीं सगळीं वाहनें कोठच्या कोठें मागें राहिलीं. आमचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गणपतिबाप्पा तर निघाल्या ठिकाणापासून फार फार तर शंभर एक कदम गेले असतील नसतील. बिचारा उंदीर धावण्याची पराकाष्ठा करीत होता. पण तो इवलासा जीव पाठीवर एवढें मोठें धूड घेऊन धावून धावून किती धावणार! लौकरच बिचारा थकला आणि त्याची गति अर्थात् पुष्कळच मंदावली. तितक्यांत गणपति त्याच्या कानांत कायसें पुटपुटला म्हणून बरें, नाहींतर उंदीरमामांची कांहीं धडगत नव्हती!

आपल्या मालकाची ती गुप्त आज्ञा होतांच उंदराच्या जिवांत जीव आला व गेलेलें अवसान परत आणून त्यानें आपलें तोंड उलट दिशेला करून निघाल्या ठिकाणाकडेच तुरु तुरु धावण्यास सुरवात केली आणि थोड्याच वेळांत गणपतीला तेथें सुखरूप आणून पोंचविलें.

शर्यतीची मौज पाहण्याकरतां देवस्त्रियाही त्या ठिकाणीं उभ्या होत्या. गणपतीला तसाच परत आलेला पाहून सावित्री म्हणाली, "वा रे ध्याना! आलास का परत? मग शर्यतीला उभा राहण्याचें सोंग तरी कशाला केलंस?"

"अग, त्याची मोदकांची शिदोरी तो विसरला असेल, ती ध्यायला तो परत आला आहे नी दुसरें काय?" लक्ष्मी त्याला खिजविण्याच्या उद्देशानें म्हणाली.

"छे ग, मी खात्रीनें सांगतें कीं उंदीरमामांना वाटेंत एकादं मांजर आडवं गेलं असेल!" शची मध्येंच ओरडून म्हणाली. त्यावर सर्वजणी खूप हसल्या! अशा रीतीनें कोणीं कांहीं, कोणीं कांहीं बोलून जी ती देवस्त्री गणपतीची थट्टा करूं लागली. पार्वतीला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थात आपल्या मुलाची चाललेली थट्टा आवडली नाहीं. त्या माउलीचा आपल्या मुलाच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास होता. ती म्हणाली, " बाळ, परत कां आलास ? अरे, मी जिंकीन अशी प्रतिज्ञा ना केली होतीस सर्वांच्या देखत ? निदान परत तरी यायचं नाहीं मधनंच. सारी प्रदक्षिणा पुरी केली असतीस तर असा थट्टेचा प्रसंग येता ना ?"

गणपति म्हणाला, " आई, या बायांच्या थट्टेकडे तूं मुळींच लक्ष देऊं नकोस. ही शर्यत मी जिंकून दाखविणार यांत शंका नको. तूं अगदीं निर्धास्त ऐस. आणि स्वस्थ बसून पाहा काय काय गंमत होते ती ! "

आपल्या लाडक्या पण कर्तृत्ववान् मुलाच्या आश्वासनानें कोणत्या मातेचा जीव समाधान पावणार नाहीं ? गणपतीच्या बोलण्यानें पार्वतीचा जीव भांड्यांत पडला आणि लक्ष्मी, सावित्री, शची, इत्यादि स्त्रियांच्या हसण्याकडे तिनें पूर्ण दुर्लक्ष्य करण्याचा निश्चय केला. एवढें होतांच गणपतीनें मुकाट्यानें उठून आपल्या आई-भोंवतीं तीन प्रदक्षिणा घातल्या. आणि शर्यत निघाली होती त्या ठिकाणापासून जवळच एका झाडाच्या शीतल छायेखालीं जेठा मारून तो स्वस्थ बसून राहिला.

इकडे बाकीच्या देवांची शर्यत चालूच होती. क्षणांत हंस, तर क्षणांत गरुड, क्षणांत ऐरावत, तर क्षणांत सूर्याचा रथ, अशा रीतीनें शर्यतीचा रागरंग सारखा पालटत होता. परंतु प्रदक्षिणेच्या अगदीं शेवटच्या अवस्थेंत बहुतेक वाहनें दमल्यानें किंचित मागें मागें रेंगाळूं लागलीसें स्पष्ट दिसूं लागलें. गरुड व हंस आणि त्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोघांच्या खालोखाल नंदी ही त्रयी मात्र अगदीं समतोल वेगानें धावत होती. त्यांच्यांतील एकाच्याही ठिकाणीं किंचितही दमल्याचें चिन्ह दिसत नव्हतें. ते तिघे एकसारखे पुढेंपुढेंच धावत होते. थोड्याच वेळांत ते फज्ज्याच्या अगदीं पंचक्रोशींत येऊन ठेपले. बाकीचे उमेदवार या वेळीं इतके मागें पडले होते कीं त्यांनीं किती जरी चपळाई केली तरी या तिघांपैकीं कोणातरी एकालाच विजयश्री माळ घालणार याविषयीं त्यांची खात्री होऊन चुकली.



झालें. शेवटीं गरुडानें अचानक आपला वेग वाढवला. विष्णूंनीं त्याला काय कानमंत्र दिला कोणास ठाऊक! पण त्यानें अशी एक जोराची झेप घेतली कीं, त्यासरशी हंस काय, किंवा नंदी काय ती पाहून क्षणभर जागच्याजागीं स्तंभितच झाले! निमिषार्धांत गरुडानें फज्जा गांठला, तेव्हां हंस-नंदीची जोडी चांगली दोन तीन कोस मागें होती.

शर्यत संपली. कांहीं वेळानें सर्व देव निघाल्या ठिकाणीं परत आले. विष्णूंनीं शर्यत जिंकल्याचें सर्वांनीं मान्य केलें. पण शर्यतीची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूळ कल्पना ज्याच्या आव्हानावरून निघाली तो गणपति देवांच्या मध्यें कोठेंच दिसेना. म्हणून विष्णूंनीं विचारलें, "अरे, पण सगळंच मुसळ केरांत ! आपला मोरया नाहीं कोठें दिसत तो !"

"तो ना ? अहो, त्याला येथें परत येऊन पोंचायला लागतील एक दोन युगं !" इंद्रानें टोमणा मारला.

"नाहीं तर बसला असेल वाटेंत मोदकांचं गांठोडं सोडून मोदक खात !" चंद्रानें इंद्राच्या विनोदास दुजोरा दिला.

"मला वाटतं, त्यांच्या उंदीरमामाचं मधेंच कांहीं बरं वाईट तर झालं नाहींना वाटेंत राजेश्रीचें धूड पाठीवरनं वाहतां वाहतां ?" वरुणानें शंका उपस्थित केली.

"राहूं दे ही थट्टा. आतां आपण शर्यतीचा रीतसर निकाल जाहीर करून बक्षीससमारंभाच्या कार्यास लागूं या." ब्रह्मदेव म्हणाले. "श्रीविष्णूंनीं शर्यत जिंकली हें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां आतां ठरल्याप्रमाणें त्यांना जें हवें असेल तें बक्षीस त्यांनीं मागावें—"

इतक्यांत 'हां, हां, थांबा. शर्यत मीं जिंकली आहे मीं—तुम्ही कोणीही नव्हे.' असें ओरडत गणपति धावत नी धापा टाकीतच सभेच्या ठिकाणीं आला. सर्व देव आश्चर्यानें थक्क झाले !

विष्णु म्हणाले, 'काय गणपति, तूं ही शर्यत जिंकली असें म्हणतोस ?"

"खात्रीनें." गणपति उत्तरला. "गणपति कधीं खोटें बोलत नसतो. हें तुम्हां सर्वांना माहीत आहे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"गणू बाळ, ही थट्टेची वेळ नव्हे. तूं शर्यत कशी जिंकलीस सांग पाहूं ?" शंकर गंभीरपणानें म्हणाले.

"अहो, कसची जिंकतोय हा शर्यत ! आम्हीं पाहिलें तर हा शर्यतीच्या रिंगणांत मुळीं नव्हताच. अन् म्हणे मीं शर्यत जिंकली !" इंद्र म्हणाला.

"अहो वक्रतुंड, जरा सांभाळून बोला. मोदकांतून कांहीं अंमली पदार्थ तर तुमच्या पोटांत गेला नाहीं ना असें भलतेंच बरळायला ? गणोबा, अशा फसवाफसवीनें आम्ही मुळींच फसणार नाहीं." चंद्रानें तोंडसुख घेतलें.

"पण तुम्हांला फसवतोय् कोण ? मी पुन्हा निक्षून सांगतों कीं, या शर्यतींत माझ्या एक सोडून तीन प्रदक्षिणा पुऱ्या झाल्या आहेत. बोला, सर्वांआधीं तीन प्रदक्षिणा पुऱ्या करणाऱ्या मला तुम्ही बक्षीस देणार कीं खूप वेळ घेऊन जेमतेम एक प्रदक्षिणा पुरी करणाऱ्या विष्णूंना तें देणार ?" असें गणपति म्हणाले.

"अरेच्चा ! या गणपतीच्या थापेबाजीचा आतां अगदीं कळस झाला !" इंद्र ओरडला. पण ब्रह्मदेव मध्यें पडून शांतपणें म्हणाला, "थांबा, अशी त्याची थट्टा करूं नका. त्याचं म्हणणं तरी काय आहे तें ऐकून घेऊं या. गणपति, उगीच तूं आम्हांला असा बुचकळ्यांत टाकूं नकोस. तूं तर प्रदक्षिणेंत मुळींच धावला नाहींस असं सर्वांच्या सांगण्यावरून दिसतं. आणि तरी देखील तूं ही शर्यत जिंकलीस असं म्हणतोस, तर हें कसं ?"

"तेंच तर सांगण्याचा मी मघांपासून यत्न करीत आहें." गणपतिबाप्पा म्हणाले, "पण हे सभ्य लोक मला बोलूं देतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर कीं नाहीं ! हें पाहा, विष्णो, तुमचं आमचं काय ठरलं होतं ? तर स्वर्गाला प्रदक्षिणा करायची. आतां मी तुम्हांला असं विचारतों कीं, ' जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ' हें वचन तुम्हांला मान्य आहे ना ? "

विष्णु म्हणाले, " होय. हें तर आमचें एक नीतितत्त्वच आहे. "

" मग झालं तर ! " गणपतिबाप्पा म्हणाले, " तुम्ही सर्व देव स्वर्गलोकाची प्रदक्षिणा करण्याकरितां मारे धूम धावत सुटलां तेव्हां माझा स्वर्ग म्हणजे माझी आई—तिच्याभोंवतीं मीं एक सोडून तीन प्रदक्षिणा घातल्या आणि बसलों स्वस्थ. आतां सांगा मीं ही शर्यत जिंकली कीं नाहीं ? "

गणपतीचा हा कोटिक्रम बिनतोड होता. इंद्रचंद्रादि देवांनीं आपल्याला तो पटत नाहीं असें सांगितलें. पण श्रीविष्णूंना तो मान्य करणें भागच होतें. ते म्हणाले, " देव हो, माझ्यावर तुमचा विश्वास आहे ना ? " सर्वांनीं एकमुखी होकार दिला. तेव्हां ते पुढें म्हणाले, " तर मग माझा निर्णय शांत चित्तानें ऐकून घ्या. ही अपूर्व शर्यत आज गणपतीनेंच जिंकली आहे. त्याच्या अचाट बुद्धिमत्तेची ही करामत आहे. अल्प श्रमांत होणाऱ्या कामाकरितां आपण उगाच पुष्कळ श्रम खर्ची घातले. 'बुद्धिर्यस्य बलं तस्य'. ही बुद्धि गणपतीच्या अंगीं आहे, म्हणूनच आज त्यानें आपल्यावर मात केली ! "

याप्रमाणें गणपतीनें शर्यत जिंकली आणि बक्षीस म्हणून सर्व देवांकडून कबूल करून घेतलें कीं, " हरएक कार्यांत माझी पूजा सर्व देवांच्या आधीं झाली पाहिजे. " त्या वेळेपासून कोणत्याही शुभ कार्याच्या आरंभीं " श्रीमन्महागणाधिपतये नमः " किंवा " श्री गणेशायनमः " म्हणून गणपतिपूजन करण्याचा प्रघात चालू झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(अ) हिंदूंच्या प्रत्येक मंगलकार्याच्या आरंभीं श्रीगणपतीचें पूजन करावें लागतें. या वस्तुस्थितीवर ही काल्पनिक गोष्ट किती गमतीनें लिहिली आहे पाहा. तुम्ही समवयस्क मित्र मंडळी जमलां तर जसा विनोद करतां, पैज लावतां तोच प्रकार येथें देवांविषयीं मानला आहे ! देवांविषयीं पूज्यबुद्धि असणारांना हे वर्णन थोडें चमत्कारिक वाटेल; पण अशा गोष्टींतलें मर्म ग्रहण करायचें असतें. हें लक्षांत ठेवलें म्हणजे झालें. गणपतीला बुद्धीची देवता आपण समजतों तेंहि या गोष्टींतील त्यानें लढविलेल्या युक्तीवरून पटतें.

(आ) १. यांतील विनोदी वाक्य लिहून काढा.

२. या धड्यांत आलेले वाक्प्रचार सांगा. त्यांचा उपयोग तुम्ही स्वतःच्या वाक्यांत करा.

३. गणपतीचा कोटिक्रम विनतोड होता असें तुम्हांला वाटतें का ? नसल्यास कां नाहीं तें सांगा

४. स्वर्गलोकींचे ' देवांशिवाय ' दुसरे कांहीं रहिवासी इथें सांगितले आहेत त्यांचीं माहिती मिळवा.

---

६ न्याहरी

परिचय

श्री. गजानन लक्ष्मण ठोकळ हे विशेषतः खेड्यांतील वातावरणाशीं समरस होणारे कवि व लेखक आहेत. अलीकडे ते बोलपट-लेखनही करतात. ' सुगी ' ' मीठ भाकरी ' इत्यादि त्यांचे गीतसंग्रह प्रसिद्ध आहेत.

[श्रीमंताला रोज पंचपक्वान्नें खायला मिळत असलीं तरी त्याला जो संतोष वाटत नाहीं तो गरीब शेतकऱ्याला केवळ कांदा भाकरीनें वाटतो. याचें कारण त्याची भाकरी कष्टाची असते. शेतकऱ्याचें कष्टाचें पण सुखी जीवन येथें कवीनें न्याहरीच्या एका प्रसंगानेंच उभें केलें आहे.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टेकाडावरुनी जरा सरकला मार्तंड उंचावरी
कोणी शेतकरी, करी बसुनियां बांधावरी न्याहरी

ओढा बाजुस वाहतो खळखळा वेढून त्याचा मळा
तेथें तोंड धुऊन स्वच्छ अपुलें, आला भरोनी चुळा.



ज्वारीची ढवळी सफेत अगदीं जाडीजुडी भाकरी
गोळा तीवर तांबडा चटणिचा, तो बालसूर्यापरी

कांदा एक सुरेखसा बघुनि तो फोडून धोंड्यावरी
देवाचें मग नांव घेउन तयें केली सुरू न्याहरी

सारी भाकर संपल्यावर उठे देवोनियां ढेकर
प्याला तो मग ओंजळी घटघटा जाऊन ओढ्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बैलांना चुचकारुनी मग धरी शेतामधें नांगर
कष्टांचा उचली मजेंत अगदीं डोक्यावरी डोंगर

पक्कान्नावर ताव मारुन कधीं संतोष ना वाटला
ती जाडी भरडीच भाकर हवी खाण्यास आतां मला

अभ्यास

(अ) **मार्तंड**—सूर्य. **बालसूर्य**—सकाळचा सूर्य. सूर्य सकाळीं उगवतांना 'लाल गोळाच' आहे असें भासतें नाहीं का? **देवाचें नांव घेणें**—कोणतेंही काम सुरू करतांना देवाचें स्मरण करण्याची रीत आहे. 'जेवण' हें सुद्धां पवित्र काम आहे. समर्थ रामदास म्हणतात, 'जेवण हें सुद्धां एक यज्ञकर्मच आहे'!

(आ) १. कष्टाळू शेतकऱ्याच्या रोजच्या जीवनांतील न्याहरीचें साधेंसुधें पण प्रसादयुक्त वर्णन कवीनें केलें आहे. वाचतां वाचतांच अर्थ लक्षांत आला व वर्णनाचें चित्र डोळ्यापुढें उभें राहिलें म्हणजे त्या भाषेंत 'प्रसाद' हा गुण आहे असें समजतात; तसें हें न्याहरीचें वर्णन आहे कीं नाहीं हें पहा.

२. न्याहरीस बसण्यापूर्वी शेतकऱ्यानें काय केलें? न्याहरी कसली होती? व कोणकोणते पदार्थ होते? न्याहरी झाल्यावर त्याचें समाधान हें कसें सुचविलें आहे? न्याहरी संपल्यावर त्यानें काय केलें?

३. 'बैलांना चुचकारुनी' इ० व 'कष्टांचा.....डोंगर' या वाक्यांवरून शेतकऱ्याचें मन कसें होतें तें लक्षांत घ्या.

४. कवीला पक्कान्नांवर ताव मारण्यापेक्षां जाडीभरडी भाकरच हवी असें कां वाटतें? जाडीभरडी भाकर गोड लागण्याचें कारण कोणतें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७ आर्य लोकांचें हिंदुस्थानांत आगमन

परिचय

पंडित जवाहरलाल नेहरू यांचें "जगाचा धावता इतिहास" या नांवाचें एक इंग्रजी पुस्तक आहे. या पुस्तकांत त्यांनीं तुरुंगवासांत असतांना आपल्या 'इंदिरा' नामक मुलीला लिहिलेलीं पत्रें आहेत. या पत्रांतून त्यांनीं जगाच्या इतिहासाची स्थूल कल्पना करून दिलेली आहे.

[या पुस्तकाचा अनुवाद श्री. वि. ल. बोडस यांनीं केला आहे. प्रस्तुत धड्यांतला भाग हा या पुस्तकांतल्या एका पत्रांतूनच घेतला आहे.]

इंदिरे ! आतांपर्यंत आपण फार प्राचीन काळाविषयीं चर्चा केली. आतां आपण मनुष्य सुधारल्यानंतर त्यानें काय केलें हें पाहूं. आतांपर्यंत आपण पाहिलेल्या प्राचीन काळाला "इतिहासपूर्व-काळ" असें म्हणतात. कारण त्या काळचा निश्चित इतिहास आपल्याला मिळत नाहीं. त्यापैकीं बऱ्याच गोष्टींचा आपल्याला नुसता तर्क करावा लागतो. पण आतां मात्र आपण विश्वसनीय इतिहासाच्या सीमेला येऊन ठेपलों आहोंत.

ह्या काळांत आपल्या हिंदुस्थानांत ज्या कांहीं घडामोडी झाल्या त्या आपण प्रथम पाहूं. आपण आतांपर्यंत पाहिलेंच आहे कीं, इजिप्तप्रमाणेंच अगदीं प्राचीन काळांतसुद्धां हिंदुस्थानांतहि बरीच सुधारणा झाली होती. त्या वेळीं तेथें व्यापार चालू होता आणि हिंदुस्थानांतला पुष्कळ माल इजिप्त, मेसॉपोटेमिया व इतर देशांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जहाजांतून पाठविला जात असे. त्या काळांत हिंदुस्थानांत राहणाऱ्या लोकांना 'द्रवीड लोक' असें नांव होतें. हल्लीं मद्रासच्या आजूबाजूला दक्षिण हिंदुस्थानांत राहणारे लोक, हे त्यांचेच वंशज आहेत.

ह्या द्रवीड लोकांवर आर्य लोकांनीं प्राचीनकाळीं उत्तरेकडून स्वारी केली. तेव्हां मध्य आशियांत ह्या आर्य लोकांची वस्ती बेसुमार वाढली असावी, असें वाटतें. ह्या सर्व लोकवस्तीला तेथें अन्न पुरेनासें झाल्यामुळें त्यांतील लोक पोटासाठीं इतर देशांकडे पसरूं लागले. त्यांच्या मोठमोठ्या टोळ्या पश्चिमेकडे इराणांत व तेथून थेट ग्रीस व युरोपांतील देशांत देखील गेल्या. त्याचप्रमाणें त्यांच्या दुसऱ्या टोळ्या काश्मीरच्या पठारावरून खालीं हिंदुस्थानांतही उतरल्या.

हे आर्य चांगले मजबूत व लढवय्ये लोक होते, म्हणून त्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांचा सहज पराभव केला व ते त्यांना खालीं खालीं रेटीत चालले. ह्याप्रमाणें आर्य लोकांच्या लाटांवर लाटा वायव्येकडून हिंदुस्थानावर आदळल्या असाव्यात. कदाचित् सुरवातीला द्रवीड लोकांनीं त्यांना तात्पुरतें थोपवून धरलें असेल. पण जेव्हां आर्यांच्या झुंडीच्या झुंडी येऊन थडकूं लागल्या, तेव्हां त्यांना रोखून धरणें द्रविडांना अशक्य झालें असावें. ह्यानंतर बऱ्याच काळपर्यंत आर्य लोक फक्त उत्तरेंत म्हणजे अफगाणिस्थानांत व पंजाबांत राहिले. मग ते आणखी खालीं आले व जेथें हल्लीं आपण राहतों, व ज्या प्रदेशाला 'संयुक्तप्रांत' असें नांव आहे तेथें येऊन त्यांनीं वस्ती केली. ह्यापुढेंहि त्यांचा प्रसार खुंटला नाहीं. येथून ते थेट मध्य हिंदुस्थानांतील विंध्य पर्वतापर्यंत आले व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं तो सर्व प्रदेश व्यापला. पण विंध्य पर्वत ओलांडणें मात्र त्यांना कठीण झालें. कारण, तेथें अतिशय दाट अरण्यें पसरलेलीं होतीं. म्हणून पुष्कळ काळपर्यंत आर्य लोक विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील भागांतच राहिले. पुढें त्यांच्यापैकीं बऱ्याच जणांनीं विंध्य पर्वतही ओलांडून दक्षिणेंत प्रवेश केला. पण पूर्वींप्रमाणें त्यांच्या मोठमोठ्या टोळ्या मात्र खालीं जाऊं शकल्या नाहींत. त्यामुळें हिंदुस्थानचा दक्षिणभाग विशेषेंकरून द्रवीड लोकांचाच राहिला.

इंदिरे ! आर्य लोकांच्या हिंदुस्थानांतील आगमनाचा अभ्यास करणें अतिशय मनोरंजक आहे. त्यांच्याविषयीं पुष्कळशी माहिती आपल्याला जुन्या संस्कृत ग्रंथांतून वाचावयास मिळते. त्यांच्यापैकीं वेदांसारखे कांहीं ग्रंथ ह्याच सुमारास लिहिले गेले असावेत. वेदांपैकीं सर्वांत जुना 'ऋग्वेद'. त्याच्यांतील वर्णनावरून त्यावेळीं हिंदुस्थानचा कोणता भाग आर्यांनीं आक्रमण केला होता त्याची कल्पना करतां येते. त्याशिवाय दुसरे वेद आणि पुराणांसारखे इतर जुने संस्कृत ग्रंथ ह्यांमध्यें आर्यांनीं हिंदुस्थानांत आपला प्रसार कसकसा केला ह्याची माहिती आपल्याला मिळते. ह्या प्राचीन ग्रंथांविषयीं कदाचित तुला फारशी माहिती नसेल. तूं मोठी होशील तेव्हां तुला त्यांच्याविषयीं अधिकाधिक माहिती मिळेल. तरी पण हल्लींसुद्धां तुला पुराणांतल्या बऱ्याच गोष्टी माहीत आहेत. पुराणानंतर बऱ्याच वर्षांनीं 'रामायण' हा थोर ग्रंथ निर्माण झाला व त्याच्याही मागून 'महाभारताची' रचना झाली.

ह्या ग्रंथांवरून असें दिसतें कीं, आर्य लोक अफगाणिस्थान आणि पंजाबांत राहत होते तेव्हां त्या भागाला ते "ब्रह्मावर्त"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें म्हणत. त्या वेळीं अफगाणिस्थानाला 'गांधार' असें नांव होतें. महाभारतांतील गांधारी तुला आठवते का? ती गांधार किंवा अफगाणिस्थानांतून आली असल्यामुळें तिचें हें नांव होतें. हल्लीं अफगाणिस्थान हा हिंदुस्थानापासून निराळा देश आहे. पण त्याकाळीं हे दोन्ही देश एकाच देशांत अंतर्भूत होते.

जेव्हां आर्य लोक आणखी खालीं येऊन गंगायमुनांच्या मैदानांत राहूं लागले, तेव्हां सर्व उत्तर-हिंदुस्थानाला त्यांनीं "आर्यावर्त" असें नांव दिलें.

प्राचीन काळांतील इतर देशांप्रमाणेंच आर्यांनीं नदीतीरांवर वस्ती करून मोठमोठीं शहरें वसविलीं. काशी किंवा बनारस, प्रयाग व दुसरींही पुष्कळ शहरें नदीतीरावरच वसलेलीं आहेत.

अभ्यास

१. आर्य लोकांनीं हिंदुस्थानांत स्वाऱ्या करण्याचें कारण कोणतें? येथले मूळचे लोक पराभव कां पावले? रामायण हा ग्रंथ कोणीं लिहिला? महाभारताचा मुख्य विषय कोणता? हा ग्रंथ प्रथम कोणीं रचिला? पुराणें किती आहेत व तीं कोणीं रचिलीं? ही माहिती मिळवा.

२. वेदग्रंथ चार आहेत ते—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. आर्य लोकांची मूळची भाषा संस्कृत ही होती.

३. या धड्यांत ज्या देशांचीं नांवें आलीं आहेत ती नकाशांत पाहून ते ते देश दाखविणारा एक नकाशाचा आराखडा तयार करा व त्यांत आर्य लोकांचा हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग दाखवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ हास्यकथा

परिचय

श्री. प्रल्हाद केशव अत्रे हे वृत्तपत्रकार, कवि, नाटककार आणि बोलपटांचे लेखक व निर्माते म्हणून महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. मराठींतील विडंबन-काव्याचे जनक व उत्कृष्ट वक्ते असाही त्यांचा लौकिक आहे. त्यांच्या लेखांत व काव्यांत विनोद ठायीं ठायीं ओसंडत असतो.

[ललित लेखनाप्रमाणेंच गोष्टी सांगणें ही एक कला आहे. आणि त्यांत विनोद निर्माण करणें हें तर थोड्यांनाच साधतें. प्रस्तुत लेखकांना 'विनोदाचार्य' कां म्हणतात हें त्यांच्या पुढील गोष्टीवरून कळून येईल.]

चांभाराचा पोरगा

एक गृहस्थ एका चांभाराच्या दुकानांत कोंकणी वहाणा खरेदी करावयाला गेला. चांभाराच्या थोरल्या मुलानें त्याला एक जोड दाखविला.

" किती किंमत ? " गृहस्थानें विचारलें.

" दोन रुपये " चांभाराच्या मुलानें उत्तर दिलें.

" पण मजजवळ आतां एकच रुपया आहे " गृहस्थ चिंतातुर चेहरा करून म्हणाला, " मग मी असं करतों, आतां तुम्हांला हा एक रुपया देतों आणि वहाणाजोड घेऊन जातों. उरलेला रुपया उद्यां आणून देतों झालें. "

मुलगा म्हणाला, ' ठीक आहे ! '

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें वहाणाजोड कागदांत नीट बांधून दिला. गिऱ्हाईक निघून गेलें. तो प्रकार चांभार कोंपऱ्यांत बसून मुकाट्यानें पाहत होता.



गिऱ्हाईक निघून गेल्यावर चांभार आपल्या मुलास म्हणाला, "सोपान्या, माझ्यामागून तूं या दुकानाचं वाटोळं करणार लेका! कोण, कुठलं गिऱ्हाईक, त्याचं नांव माहीत नाहीं कीं पत्ता माहीत नाहीं, आणि खुशाल त्याला उधार माल देऊन टाकलास! तो आतां कसचा रुपया घेऊन येतो आहे उद्यां? वाट-बघत बस!"

"कसा उद्यां येत नाहीं तें पाहतों!" सोपान्या हसून म्हणाला, "आलाच पाहिजे तो परत!"

"तें कसें काय?" बापानें आश्चर्यानें विचारलें.

"एकाच पायाच्या दोन वाहणा कागदांत गुंडाळून मीं त्याला दिल्या आहेत!" सोपाना हसून म्हणाला, "आतां बोला, येईल कीं नाहीं तो परत?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डोकेबाज ग्यानबा

ग्यानबा हा एक अतिशय कष्टाळू शेतकरी होता. पण अकलेच्या नांवानें तो अगदींच कोरडा होता! जणूं काय परमेश्वरच त्याला अजिबात मेंदूच द्यायला विसरला होता! एके दिवशीं तो शेतावरून काम करून जरा लौकरच घरीं परत आला. त्याची बायको स्वयंपाक करण्यांत गुंतली होती.

"कां, आज जरा लौकर आलायसा?" बायकोनें विचारलें.

"आज फारसं काम नव्हतं, तवां आलों लौकर झालं! तुला सयंपाकामंदी मदत करूं का?" ग्यानबानं प्रेमळपणानं विचारलं.

"तुम्ही सयंपाकामंदी मस्नी मदत करनार?" बायको हसून म्हणाली, "मग असं करा, भाजी कराया शेतामंधून एक भोपळा घेऊन या बिगी बिगी."

ग्यानबानं डोक्याला पागोटं घातलं आणि तो जाऊं लागला. "केवढा मोठा भोपळा आणूं ग!" आठवण झाल्यासारखं करून ग्यानबानं मागें वळून विचारलें.

"आणा तुमच्या डोसक्याएवढा!" बायको जरा चिडून म्हणाली.

ग्यानबा निघून गेला. एक तासभर झाला तरी तो शेतामधून आलाच नाहीं. तेव्हां बायकोनें आपल्या मुलाला सांगितलें, "तुक्या, अर तुझा बाप शेतामंदी इतक्या वाढूळ काय करीत बसलाय त्यें पगून ये."

तुक्या शेतावर जाऊन परत आला तो मोठ्यानें हसतच आला. "अग आई," तो म्हणाला, "बाबांना याड लागलं, याड!" शेतामधल्या साऱ्या भोपळ्यांस ते आपलं पागोटं घालीत फिरत्याती!"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेजवानी आणि मास्तर

कोल्हापूरच्या एका श्रीमंत सरदारांच्या घरीं एकदां कसलीशी थाटाची मेजवानी होती. त्या मेजवानीला गांवांतील वीसपंचवीस प्रतिष्ठित लोक बोलाविलेले होते. त्यांत सरदारसाहेबांच्या मुलाला शिकविणाऱ्या एका मास्तरांनाही बोलावणें होतें. मास्तरसाहेब आपले बोलून चालून गरीब, मोठ्या सरदाराच्या घरीं मेजवानीला जातांना चांगला पोषाख करून जावयाला पाहिजे, हें त्यांना काय ठाऊक ? ते गेले आपला शाळेंतला नेहमींचा पोषाख करून. एक काळी टोपी, एक बिन गुंड्यांचा लांब कोट आणि एक फाटकें धोतर !

मेजवानीला जमलेले बाकीचे पाहुणे मात्र एकजात उत्तम पोषाख करून आलेले होते. डोक्याला फेटे, अंगांत काळ्या लांब शेरवान्या आणि पायांत तंग सफेद सुरवारी ! पाहुणे मंडळीच्या पोषाखाचा तो एकंदर थाट पाहून मास्तर अगदीं सर्दच झाले ! पण करणार काय ? बसले बिचारे एका कोपऱ्यांत मान घालून जेवायला !

सबंध जेवण होत असतांना कोणींही त्यांच्याकडे ढुंकून पाहिलें नाहीं कीं कोणीं त्यांना विचारलें नाहीं. हा दरिद्री माणूस या मेजवानींत कशाला, अशाच तुच्छतेनें जो तो त्यांच्याशीं वागत होता. मास्तरांच्या मनाला तें फार लागून राहिलें होतें.

मास्तरांनीं कसेंबसें जेवण संपविलें आणि आतां मंडळी हात धुवावयास उठणार तोंच व्याख्यान देण्याच्या पवित्र्यानें ते उभे राहिले. "पाहुणे मंडळी, जरा थांबा. आजच्या या मेजवानीबद्दल मला सरदारसाहेबांचे आभार मानावयाचे आहेत."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते म्हणाले, "आपणांसारख्या थोर थोर मंडळींबरोबर माझ्यासारख्या एका सामान्य मास्तरलाहि सरदारसाहेबांनीं बोलाविलें, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. वास्तविक आजच्या या भोजनाला मी इतर पाहुण्यांप्रमाणें उत्तम पोषाख करून यावयाला पाहिजे होतें. सकाळीं मीं तसें आमच्या कुटुंबाला सांगितलें देखील! पण आमचें कुटुंब काय! तिनें कपडे परटाकडे धुवायला टाकले होते. तेव्हां परटाच्या घरीं गेलों. तो म्हणाला, 'कपडे धुवून तयार व्हायला निदान आठवडा तरी लागेल!' तेव्हां शिंप्याकडे गेलों आणि त्याला सांगितलें कीं, 'बाबारे, आज संध्याकाळच्या आंत कांहीं करून मला असे असे कपडे शिवून पाहिजेत!' पण तो कसला खट! तो म्हणाला, 'इतके चांगले कपडे शिवायला मला निदान एक महिना तरी लागेल!' मग आतां काय करायचें? तेव्हां अखेर भाड्यानें कपडे मिळण्याच्या दुकानांत गेलों आणि त्या दुकानदाराला सांगितलें कीं, 'आज रात्रीपुरता एक पटका, एक शेरवानी, आणि एक सफेद सुरवार मला भाड्यानें पाहिजे आहे.' दुकानदारानें मला साफ सांगितलें कीं, 'आज रात्रीं आपल्या गांवांत सरदारसाहेबांच्या घरीं मोठी मेजवानी आहे, तेव्हां आमच्या दुकानांतले सारे कपडे भाड्यानें बाहेर गेले आहेत!' म्हणून नाइलाजानें मला घरगुती कपड्यांतच इथें येणें भाग पडलें. त्याबद्दल सर्वांनीं मला माफी करावी!" असें म्हणून मास्तर खालीं बसले.

अभ्यास

१. या हास्यकथांत हसूं केव्हां येतें? पहिल्या गोष्टींत गिऱ्हाइकाची लबाडी मुलानें ओळखली व त्यालाच उलट बनविण्याचा प्रयत्न गुपचुपपणें त्यानें केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गिऱ्हाईक लवाड असून त्याला त्या पोरानें फसविलें व तो फसला म्हणूनच हसूं येतें आणि पोराच्या शहाणपणाचें कौतुक वाटतें.

'दुकानाचं वाटोळं करणार' हें बापाचें म्हणणें मुलगा खोटें करणार हेंही लक्षांत येतें.

२. दुसऱ्या गोष्टींतील ग्यानबाला 'डोकेबाज' हें विशेषण लावून लेखकानें कोणता अलंकार साधला आहे? या गोष्टींतील 'कुणबाऊ' शब्दांचे 'नागरी' उच्चार द्या.

३. तिसऱ्या गोष्टींतील मास्तरांची समयसूचकता आणि गर्विष्ठ पाहुणे मंडळीची टर उडविण्याची कुशलता लक्ष्यांत घ्या.

---

९ चिमा

परिचय

कवि 'विनायक' म्हणजे कै. विनायक जनार्दन करंदीकर. यांची कविता राष्ट्रीय वाण्याची आहे. "देशभक्ता प्रासाद बंदिशाळा। शृंखलांच्या गुंफिल्या त्यास माळा॥ चिता सिंहासन शूल राजदंड। मृत्यु दैवत दे अमरता उदंड॥ अशा प्रकारची त्यांची कविता देशभक्तीनें रसरसलेली आहे. पुढील कविता मात्र विनोदी आहे.

[एकदां एका गरीब तंबाखू-भक्ताची चिलीम हरवली तेव्हां त्याला झालेलें दुःख कवीनें येथें वर्णिलें आहे]

(शा. वि.)

भाग्याचे समयीं मजा उडविली मत्संगतीनें जिनें,
मातें जी न विसंबिली भटकतां पोटार्थ रानें वनें;
ऐश्वर्यीं व्यसनीं अशी मजसवें जी नांदली सारखी,
हा! हा! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी! १

खालीं मान करून संतत उभी लज्जावती जी असे,
रागेजे न कधीं, सदा मजकडे पाहून गालीं हसे!
नाहीं सोडुन कोपरा सरकली, माझें सदा आयकी,
हा! हा! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी! २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



नाहीं माहित डामडौल अगदीं साधीसुधी वागली,
नेसायास दिलें जुनें चिर तरी नाहीं असंतोषली,
ल्याली भूषण एकही न, रिझली सेवून पानें सुकीं,
हा ! हा ! हारपली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! ३

नाहीं चार जणांसमक्ष तिजला मी ओढितां लाजली,
हूं कीं चूं न करी उभी तिज जरी मी विस्तवें भाजली !
ऐशी भक्ति असे जिची मजवरी ठेवी मला जी सुखी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! ४

अभ्यास

(अ) **भाग्य**–ऐश्वर्य. **मत्संगती**–(मत् + संगती) माझा सहवास. **पोटार्थ**–पोटासाठीं, अर्थात् पोट भरण्यासाठीं. **व्यसन**–संकट. **प्रियतमा**—(प्रिय + तमा) सर्वांत आवडती. **आयकी**–ऐकते. 'आयकी' असें रूप वास्तविक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत नाहीं. कवि अशीं रूपें कां करतात हें शिक्षकापासून समजून घ्या. **चिर**—वस्त्र. **भूषण**—दागिना, अलंकार. **रिझली**—आनंदली.

(आ) १. तंबाखू ओढण्यासाठीं कांहीं लोक मातीची 'चिलीम' नांवाची वस्तु घेतात, तिला येथें 'चिमा' असें म्हटलें आहे. प्रथमदर्शनीं किंवा वाचनीं कवीची पत्नी हरवली कीं काय, असें वाटण्यासारखें वर्णन आहे. पण पुढें हा भ्रम दूर होतो आणि पत्नीला लागू होणारें वर्णन चिलमीला लागू पडतें हें पाहून कवीच्या कौशल्याचें कौतुक वाटतें.

२. चिलमींत तंबाखूचीं पानें चुरगळून घालतात, त्यावर निखारे ठेवतात, एक लहानसें फडकें चिलमीला गुंडाळतात (नेसवतात) व मग तो तंबाखू ओढतात. दोघे चौघे मित्र आळीपाळीनें चिलीम ओढून आनंद मानतात हें सर्व लक्षांत आणा व मग कवितांतील वर्णन स्त्रीला (अर्थात् जुन्या चालीच्या आर्य स्त्रीला!) व चिलमीला कसें लागू पडतें तें पहा.

३. 'खालीं मान करून उभी असे' 'कोपरा सोडून न सरकणें' यांवर टीपा लिहा.

---

१० तानाजीचें प्रसंगावधान

परिचय

[शिवाजी महाराजांचा जिवास जीव देणारा मित्र तानाजी मालुसरे यानें कोंडाणा (सिंहगड) किल्ला हस्तगत केल्याची कथा इतिहासांत नमूद आहे. आणि तो प्रसंगच वीररसानें युक्त असल्यामुळें त्या प्रसंगाचें वर्णन अनेकांनीं गद्यांत व पद्यांत केलेलें आहे. पण तानाजीच्या आयुष्यांत शिवाजीमहाराजांच्या कार्यास उपकारक व पोषक असे आणखीही अनेक प्रसंग घडलेले आहेत. या घड्यांत असा एक प्रसंग वर्णिला आहे.]

शिवाजी महाराजांचा सुप्रसिद्ध जिवाला जीव देणारा सरदार तानाजी मालुसरे याची सिंहगड काबीज करतांनाची कामगिरी सर्व-परिचित आहेच. पण हीच कांहीं त्याची एकुलती एक कामगिरी नव्हती. या कामगिरीच्या वेळीं त्याला आपला प्राण गमवावा लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून ती त्याची शेवटची कामगिरी ठरली नि इतिहासांत विशेष प्रसिद्ध झाली इतकेंच. पण ज्यांची लोकांना विशेष माहिती नाहीं, अशा महाराजांच्या कितीतरी कामगिऱ्या त्यानें यापूर्वीं पार पाडल्या होत्या.

एकदां शिवाजी महाराजांचा मुक्काम कोकणांत चिपळूणला पडला होता. संगमेश्वरला त्या वेळीं कांहीं विजापुरी सैनिक ठाणें देऊन होते. त्यांना शिवाजीची भीति वाटून त्यांनीं तेथून पळ काढला, तेव्हां हें ठाणें हस्तगत करण्याची कामगिरी त्यानें पिलाजी नीलकंठ आणि तानाजी मालुसरे यांच्यावर सोंपविली. त्यांनीं संगमेश्वरीं जाऊन तें ठाणें हस्तगत केलें.

विजापुरी सैनिक पळून गेले तरी ते स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं विजापुरच्या दरबाराला ही हकीकत तिखटमीठ लावून सांगितली. संगमेश्वरचें ठाणें पुन्हा आपल्या हातीं आलें नाहीं तर कोकणांतलें आपलें राज्य गेलेंच, असें विजापुरी दरबारालाही वाटलें आणि त्यांनीं तें ठाणें पुन्हा कसें सर करावें याची मसलत चालविली.

त्या वेळीं शृंगारपुरचे सुर्वे हेही मोठे नामांकित सरदार होते. शिवाजी महाराजांशीं त्यांचा स्नेह होता; पण ते मोठे लोभी नि महत्त्वाकांक्षी होते. विजापुरच्या बादशहानें त्यांना आपल्या बाजूला वळवून घ्यावयाचें ठरविलें. विजापुराहून एक जासूद मोहोरांनीं भरलेली पिशवी नि एक लखोटा घेऊन शृंगारपुरला आला. सुर्वे लोभाला बळी पडले आणि त्यांनीं संगमेश्वर पुन्हा बादशाही अंमलाखालीं आणून देण्याचें बादशहाला वचन दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां 'ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी' अशी स्थिति झाली. भोंसले नि सुर्वे दोघेही मराठे. दोघेही गनिमी काव्यांत वाकबगार. तेव्हां 'चोराचीं पावलें चोर ओळखतो' या म्हणीप्रमाणें तानाजी मालुसरे नि पिलाजी नीळकंठ ज्या ठिकाणीं तळ देऊन होते त्या ठिकाणची बित्तंबातमी सुर्व्यांनीं काढली नि एके दिवशीं मध्यरात्रीं तानाजीच्या सैन्यावर हल्ला चढविला !

(तानाजीला आपल्याच हाडामासाच्या मराठ्यांकडून आपल्यावर हल्ला होईल याची कल्पना नव्हती. पण तसा प्रसंग आला खरा ! तशांतच आणखी एका आपत्तीची भर पडली. त्याच्या बरोबरचा सरदार पिलाजी नीलकंठ सुर्व्यांचा हा आकस्मिक हल्ला पाहून अगदीं गर्भगळित झाला ! त्याला वाटलें, आतां आपली धडगत नाहीं ! तेव्हां 'यः पलायते' करून जीव वांचवा ! तेंच या वेळीं शहाणपणाचें !

असें आंतून नि बाहेरून दोन्हीकडून संकट उभें राहिलें असतां सामान्य मनुष्य अगदीं गोंधळून गेला असता. पण तानाजी वीरपुरुष होता. शिवाजी महाराजांची आज्ञा म्हणजे वेदवाक्य. ती आज्ञा मोडून संगमेश्वरचें ठाणें सोडून द्यावयाचें ? छेः ! ही गोष्ट प्राण गेला तरी करायची नाहीं, असा त्यानें मनाशीं निर्धार केला आणि पिलाजीरावाला सांगितलें, "मूर्खा ! या वेळीं भागूबाईसारखें पळून जायचें काय ? ती गोष्ट मनांत सुद्धां आणूं नको ! आज एक येथें लढतां लढतां मरून तरी जाऊं; किंवा जिवंत राहून विजयानें महाराजांचा आशीर्वाद घेऊं !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण पिलाजीला कांहीं धीर निघेना! तो पळण्याची संधि पाहूं लागला! दुसरेही कांहीं लोक त्याच्या मागून जाणार असें दिसूं लागलें. तेव्हां तानाजीनें पिलाजीचा दंड पकडला; जवळच एक मोठा

दगड होता त्या दगडापाशीं नेऊन त्याला उभें केलें; आणि दोन तीन इसमांच्या मदतीनें त्याला दोरखंडानें त्या दगडाला बांधून टाकलें!

अशा प्रसंगीं वेळेचें महत्त्व फार असतें. पिलाजीराव पळून जाऊं शकत नाहीं असें पाहिल्याबरोबर ज्यांच्या मनांत थोडीशी चलबिचल झाली होती तेही मराठेगडी मागें फिरून "हर ऽ हर ऽ महादेव!" अशी गर्जना करीत शत्रूवर तुटून पडले. तानाजीचा प्रत्येक शिपाई 'मारूं किंवा मरूं' अशा त्वेषानें लढत आहे हें पाहून सुर्व्यांच्या सेनेनें कच खाल्ली. चार पांच तास युद्ध चाललें. पहाट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतांच सुर्व्याचें उरलें सुरलें सैन्य निघून गेलें. तानाजीला विजयश्रीनें माळ घातली !

महाराजांना ही हकीगत ताबडतोब कळविण्यांत आली. महाराज संगमेश्वरीं येऊन दाखल झाले. त्यांना तानाजीबद्दल धन्यता वाटली. आपल्या साऱ्या सैन्याला त्यांनीं एकत्र केलें आणि सर्वांना उद्देशून ते म्हणाले, "आपल्या राज्यांत तानाजीसारखे एकनिष्ठ, स्वामिभक्त, व देशासाठीं प्राणाचीहि पर्वा न करणारे वीर आहेत तोंपर्यंत आम्हीं केलेला स्वराज्याचा उपक्रम एकसारखा यशस्वीच होत जाणार अशी खात्री बाळगा ! जय भवानी !"

अभ्यास

(अ) **तिखटमीठ लावून सांगणें**—असेल त्यापेक्षां अधिक करून सांगणें. **बळी पडणें**—नाश पावणें; मरणें. **ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी**—ही एक म्हण आहे. बोर नि बाभळ हीं दोन्हीं रानझाडें सारखींच टणक नि गांवकऱ्यांच्या माहितीचीं असतात; त्यावरून दोघेजण एकाच गांवचे, त्यामुळें एकमेकांचे स्वभाव, युक्त्या वगैरे सर्व सारखींच, असा अर्थ. **गनिमी कावा**—मराठ्यांची शत्रूला हूल दाखवून फसविण्याची व लपून छपून लढाई करण्याची पद्धत. **वाकबगार**—तरबेज, निष्णात. **गर्भगळित होणें**—फार भिऊन जाणें. **धडगत**—निभावण्याजोगी स्थिति. **यः पलायते**—(सं.) 'जो पळतो' असा मूळ शब्दार्थ; त्यावरून मराठींत यः करणें म्हणजे 'पळ' काढणें असा अर्थ झाला.

(आ) १. पुढील प्रश्नांची उत्तरें द्या :—

(१) सुर्व्याच्या महत्त्वाकांक्षेबद्दल तुम्हांला काय वाटतें ?

(२) तानाजीवर कोणत्या आपत्ति आल्या ?

(३) 'शिवाजी महाराजांची आज्ञा म्हणजे वेदवाक्य' यांचें स्पष्टीकरण करा.

२. ह्या धड्यांतले पांच वाक्प्रचार निवडून त्यांचे अर्थ लिहा.

३. या धड्यांत युद्धविषयक कोणते शब्द आले आहेत, त्यांची यादी करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११ म्हाताऱ्यांचें गांव

परिचय



श्री विठ्ठल दत्तात्रेय घाटे हे शिक्षणशास्त्रज्ञ असून सरकारी शाळाखात्यांत त्यांनीं अनेक वर्षें निरनिराळ्या हुद्यांचीं कामें केलीं आहेत. शिवाय ते उत्कृष्ट गद्यलेखक व कवीहि आहेत. " नवयुग वाचनमाला " या नांवानें प्रसिद्ध असलेलीं शाळाखात्यांत अनेक वर्षें चालू असलेलीं पुस्तकें अत्रे व घाटे यांनीं लिहिलीं आहेत.

[सध्यांच्या शाळाखात्याची रचना ब्रिटिशांच्या अमलांत झालेली आहे. या खात्यांत शाळा तपासण्यासाठीं जे अधिकारी असतात त्यांना ' इन्स्पेक्टर ' असें म्हणतात. दरवर्षी एकदोनदां प्रत्येक शाळेला भेट देऊन तिथल्या शिक्षकांना मार्गदर्शन करणें, शाळेच्या व्यवस्थेसंबंधानें खात्याकडे रिपोर्ट करणें, इत्यादि कामें या इन्स्पेक्टरांना करावीं लागतात. असे एक इन्स्पेक्टर कोकणांतल्या एका गांवीं गेले असतांना त्यांना आलेला गोड अनुभव त्यांनीं वर्णिला आहे.]

तुम्हीं नाना प्रकारचीं गांवें पाहिलीं असतील. तरुणांचें गांव पाहिलें असेल, कदाचित् मुलांचें गांव पाहिलें असेल—मी तें नेहमींच पाहत असतों; पण तुम्हीं कधीं म्हाताऱ्यांचें गांव पाहिलें आहे काय ? ऐकलें आहे काय ?

मी तरी कशाला मुद्दाम म्हाताऱ्यांचें गांव पाह्यला जातोंय्. पण योग आला खरा. गेल्या वर्षीं हिंवाळ्यांत एके दिवशीं माझा मुक्काम....गांवच्या डाकबंगल्यांत होता. सकाळची वेळ. चहा आटोपून मी दुसऱ्या गांवीं जाण्याची तयारी करीत होतों व जामानिमा चढवतां चढवतां शिक्षक मंडळीशीं बोलत होतों.

इतक्यांत तीन चार म्हाताऱ्यांनीं खोलींत प्रवेश केला. मीं प्रश्नार्थक मुद्रेनें त्यांच्याकडे पाहिलें. त्यांच्यांतील एकजण म्हणाला, " साहेब, आमचा गांव इथून जवळच पांच सात मैलांवर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण आमची शाळा पाहावी अशी फार इच्छा आहे. आल्यास उपकार होतील."

ही बुढ्ढी मंडळी लष्करी पेन्शनर होती. त्यांचे खाकी रंगाचे कोट, लष्करी थाटाचे पटके, उभे राहण्याची ढब, लष्करी सलामी देण्याची ऐट, हीं पाहून मला कौतुक वाटलें. मी म्हणालों, "मी आतां पुढें जाण्यास निघालों आहें. पण माझी मोटर तुमच्या गांवीं नेतां येत असेल तर मी अवश्य येतों."

मला काय माहीत त्या म्हाताऱ्यांचें गांव कुठें व कसें आहे? मी सहजभावानें बोललों. जवळ बसलेले एक शिक्षक हसून म्हणाले, "होय, साहेब, मोटर जात असेल तर जावें त्यांच्या गांवीं." म्हातारी मंडळी आपसांत कुजबुजूं लागली. त्यांचा म्होरक्या म्हणाला, "साहेब, आपली मोटर नेण्याची तजवीज होईल. पण आतां आपण घांदलींत आहांत; आम्ही आग्रह करीत नाहीं. सहा महिन्यांनीं तपासणीला परत याल तेव्हां भेटूं." म्हातारे रांगेंत 'अटेन्शन' करून ताठ उभे राहिले. त्यांनीं मला लष्करी सॅलूट केला व अबौट टर्न करून रवाना झाले!

मीहि पुढें कूच केलें व त्या म्हाताऱ्यांना व त्यांच्या गांवाला विसरून गेलों. पांच सहा महिन्यांनीं परत माझा त्या बंगल्यांत मुक्काम झाला. म्हातारे पाळतीवर होते. मी टोपी खुंटीला टांगून खुर्चीवर बसतों न बसतों तोंच ती म्हाताऱ्यांची तुकडी माझ्या समोर अटेन्शन करून उभी राहिली. त्यांची मुद्रा विजयी होती, चर्या करारी होती. तो म्होरक्या म्हणाला, "साहेब, तयारी झाली. उद्यां आपण मोटरनें आमच्या गांवीं चलावें."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'तयारी' याचा अर्थ आम्हां फिरत्या अमलदारांना एकच माहीत ! तयारी झाली म्हणजे कोंबडें कापलें किंवा बासुंदी-पुरीची सिद्धता झाली ! मी म्हणालों, "मला तुमची 'तयारी' नको. कबूल केल्याप्रमाणें मी तुमची उद्यां सकाळीं शाळा पाहीन व परत येथें मुक्कामाला येईन."

तो म्होरक्या मिलिटरी माणूस. तो मला काय दाद देतोय् ? तो निश्चयपूर्वक म्हणाला, "साहेब, उद्यां मुक्काम आमच्या गांवींच झाला पाहिजे. आमची मीठ-भाकर खाल्ली पाहिजे. उद्यां येथें आपल्याला कांहीं काम करितां यायचें नाहीं. सारे वकील, मास्तर, शेठ-सावकार झाडून साऱ्यांना उद्यांचें आंवतण केलें आहे. उद्यां येथील शाळा बंद !"

मी तात्काळ हेरलें, उद्यां कांहीं तरी गमतीचे अनुभव येणार ! म्हातारी मंडळी परत गांवीं गेली. दुसरे दिवशीं सकाळीं उठून बाहेर येतों, तों बंगल्यासमोर माणसांनीं गच्च भरलेल्या तीन मोटरी माझी वाट पाहत उभ्या होत्या ! त्या मोटारींमध्यें गांवची सर्व ठळक मंडळी बसली होती. जणूं काय ते लष्करी म्हातारे 'कॉन्स्क्रिप्शन' (Conscription) पुकारून या सर्व पुढारी मंडळींना सैन्यांत भरती करण्यास घेऊन चालले होते ! पुढच्या दोन मोटरींच्या फ्रंट सीटवर एक एक म्हातारा वाट दाखवायला बसला होता. तिसऱ्या मोटरीची पुढची जागा मजसाठीं राखून ठेवली होती. मी मुकाट्यानें जाऊन बसलों.

मोटरी चालू झाल्या. दोन अडीच मैल गेल्यावर आम्हांला एक लहानशी घाटी लागली. तोंपर्यंत रस्ता ठीक होता. घाटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चढल्यावर अफाट असें कातळ दिसलें. रस्ता सरळ पुढें गेला होता. पण पुढच्या मोटरींतील म्हातारबुवांनीं ड्रायव्हरला उत्तरेकडे मोटर नेण्याचा हुकूम दिला. त्या दिशेला रस्त्याचा मागमूस नव्हता. ड्रायव्हर कुरकुरूं लागला. बुवा संतापले. "लेका, तुझ्या मोटारीला धक्का लागला तर भरून देईन!" ड्रायव्हरला असें आश्वासन देऊन त्यांनीं भरतीला मोडक्या इंग्रजींत त्याला लष्करी शिव्या हासडल्या!

मोटरी कातळावरून चालूं लागल्या. एक फर्लांग गेलों न गेलों तोंच चुन्यानें कातळावर काढलेल्या दोन रेषा स्पष्ट दिसूं लागल्या. या रेषांमधून मोटरी जाण्याचा रस्ता त्या म्हाताऱ्यांनीं केला होता. मधून मधून खड्डे खळगे होते तेथें भर घालून रस्ता तयार केलेला दिसत होता. एका ठिकाणीं तर मोठमोठ्या दगडांची भर घालून त्यावर माती पसरून मोटरी पुढें नेण्याची व्यवस्था केली होती. दर फर्लांगावर एक म्हातारा रस्त्याच्या कडेला उभा होता. मोटरी जवळ येतांच तो लष्करी सलामी देई व हातांतलें निशाण फिरवी.

आतां कुठें माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. म्हाताऱ्यांनीं पांच सहा महिने मुदत कां मागितली तें आतां मला उमगलें. आमच्या शिक्षकानें थट्टा केली, एक प्रकारचें त्या म्हाताऱ्यांना आव्हान केलें. त्यांनीं आपल्या लष्करी बाण्याप्रमाणें तें शांतपणें स्वीकारलें व दोन अडीच मैल रस्ता स्वतःच्या हातांनीं तयार करून मोटरी आपल्या गांवच्या शाळेपर्यंत नेल्या!

आम्हीं शाळेपाशीं येऊन पोहोंचलों. तेथें सर्व गांवकरी आमच्या स्वागतासाठीं जमले होते, पण इतर ठिकाणीं दिसून येणारा गोंधळ, गडबड, अव्यवस्था यांचा तेथें मागमूसहि नव्हता. शाळेच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इमारतीच्या एका बाजूस मांडव घातला होता व त्यांत व्यवस्थितपणें गांवकरी बसले होते. पण गम्मत अशी कीं जमलेल्या लोकांत औषधाला कोणी तरुण नव्हता ! सारेच म्हातारे ! माझ्या बरोबरचे एक वृद्ध वकील मला हसत हसत म्हणाले, "आहे कीं नाहीं गम्मत ! अहो, हा बोलून चालून म्हाताऱ्यांचा गांव ! येथें तुम्हांला तरुण मनुष्य सहसा दिसणार नाहीं. म्हातारे आणि त्यांचे शाळेंत जाणारे नातू अन् पणतू ! सारी तरुण मंडळी तुमच्या मुंबईस-पोलिसांत, गिरण्यांत, किंवा लष्कर, इंदूर, धार व ब्रिटिश मुलखांतल्या फौजेंत नोकरी करतात. येतात कधीं कुळधर्म-कुळाचारांसाठीं; पण त्यांच्या-वांचून या म्हाताऱ्यांचें कांहीं अडत नाहीं."

आमच्या स्वागतासाठीं गार्ड ऑफ ऑनरच्या दोन रांगा उभ्या होत्या. पहिली लष्करी व पोलिस पेन्शनर म्हाताऱ्यांची व दुसरी तिच्या मागें त्यांच्या नातवां-पणतवंडांची. म्हातारे आपले फाटके तुटके का होईना, लष्करी खाकीचे चामड्याच्या बटनांचे कोट घालून मिशांचे आंकडे पिळून, छाती काढून उभे होते. कोणाच्या कपाळावर त्रिपुंड्र शोभत होते, तर कोणीं चंदनाचा गरगरीत टिळा व कानशिलांवर मुद्रा लावल्या होत्या. पोरेंसुद्धां स्नान करून स्वच्छ लंगोट्या घालून आलीं होतीं. सर्वत्र लष्करी स्वच्छता, टापटीप व व्यवस्था दिसत होती.

तें गांव म्हणजे त्या म्हाताऱ्यांची एक कर्मभूमि होती. पेन्शन घेतल्यावर ते कमलभक्षक होऊन स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं स्वकष्टानें शाळेची इमारत बांधली, शाळा वाढवली, इंग्रजी वर्ग सुरू केला. एक शंकराचें व एक विठ्ठलरखमाईचें देऊळ बांधलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नदीला बांध घातले, शेतांना ताली बांधल्या, बगीचा थाटला व देवळाच्या सभामंडपांत सहकारी संस्थेची कचेरी काढली. या सभामंडपांत सर्व मंडळी नित्यनियमानें जमे, सर्व प्रश्नांवर चर्चा करी व चर्चेंत जें ठरे तें सर्वजण अंमलांत आणीत. या बैठकींत 'शेतकी व शेतकरी'.व इतर मासिकें आणि रामविजय, पांडवप्रताप, भक्तलीलामृत वगैरे पोथ्या यांचें वाचन नियमानें होत असे. गांवाला येण्यास नीट रस्ता नव्हता, तो माझ्या भेटीच्या निमित्तानें तयार झाला.

म्हाताऱ्यांना भांडण्यास, गटारगप्पा करण्यास वेळ नव्हता. मात्र तरुण माणूस हा त्यांचा थट्टेचा विषय होता. त्यांच्यांत अवेळीं पेन्शनींत निघालेलीं ५०।५५ वर्षांचीं दोनचार 'पोरें' होतीं. त्यांना म्हातारे 'बच्चे लोग' म्हणत व त्यांची नेहमीं थट्टा व्हायची. म्हाताऱ्यांचें वय समजणें कठीण होतें. त्या गांवचा म्होरक्या चांगला पाउणशें वर्षांचा होता. तो २०–२५ वर्षें पेन्शन खात होता. त्याचें मी आमच्या बैठकींत कौतुक करूं लागलों. पलीकडे कोपऱ्यांत दुसरे एक बुवा बसले होते, त्यांना तें सहन झालें नाहीं. ते उठून माझ्यापुढें ताठ उभे राहिले अन् म्हणाले, "साहेब, त्या पोराला काय तुम्ही वाखाणतांय्? झालीं असतील त्याला सत्तर पाउणशें वर्षें. पण अवतार पाहा त्याचा! आतांच खोकूं लागलाय्! घाटी चढला कीं बसतोय खालीं! हीं अलिकडचीं पोरें; साहेब, यांना आमची ताकद कुठून येणार?" मीं विचारलें, "पण बुवा, तुम्ही कोण?" बुवा म्हणाले, "मी याचा काका ना? हा पोर माझ्या कडीखांद्यावर खेळलाय्, याचा काय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिमाख ? याचे दांत बघा दांत ! नुसतं बोळकं झालंय् साहेब ! मी अजून दांताखालीं कटकन् नळी फोडतों ! या पोराला वरवंटा लागतो. तो पलिकडे बसलाय पिंजारलेल्या मिशावाला. परवा पेन्शनींत आला. माझाच नातू तो." मीं आदरानें विचारलें, "मग बुवा, तुम्हीं पेन्शन किती खाल्लंत ? बुवा म्हणाले, "आठवत नाहीं नक्की. पण झालीं असतील सत्तेचाळीस अट्ठेचाळीस वर्षें. सांगा साहेब, हा माझा पुतण्या म्हातारा, तर मग मी कोण ?" मीं चटकन् उत्तर दिलें, "म्हाताऱ्याचा काका." पण त्यानंर त्या म्हाताऱ्यांच्या वयांबद्दल कौतुक करण्याचें मीं सोडून दिलें. हो, काय घ्या ? एकाद्याला म्हातारा म्हणावें अन् तो 'बच्चा' निघावा ! एकाद्याला तरुण समजावें अन् तो खरोखरीचा म्हातारा निघावा !



संध्याकाळीं मंडळी आम्हांला पोहोंचवायला गांवठाणापर्यंत आली. मोटारी सुरू होण्यापूर्वीं आम्हांला सर्वांनीं सलामी दिली. मोटारी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरोबर दोन पावलें चालत येऊन तो म्हाताऱ्याचा काका म्हणाला, "साहेब, पुढच्या वर्षी जरूर या. यंदा रस्ता घाईघाईत केला; पुढच्या सालीं बघा कसा फक्कड रस्ता बनवतों!"

मोटारी पुढें गेल्या. मी वळून पाहिलें; सारे म्हातारे छात्या काढून ताठ उभे होते, हसत होते व आम्हांला हातांनीं खुणावत होते!

अभ्यास

(अ) **डाक बंगला**—सरकारी अधिकारी फिरतीवर असतात, त्यांना उतरण्यासाठीं सरकारनें बांधलेलें घर. **पेन्शनर**—(इंग्रजी) वयाला ५५ वर्षें किंवा पूर्ण नोकरी ३० वर्षें झाल्यावर सरकारी नोकरांना घरीं बसावयास लावतात, अशा नोकराला पेन्शनर म्हणतात. घरीं बसून त्याला चरितार्थासाठीं बहुधा निम्मे वेतन सरकारांतून दरमहा मिळतें त्या 'वेतनाला' **पेन्शन** म्हणतात. **अटेन्शन**—(इंग्रजी) सावध! नीट! हा कवाईतींतील हुकुमाचा शब्द आहे. **मुद्रा**—चर्या, चेहरा. **आंवतण**—बोलावणें. (आमंत्रण या संस्कृत शब्दावरून) **फ्रंट सीट**—(इंग्रजी) पुढचें आसन, जागा. **कातळ**—लांबच लांब पसरलेला खडक. **घाटी**—चढण. **कुलधर्म**—कुटुंबांत चालू असलेला धार्मिक आचार. **गार्ड ऑफ् ऑनर**—(इंग्रजी) लष्करी पद्धतीनें सलामी देणें.

(आ) पुढील प्रश्नांचीं उत्तरें द्या—

१. म्हाताऱ्याची मुद्रा विजयी होती, ती का?

२. 'तयारी झाली' या शब्दांचा म्हाताऱ्यांच्या मनांतला अर्थ कोणता? व अधिकाऱ्यांच्या मनांतला कोणता?

३. अधिकाऱ्यांना गमतीचे अनुभव कोणते आले?

४. ह्या म्हाताऱ्या मंडळीबद्दल तुम्हांला काय वाटतें?

५. 'तें गांव, म्हाताऱ्यांची कर्मभूमि होती' म्हणजे काय? या धड्यांत बरेच इंग्रजी शब्द सहेतुक योजिलेले आहेत. त्यामुळें सूक्ष्म विनोद उत्पन्न झाला आहे. त्यांचे अर्थ समजून घ्या.

६. या धड्यांत 'ब्रिटिश मुलुख' असे शब्द आले आहेत त्यांच्या ऐवजीं आतां कोणते शब्द वापराल?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२ दीपगृह

परिचय

श्रीमती काशीताई नाटेकर यांनीं आधुनिक मराठी कवयित्रींत चांगलें नांव कमावलें आहे. यांना बालपणींच वैधव्यदशा प्राप्त झाली; पण त्यामुळें हताश न होतां त्यांनीं इंग्रजी-मराठी वाचनाचा व्यासंग वाढवून प्रासंगिक कविता पुष्कळ लिहिली आहे. त्यांचीं 'शिशुगीतें' स्वाभाविक बहलीं आहेत.

[समुद्रांत संचार करणाऱ्या लहान मोठ्या जहाजांना मार्ग-दिशा दाखविण्यासाठीं व तेथें जे लहान मोठे खडक असतात त्यांचें स्थान कळावें म्हणून जहाजांच्या मार्गावरील मोठ-मोठ्या खडकांवर उंच मनोरे उभारून तेथें दिवा लावण्याची सोय केलेली असते. अशा मनोऱ्यांना 'दीपगृहें' म्हणतात. क्वचित् समुद्रकिनाऱ्याच्या डोंगरावर अथवा किल्ल्यावरही अशीं दीपगृहें उभारलेलीं असतात.

समुद्रांतील खडकावरचें असें एक दीपगृह पाहून मनांत आलेले विचार कवयित्रीनें येथें काव्यांत गुंफले आहेत.]

उंच उंच खडकावरती । खांब पाहिला उंच अती ॥
भिडे जाउनी गगनासी । हितगुज करण्या कीं त्यासी ॥
लहान मोठे खडक किती । तुझ्या पसरले सभोंवतीं ॥
तिथें सोबती ना कोणी । भिडती लाटा येऊनी ॥
जरी एकला । उभा राहिला । कर्तव्याला ।
मुळिं न विसरला कधीं पहा । धन्य धन्य तूं दीपगृहा ॥ १ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जइं सूर्याचें साम्राज्य ।
उदासवाणें तव राज्य ॥
किती तीव्र हे रवि-किरण ।
पसरति तव शिखरीं जाण ॥
अफाट सागर तुझ्यापुढें ।
भरती येतां उंच उडे ॥
ध्यान लावुनी कीं योगी ।
तसा बैसशी या जागीं ॥
खराच ज्ञानी ।
ठेवुनि ध्यानीं ।
दिवस-यामिनी ।



मार्ग दाविसी सदा पहा । धन्य धन्य तूं दीपगृहा ॥ २ ॥

अंधार पडे घनदाट । काय पुसावा तव थाट ॥
शिखरीं छत आकाश दिसे । चंद्र तारकांसवें हसे ॥
सरल नासिकीं जशि मुरणी । दीप दिसे हा तव दुरुनी ॥
ना पोकळ रे तव थाट । वादळिं दाविशि तूं वाट ॥
संकटिं प्राणी । तुला देखुनी । तुष्ट होउनी ।
धन्यवाद तुज देति अहा । धन्य धन्य तूं दीपगृहा ॥ ३ ॥

उभा राहुनी तूं त्यांना । देशी धोक्याची सुचना ॥
जरी याल हो तुम्हि इकडे । खडक काळ हा तुम्हांपुढें ॥
जरी तुम्हांला तो न दिसे । पाण्याखालीं लपुनि बसे ॥
किति वांचविसी तूं जीव । त्यांस वाटसी तूं देव ॥
चैन टाकुनी । स्थिर राहोनी । कष्ट सोसुनी ।
मदत करीसी किती अहा । धन्य धन्य तूं दीपगृहा ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(अ) **यामिनी**—रात्र. **मुरणी**—नाकांतला दागिना; चमकी. **धन्यवाद देणें**—चांगलें म्हणणें; श्रेष्ठत्व वर्णन करणें.

(आ) १. येथें दीपगृहाचा उपयोग सांगून त्याला धन्यवाद दिले आहेत. दीपगृह शहरापासून दूर एकांत स्थळीं असतें. खडक व समुद्राच्या भव्य लाटा यांचीच त्याला सोबत. 'दिवसा वरून सूर्यकिरणांचा ताप व भोंवतालीं समुद्राचें अथांग पाणी यांच्यामध्यें तूं योग्यासारखा दिसतोस; पण लोकांना मार्ग दाखविण्याचें कामही करतोस' असें वर्णन कवयित्रीनें केलें आहे.

२. रात्रीचें दीपगृहाच्या शोभेचें वर्णन पहा. चैन टाकून, स्थिर राहून व कष्ट सोसून लोकांना मार्ग दाखविण्याचें काम दीपगृह करतें म्हणून तें धन्य म्हणजे श्रेष्ठ आहे असें म्हणून कवयित्रीनें काय सुचविलें आहे ?

---

१३ पाहुणे व पाहुणचार

परिचय

कॅप्टन गोपाळ गंगाधर लिमये हे वैद्यकशास्त्रांतले तज्ज्ञ. पहिल्या महायुद्धांत आघाडीवरच्या शुश्रूषापथकांत होते. पण जातिवंत विनोदी स्वभावामुळें त्यांनीं विनोदी लिखाणही पुष्कळ केलें आहे. शिवाय लघुकथालेखक व कवि म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

[मुंबईतलें बिऱ्हाड म्हणजे सामान्य लोकांचा तरी 'खुराड्यांतला संसार' असतो; त्यांत पाहुण्याचो भर पडली म्हणजे कसा त्रास होतो आणि शिष्टाचार म्हणून हा त्रास सोसतांना 'यजमान' आणि 'यजमानीण' यांची मानसिक स्थिति कशा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारची होते, हें येथें लेखकानें दाखविलें आहे. आगंतुकपणें प्रगट होणाऱ्या पाहुण्यांना यापासून पुष्कळ बोध घेतां येईल !]

आज बरींच वर्षें मी मुंबईस कायमचें बिऱ्हाड करून राहिलों आहे. पोस्टखात्यांत मला नोकरी आहे खरी; पण माझा मुख्य धंदा म्हणाल तर पाहुण्यांचें आदरातिथ्य करणें हा झाला आहे ! पोस्ट ऑफिसांत नोकरी करण्याऐवजीं मी शाळामास्तर जर झालों असतों व एकाद्या मुलानें "सर, बादरायण संबंध कशाला म्हणतात ?" असा प्रश्न केला असता तर मी खचित म्हटलें असतें कीं, "मुंबईस एकाद्या अनोळखी गृहस्थाकडे उतरावयास जातांना आगंतुक पाहुणा त्याच्याशीं जें नातें अगर संबंध लावतो, त्यास बादरायण संबंध म्हणतात !"

माझ्याकडे येणारे पाहुणे म्हणजे अमुक अमुक ठरलेले आहेत असें मुळींच नाहीं. दरवेळेस आपला नवा पाहुणा ! म्हणजे जुने तर आपला हक्क बुडवीत नाहींतच; पण नवे नवे मात्र येऊन चिकटतात ! डॉक्टरकडे जसा रोज नवा रोगी येतो तसाच माझ्याकडेही रोज नवीन पाहुणा अगदीं बोलावल्यासारखा ठेवलेलाच ! पण जगांत काय गंमत आहे पहा ! डॉक्टरांची ओरड आहे कीं, 'नवा रोगी यावयाचा बाजूलाच राहिला; पण जुन्यांच्या अंगीं तरी कोठें एवढा धीर व चिकाटी आहे ?' असें पाहिलें म्हणजे एक वेळ वाटतें कीं, पोस्टमास्तर अगर तात्यापंतोजी होण्यापेक्षां आपण डॉक्टर झालों असतों व आपल्याकडे उतरणारे सगळे पाहुणे रोगी असते तर काय बहार उडाली असती !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉक्टरला ज्याप्रमाणें रात्रीं अपरात्रीं देखील ध्यानीं मनीं नसतां अवचित बोलावणें येतें, तद्वतच आपणाकडे कोण्या वेळेस कोण पाहुणा येईल याचा मुळींच नेम नसतो ! आदले दिवशीं रात्रीं शेवटच्या गाडीनें एका पाहुण्याला घालवून द्यावें व आतां स्वस्थ उशिरापर्यंत झोप ताणावी म्हणून निजावें, तों दुसरा एकादा अति परोपकारी पाहुणा यजमानास कर्तव्यजागृति करून देतांना आढळतो ! केव्हां केव्हां जेवावयास बसण्याच्या अगदीं बेतांत असतांना दारांत हमालाच्या डोक्यावरून ट्रंक खालीं उतरीत असलेला पाहुणा पाहून जें काय



होतें तें माझ्यासारख्या मुंबईच्या घरंदाज मालकाला व मालकिणीलाच माहीत ! त्या वेळीं घरधनिणीची ती धुसफुस आणि कुरकुर ! अरे राम ! कपाळाला सतराशें आठ्या ! चेहरा अगदीं तोंडांत मारल्यासारखा ! भसाभसा वाढला जाणारा भात ! ताकाचें पाणी ! आणि तें पाय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपटणें ! अशा वेळीं एकाद्या सुज्ञ पाहुण्याला कसा संकोच होतो व आपण येथें कोठून आलों असें होऊन जातें ! खरें आहे. 'ब्राह्मणस्य पश्चात् बुद्धिः !'

कित्येकदां दिवा मालवून निर्धास्तपणें अंथरुणावर पडावें, इतक्यांत जिन्यावर पावलांचा आवाज ऐकूं यावा. खरोखर, पायरीगणिक छातींतील ठोके भराभर आपटूं लागतात व 'आपल्याकडे तर नाहीं कोणी येत ?' अशी भीति वाटून जीव वर खालीं होत असतो ! तशांत तुमच्या नांवाची बाहेर कोणी चौकशी करावी ! परमेश्वरा, असा प्रसंग वैऱ्यावरही न येवो ! जळफळत तडफडत एकदाचें पाहुण्याला आंत घ्यावें व ओढून ताणून कसेवसे चार कुशल प्रश्न त्याला विचारावे ! मग जी धांदल व त्रास कांहीं पुसूं नका ! इकडची खुर्ची तिकडे, तिकडचा पाळणा इकडे, याची गादी त्याला, त्याची याला; पलंग-पोसाऐवजीं एकादें फाटकें जुनें उपरणें; कांहीं-कांहीं फजिती विचारूं नका ! मोठ्या कष्टानें भीत त्याला विचारावें, 'बरें कांहीं जेवणखाण ?' अशा आणीबाणीच्या प्रसंगीं समंजस पाहुणा निष्ठुरपणा दाखवीत नाहीं ! छेः छेः कांहीं नको; सगळे कांहीं झालं आहे यथास्थित !' आपणही मग पैठणी आग्रह करण्याच्या भरीस पडत नाहीं.

माझे बहीणभाऊ, जवळच्या नात्याची व स्नेही मंडळी माझ्या-कडे उतरतातच व उतरण्याचा त्यांना हक्कही आहे; पण याच्या ओळखीनें तो, त्याच्या ओळखीनें तो—असें होत ही सांखळी इतकी वाढत जाते कीं त्यांतील दुव्यांचा पत्ताच लागत नाहीं व एकाद्या वणव्याप्रमाणें ही आग पेटत जाते ! आग फार जोराची आणि भयंकर असली तर पुष्कळदां घर पाडून जमीनदोस्त करावें लागतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहुण्यांच्या आगीचें असेंच आहे ! पाहुण्यांची आग, बिन्हाड मोडल्याशिवाय विझणें कठीण !

अनेक वेळां आपल्याला इच्छेविरुद्ध पुष्कळ गोष्टी कराव्या लागतात; पण त्यांतल्या त्यांत अगदीं नावडती बिनफायद्याची व त्रासदायक अशी कोणती एक गोष्ट असेल तर ती शिष्टाचार पाळणें ही होय. एकादा पाहुणा घरीं परत निघाला असतां, 'बराहे; ओळख–पाळख असूं द्या. नवीन परिचय आहे. वरचेवर येत जा. आल्यागेल्याशिवाय ओळख वाढणार कशी ?' वगैरे म्हणण्याचा प्रघात आहे. असा निरोप घेणें शिष्टाचाराकरितां जितकें आवश्यक आहे तितकेंच स्वतःच्या सोयीच्या अगर हिताच्या दृष्टीनें घातुक म्हटलें पाहिजे ! तितकें तें अपुष्टार्थीही आहे. कारण 'वरच्यावर येत जा' असें तुम्ही म्हणालांत काय किंवा न म्हणालांत काय, पुढच्या खेपेला पाहुणा तुमच्या येथें तळ देणारच !

अभ्यास

१. हा विनोदी लेख आहे. लेखकाचा पाहुण्यांवर खरा राग नाहीं; ज्याच्याकडे पाहुणे जावयाचें त्याची परिस्थिती कशी आहे या गोष्टीचा विचार जाणारानें करावा. हा मुख्य हेतु आहे. पाहुणचार करणें व त्यासाठीं व्यवस्था ठेवणें हेंही 'गृहस्थाचे' एक पवित्र कर्तव्य आहे अशी आपली समजूत आहे. ही अलीकडे कमी होत चालली आहे, हें लेखकानें ज्या वाक्यांत सुचविलें आहे तीं वाक्यें ओळखून काढा.

२. डॉक्टरांचा संबंध लेखकानें का आणला आहे ? ही डॉक्टरांवर टीकाच आहे हें लक्षांत येईल.

३. तुम्ही कोणाकडे पाहुणे गेल्यास कोणकोणत्या गोष्टींत सावधगिरी घ्याल तें सांगा.

४. 'बादरायण संबंध' 'पैठणी आग्रह' हे वाक्प्रचार समजून देणाऱ्या गोष्टींची माहिती मिळवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४ स्वामी विवेकानंद यांचें एक पत्र

परिचय

स्वामी विवेकानंद हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील एक वीर वृत्तीचे संन्यासी साधु पुरुष होते. ते प्रथम नास्तिक होते. पण सुप्रसिद्ध बंगाली सत्पुरुष रामकृष्ण परमहंस यांच्या कृपेनें त्यांना दिव्य ज्ञान प्राप्त झालें. त्यानंतर त्यांनीं आपलें सारें आयुष्य वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन आणि त्यांचा जगभर प्रसार करण्यांत घालविलें. भौतिक सुखाच्या मागें लागलेल्या आणि पैसा हाच परमेश्वर मानणाऱ्या अमेरिकेसारख्या देशांत त्यांनीं वैदिक धर्माचा झेंडा नेऊन रोविला. त्यांनीं उपदेशलेला हा धर्म माणसाला निष्क्रिय बनविणारा नसून "केल्यानें होत आहे रे आधीं केलेंच पाहिजे" ह्या रामदास स्वामीच्या वचनाप्रमाणें माणसाला कार्यप्रवण करणारा होता. भारतीय जनतेचे दोष तर त्यांनीं अनेक वेळां मोठ्या कळवळ्यानें दाखवून तें घालविण्याविषयीं परोपरीनें सांगितलें आहे.

त्यांच्या एका मित्रानें एक मासिक पुस्तक काढण्याचें योजून त्यांचा सल्ला विचारला. त्याला त्यांनी पाठविलेलें पत्र पुढें दिलें आहे.

मूळ पत्र इंग्रजींत असून त्याचा हा अनुवाद आहे.

स्विट्झर्लंड
ता. २६ ऑगस्ट ९६

प्रिय—

आपलें पत्र आतांच मिळालें. मी सध्यां फिरतीवर आहे. सध्यां मी डोंगराळ प्रदेशांत फिरत आहे. आल्प्स पर्वतांत मीं बराच प्रवास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला. आणि जर्मनीला जाण्याच्या तयारींत आहें. डयूसन यांनीं कील येथें मला भेटीला बोलाविलें आहे. तेथून मी इंग्लंडला जाईन. येत्या हिंवाळ्यांत बहुधा मी तिकडे येईन.

—मासिकासाठीं तयार केलेलें ब्रीदवाक्याचें चित्र मला आवडलें नाहीं. तें बेढब तर आहेच; पण त्याशिवाय त्यांत कित्येक गोष्टी निरर्थक घुसडून दिल्या आहेत. अशा प्रकारचें चित्र शक्य तितकें साधें, लहान आणि विशेष हेतूचें दर्शक असें असावें. चित्र पाहिल्याबरोबर त्यांतील भाव लक्षांत आला पाहिजे. बाकीचें काम ठीक चाललें आहे, हें मी मोठ्या आनंदानें कबूल करतों.

मला एका गोष्टीबद्दल मात्र कांहीं कानमंत्र सांगावासा वाटतो. हिंदुस्थानांतील दहापांच मनुष्यें एकत्र होऊन कांहीं उद्योग करूं लागलीं म्हणजे जी एक चूक बहुधा नेहमीं करतात, ती चूक त्यांना शेवटीं गोत्यांत घालून कार्याचाही फडशा पाडते. आमच्यांत अद्यापि खऱ्या व्यापारी तत्त्वाचा प्रवेशच झालेला नाहीं. धंदा म्हटला कीं तो धंदाच. तोच त्या वेळीं परमेश्वर. त्यांत स्नेहसंबंध आड येतां उपयोगी नाहीं. हें लक्षण आम्हां हिंदूंत अद्यापि आढळत नाहीं. 'हा माझा अमका; याची भीड कशी मोडावी?' 'हे कोण बायकोचे साले। तुपावेगळा घांस न गिळे।' अशा प्रकारच्या भिडेचें दडपण एखाद्या उद्योगावर पडलें कीं, त्याखालीं त्याचा सारा चुराडा होण्याला वेळ किती. असली भिकारी लाज प्रथम सोडून द्या. हिशेब नेहमीं चोख राखीत जा. आपल्या ताब्यांत जें कांहीं द्रव्य असेल त्याचा हिशेब पै पर्यंत बरोबर ठेविला पाहिजे. ज्या कार्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जें द्रव्य जमा झालें, त्याचा उपयोग त्याच कार्याला झाला पाहिजे. उपाशीं मरण्याची वेळ आली तरी प्राणरक्षणार्थसुद्धां त्यांतल्या दमडीलाही बोट लावूं नये. त्या एका कार्याखेरीज दुसऱ्या कशाकडेही त्यांतील एक कवडीसुद्धां वेंचतां उपयोगी नाहीं. याला म्हणतात धंद्यांतला चोखपणा. हा आमच्या अंगीं केव्हां येणार? भीड तोडावयाला आम्ही केव्हां शिकणार?

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे चिकाटी. जी गोष्ट हातीं धरली, तिला एकसारखें चिकटून राहावयाचें. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं ती एकच गोष्ट, त्याच गोष्टीची अव्यभिचारी भक्ति करावयाची. ती गोष्ट सोडून मन दुसरीकडे भरकलें कीं व्यभिचाराचें पातक घडलेंच. हें मासिक हाच आतां तुमचा परमेश्वर. अशी भक्ति असली तर यश तुमचेंच आहे हें काय निराळें सांगावयास पाहिजे?

हें मासिक यशस्वी झालें म्हणजे असाच प्रयत्न देशी भाषांतूनहि सुरू केला पाहिजे. तामीळ, तेलगु, कानडी इत्यादि भाषांत नवीं मासिकें अगर पत्रें सुरू केलीं पाहिजेत. मद्रासी लोक हुशार आहेत आणि त्यांच्यांत कर्तबगारीही आहे. पण ज्या भूमींत आद्य श्रीशंकराचार्यांचा जन्म झाला, त्या भूमींतून संन्यस्तवृत्ति मात्र सध्यां पळून गेल्याचें दिसतें.

आपल्यांतील ही वृत्ति मावळली असल्यामुळेंच जागोजाग खाडे पडले आहेत. माझ्या मुलांनीं हे खाडे भरून काढले पाहिजेत. त्यांनीं संसारावर पाणी सोडिलें पाहिजे. इतकें झालें तरच पुढील इमारतीचा पाया तयार होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां कार्याला लागा. चित्रासारख्या किरकोळ बाबींकडे लक्ष्य देण्यास आपणांस फुरसत कोठें आहे? घोडा आपल्या हस्तगत झाला म्हणजे त्याचा लगामही हातीं येईल. एखाद्या क्षुल्लक गोष्टीसाठीं मोठें कृत्य लांबणीवर टाकूं नये. मी सदोदीत तुमच्या सन्निध आहेंच. यासाठीं कसलीही भीति मनांत न बाळगितां उद्योग करीत जा. मी गेलों तरी माझा जीवात्मा तुमच्या सन्निध राहीलच. बाळांनो, देह आज आहे उद्यां नाहीं. संपत्ति, कीर्ति आणि इतर भोग्यवस्तु यांत तरी चिरकाल टिकणारें काय आहे? आपले सर्व व्यवहार मृत्यूच्या मुखांतच चालू आहेत. मग संसारपंकांत राहून किड्यासारखें मरण्यापेक्षां सत्यासाठीं लढत असतां धारातीर्थीं वीराला उचित असें मरण तरी मिळवूं या. व्हा तर पुढें!

अभ्यास

(अ) **ब्रीदवाक्य**—व्रत कोणतें हें दाखविणारें वाक्य. एकदा पत्रकार आपण कोणतें व्रत–धोरण किंवा हेतु ठेवणार हें उघड करून त्याचा बोध ज्यावरून होईल असें एखादें वाक्य अगर चित्रही पत्राच्या अग्रभागीं छापतो तें. **निरर्थक**—अर्थ नाहीं असें. **कानमंत्र**—गुप्त गोष्ट, इतरांना कळूं नये अशा रीतीनें सांगितलेली महत्त्वाची गोष्ट. **गोत्यांत घालणें**—नुकसान करणें. **फडशा पाडणें**—नाश करणें. (संपविणें). **अव्यभिचारी भक्ति**—एके ठिकाणींच पूज्यभाव अथवा प्रेमभाव ठेवणें. **व्यभिचार**—अनेक ठिकाणीं प्रेम ठेवणें. **संन्यस्त वृत्ति**—संसारांतील किंवा ऐहिक गोष्टीविषयीं लोभ सोडणें. **पाणी सोडणें**—त्याग करणें (दान देतांना, ज्याला तें द्यावयाचें त्याच्या हातावर पाणी सोडण्याची रीत त्यावरून.) **भोग्यवस्तु**—संसारांत खाणें पिणें, वस्त्रप्रावरण इत्यादीसाठीं लागणाऱ्या वस्तु. **धारातीर्थ**—समरांगण (लढाईची जागा).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(आ) (१.) पुढील वाक्यांचा अर्थ समजावून घ्या.—

"हें कोण बायकोचे साले । तुपा वेगळा घास न गिळे ॥"

"ज्या भूमींत आद्य शंकराचार्यांचा जन्म झाला त्या भूमींतून संन्यस्त वृत्ति मात्र सध्यां पळून गेल्याचें दिसतें"

"माझ्या मुलांनीं हे खाडे भरून काढले पाहिजेत."

"आपले सर्व व्यवहार मृत्यूच्या मुखांत चालू आहेत."

(२) कांहीं मासिकें व वर्तमान पत्रें यांचीं द्वीदवाक्यें मिळवा व त्यांवरून त्यांचें धोरण कोणतें तें ओळखा.

(३) हिंदुकडून कोणती चूक होत असते? व तिचे परिणाम कार्यावर कोणते होतात? धंद्यांतला चोखपणा कोणता? संसारावर पाणी सोडावयाचें म्हणजे काय करावयाचें? हें पत्र ज्याला उद्देशून लिहिलेलें आहे त्याच्या मनांत कोणते विचार आले असतील व त्यानें उत्तर काय दिलें असेल तें कल्पनेनें ठरवून लिहून काढा.

---

१५ घाल घाल पिंगा वाऱ्या!

परिचय

श्री. कृ. ब. निकुम्ब हे नाशिककडचे एक श्रेष्ठ दर्जाचे कवि आहेत. यांचा नव्या-जुन्या मराठी वाङ्मयाचा व्यासंग दांडगा असून त्यांच्या कवितेंत भावनेचा ओलावा व आत्मप्रत्यय असलेला दिसून येतो. 'उज्ज्वला' हा यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे.

[एक नुकतेंच लग्न झालेली सासुरवाशीण माहेरची आठवण करीत आहे. व वाऱ्यास विनवीत आहे कीं, 'तूं माझ्या माहेरीं जा व माझें कुशल व निरोप आईला सांग' ही कल्पना किती प्रेमळ व काव्यमय आहे!]

(छन्द—लवंगलता.)

घाल घाल पिंगा वाऱ्या, माझ्या परसांत,
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" सुखी आहे पोर " —सांग आईच्या कानांत
" आई, भाऊसाठीं परी मन खन्तावतं !
विसरली का ग ? —भादव्यांत वर्स झालं
माहेरींच्या सुखाला ग मन आंचवलं !
फिरुन् फिरुन् सय येई जीव वेडावतो
चन्द्रकळेचा शेव ओला चिंब होतो
काळ्या कपिलेची नन्दा खोडकर फार
हुंग हुंगुनीयां करी कशी ग बेजार !
परसांत पारिजातकाचा सडा पडे
कधीं फुलं वेंचायाला नेशील तूं गडे ?
कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय
माया माझ्यावर दाट जशी तुझी माय... !
आले भरून डोळे पुन्हा गळा नि दाटला !
माउलीच्या भेटीसाठीं जीव व्याकुळला !
घाल घाल पिंगा ! वाऱ्या माझ्या परसांत
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात !

अभ्यास

(१) बालपणापासून आईच्या मायेखालीं वाढलेली मुलगी लग्न होतांच **परघरीं** जाते. तेथें तिला माहेरच्या आठवणी वारंवार झाल्याशिवाय कशा राहतील ? निदान पूर्वी जेव्हां बालवयांत लग्नें होत असत तेव्हां तर या आठवणींनीं मुलींचीं अंतःकरणें भरून येत असत. येथें या मुलीनें वाऱ्याला पहिल्यानें मी सुखी आहें, असें आईला सांगण्यास सुचविलें आहे. पण लगेच आईच्या कानांत सांगायला काय सांगितलें आहे तें पाहा. म्हणजे तिला माहेरची व तेथील सुखाची कशी आठवण होत आहे हें समजेल. आईची माया येथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे नव्या घरीं अनुभवायला सांपडत नाहीं म्हणून दुःखभारानें तिचे डोळे भरून येतात व गळा दाटतो. तिला आईच्या भेटीची किती आतुरता वाटत आहे पाहा. आईची माया सासरच्या सासूसासऱ्यांना कशी येणार ?

(२) माहेरीं त्या मुलीला कोणत्या गोष्टी सुखकारक वाटतात तें सांगा.

(३) आईच्या मायेला कपिलेच्या दुधावरील साईची उपमा दिली आहे ती किती समर्पक आहे ह्याचा विचार करा.

(४) तुम्ही आईबापांपासून दूर शिकण्यासाठीं वसतिगृहांत आहांत असें समजून घरच्या कोणत्या आठवणी येतील तें लिहा.

---

१६ प्रायश्चित्तानें नवा जन्म

परिचय

लेखक. श्री. गोविंद सखाराम सरदेसाई हे बडोद्याचे कै. सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या कारकीर्दीत राजपुत्रांचे शिक्षक म्हणून बरींच वर्षें बडोद्यांत नोकरीनिमित्त होते. तेथेंच त्यांना मराठ्यांच्या इतिहासाची गोडी लागली. आणि त्यांनीं सर्व उपलब्ध साधनांवरून सबंध मराठेशाहीचा इतिहास तयार केला. शिवाय त्यांच्या मुसलमानी व ब्रिटिश रियासतीही प्रसिद्ध आहेत.

[नेताजी पालकर हा शिवाजी महाराजांच्या बालपणच्या स्नेह्यांपैकीं एक कर्तबगार वीर होता. पण तो मोठा मानी असल्यामुळें एकदां क्षुल्लक कारणावरून त्याचा महाराजांशीं बेबनाव होऊन तो महाराजांची चाकरी सोडून शत्रुपक्षास जाऊन मिळाला. त्या कालांत अशा गोष्टी वारंवार घडत असल्यामुळें माणसाची पारख करण्याचें काम कठीण होत असे. शिवाजी महाराजांना माणसाची पारख करण्याची कला चांगली अवगत होती, म्हणूनच त्यांचा निभाव लागला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हाच पालकर पुढें अचानक येऊन महाराजांना कसा मिळाला आणि परधर्मांत गेलेल्या माणसाला शुद्ध करून घेण्याचें संग्राहक धोरण महाराजांनीं कसें अवलंबिलें हें या ऐतिहासिक घटनेंत पाहावयास मिळतें.]

नेताजी पालकराचें नांव शिवाजी महाराजांचा एकनिष्ठ सेवक म्हणून मराठी इतिहासांत प्रसिद्ध आहे. महाराजांनीं बालमित्र जमवून स्वराज्याचा उद्योग चालू केला, त्या वेळेपासून नेताजी त्यांजबरोबर होता. धाडस, कल्पना, हूल दाखवून शत्रूस गोत्यांत आणण्याची कला, हे त्याचे गुण राष्ट्रसंवर्धनाचे कार्यांत विशेष उपयोगांत आले. महाराजांच्या आरंभींच्या हालचालींत तो केवळ त्यांचा उजवा हात बनला होता. अष्ट-प्रधानांच्या नेमणुका एकेक होऊं लागल्या, त्यांत महाराजांनीं नेताजीस पहिला सरनोबत नेमलें. अफझलखान प्रकरण, शायिस्ताखानावरील छापा, पुरंदरचें युद्ध इत्यादि प्रकरणांत नेताजी महाराजांबरोबर होता. पण दोघांचा बेबनाव होऊन तो महाराजांची नोकरी सोडून गेला तो प्रकार असाः—पन्हाळ्यावर युद्ध चाललें असतां एके दिवशीं रात्रीं महाराज गडावरील शिबंदीचे पहारेकरी अहोरात्र जागून कामें बरोबर करताहेत कीं नाहीं हें पाहण्यास गेले. एक असामी त्यांस गैरहजर दिसला. दुसऱ्या दिवशीं महाराजांनीं त्याची एक महिन्याची गैरहजिरी मांडावी असा हुकूम केला. हा इसम नेताजीचा मेहुणा होता. नेताजीला हें कळतांच त्यानें महाराजांस भेटून विनंति केली, 'आमचे मेहुण्याचा हा गुन्हा माफ करावा.' महाराज म्हणाले, 'नेताजी, आमचा हुकूम मागें फिरणार नाहीं. वास्तविक या गुन्ह्यास याहून जास्तच कडक शिक्षा देणें योग्य झालें असतें.' नेताजीनें पुष्कळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रदबदली केली. पण ती महाराजांनीं मानली नाहीं. तेव्हां नेताजी म्हणाला, 'जिथें आमच्या शब्दास एवढाही मान नाहीं, त्या धन्याची नोकरी आम्हीं काय म्हणून करावी? हाच आमचा रामराम!' असें म्हणून नेताजी चालता झाला. महाराजांनींही त्याची परवा केली नाहीं. 'अभिमानभृतांवरः' म्हणजे नेताजी मोठा मानी होता असें परमानंद सांगतो.

महाराजांवर ह्या वेळीं मोठा कठीण प्रसंग होता. मिर्झाराजा जयसिंग व दिलेरखान चालून आले. महाराज त्यांस शरण गेले आणि बादशहाचे भेटीस आग्र्यास जाण्यास सिद्ध झाले. लगेच जयसिंगानें विजापुरावर मोर्चा वळविला. उघड युद्ध सुरू होऊन विजापुरच्या सुलतानाची तारांबळ उडाली. इतक्यांत त्याला कळलें कीं, नेताजी शिवाजीवर रुष्ट होऊन दुसरा धनी पाहत आहे. विजापुरकरांनीं लगेच त्यास भलें मोठें बक्षीस देऊन आपल्या पदरीं घेतलें. नेताजीनें विजापुरचा बचाव अशा चातुर्यानें केला कीं, नेताजी म्हणजे प्रतिशिवाजी, तो ज्या पक्षांत आहे त्याच्याशीं युद्ध करून आपला निभाव लागणार नाहीं, अशी जयसिंगाची खात्री झाली.

अशा स्थितींत जयसिंगानें आपले दूत पाठवून नेताजीस कळविलें, "तुम्ही मोगलांचे नोकरींत या; म्हणजे आमच्यासारखी तुमची बडेजाव बादशहा करतील." ती विनंति मान्य करून नेताजी जयसिंगास भेटला. बादशहानें त्यास मोठें बक्षीस व पांचहजारी मनसब करून जयसिंगाचे हाताखालीं नेमलें. दक्षिण देश जिंकायचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर शिवाजीच्याच तोडीचा गनिमी कावा खेळणारा सेनानी जवळ असल्याशिवाय आपला उद्योग सिद्धीस जाणार नाहीं, असा विचार करूनच बादशहा व जयसिंग यांनीं मुद्दाम नेताजीस जवळ आणिलें. उभयतांस मोठा आनंद झाला.

कांहीं वर्षें गेलीं. महाराज दक्षिण दिग्विजयाची तयारी करीत असून त्यासाठीं विजापुरावर शह बसवीत होते. इकडे बादशहानेंही आपला सेनापति बहादूरखान यास विजापुरचें राज्य जिंकण्यास रवाना केलें. तेव्हां विजापुरकरांची तारांबळ उडून कठीण प्रसंग जाणून त्यांनीं शिवाजीचें साह्य मागितलें. शिवाजी महाराज त्या वेळीं पन्हाळ्याचे बाजूस होते. एके दिवशीं सकाळीं त्यांचे भेटीस एकदम एक अपरिचित मुसलमान गृहस्थ आला. त्याचें व महाराजांचें खालीलप्रमाणें संभाषण झालें :—

शि०—कोण तुम्ही ? तुमचें नांव काय ? कां आलां आहांत ?

मु०—मी एक औरंगजेब बादशहाचा दूत आहें. माझें नांव महंमद कुलीखान. आपलें नांव ऐकून पदरीं नोकरी मागण्यास आलों आहें.

शि०—तुमचा आवाज ओळखीचा दिसतो; पूर्वीं कधीं आपण भेटलों होतों काय ?

मु०—आहे पूर्वींची थोडीशी ओळख. अपराध माफ होईल तर सांगतों.

शि०—नेताजी पालकरासारखे तुम्ही दिसतां; पण हें मुसलमानी नांव व वेष, ही लांब दाढी, हें काय गूढ ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मु०—(गहिंवरानें महाराजांचे पाय धरून) तोच मी महाराज आपला नेताजी! मूर्खपणा करून या पायांस अंतरलों, त्यामुळें फार कष्ट भोगले. अत्यंत पश्चात्ताप झाला. अशा स्थितींत तारतील तर हे पायच तारतील असा निश्चय करून दर्शनास आलों. दर्शन झाल्यानें आतां केवढें समाधान झालें म्हणून सांगूं!

शि०—थोडीबहुत वेडीवांकडी बातमी तुमच्या संबंधानें आमच्या कानांवर आली होती; पण खरा प्रकार कसा समजणार! अफगाणिस्तानांत होतां ना तुम्ही?

नंतर नेताजीनें महाराजांवर रुसवा करून गेल्यानंतरची आपली कहाणी सांगितली; तेव्हां त्यांनीं विचारलें, 'मग तुम्ही एकटेच इकडे कसे येऊं शकलां?'

ने०—आपण राज्याभिषेक केल्याचें ऐकून बादशहाचें मन अत्यंत अस्वस्थ झालें. त्यांनीं दिलेरखानास मसलतीस बोलावून आपणांस जिंकण्याचा पुष्कळ खल केला. खानानें त्यांस कळविलें, "शिवाजीसारखाच दक्षिण प्रदेशाची भरपूर माहिती असलेला कोणी तरी विश्वासू सेनानी हाताशीं असेल तरच शिवाजीला जिंकतां येईल." त्यावरून बादशहाला या 'महंमद-कुली'चें स्मरण होऊन त्यांनीं मला जवळ बोलावून विचारलें, 'खान, तुम्ही आतां सर्वस्वीं आमचे प्यार आहां; जर शिवाजीमहाराजांस पकडून आणण्याचा आमचा मनोरथ सिद्धीस न्याल तर मागाल तें बक्षीस देऊं.' त्यावर मीं विनंति केली 'हजरत, मजवर आपला भरंवसा असेल तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मागतों तें साहित्य द्या, म्हणजे मी आपली कामगिरी मनाजोगती करून दाखवितों.' लगेच बादशहांनीं दिलेरखानास बोलावून आम्हांस जरूर तें सर्व सामान देऊन दक्षिणेंत रवाना केलें. दिलेरखानाबरोबर आम्ही मोठ्या तयारीनें चालून आलों. तो बहादूरखान पेंडीचें गुरूं, नालायक ठरून परत गेला. आतां सर्व मुखत्यारी दिलेरखानाकडे आहे. येथून जवळच आज खानाचा मुक्काम आहे.

शि०—एकूण आज तुम्ही आम्हांस पकडून खानाचे हवालीं करणार तर !

ने०—आपल्यासारख्या थोर विभूतीला अपाय करण्याची ताकत कोणा मानवाची आहे ! प्रत्यक्ष बादशहा देखील आपलें नांव ऐकून कापूं लागतो, मग माझी काय प्राज्ञा !

शि०—मग तुम्ही बादशहाचे नोकर आमचे भेटीस कां आलांत ?

ने०—दिल्लीहून निघाल्यापासून मनाला चैन कसें तें बिलकूल नाहीं. महाराजांस पकडून देण्याचा विडा उचलून निघालों खरा, पण मन सारखें जिवास खात होतें ! शेवटीं काल मनाचा निश्चय केला कीं, आतां तारणार मारणार सर्व आपण; हे प्राण आपल्या सेवेस अर्पण केले. काल खानास कळविलें, 'महाराज कोठें कसे आहेत त्याची माहिती काढून आणतों. मग पुढील विचार ठरवूं.' पहांटेचा उठून निघालों, तो हा आपल्यासमोर आहें. इतःपर हा देह आपला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शि०—शाबास नेताजी! तुमच्यासारखे राजभक्त आम्हांस लाभतात यावरून आपल्या मराठी राज्याचे भाग्य जोरांत आहे असें खचित वाटतें. पण तुम्ही आतां मुसलमान आम्हां हिंदूंची सेवा कशी करणार?

ने०—तीच तर मोठी पंचाईत उभी राहिली आहे. यास उपाय आपणच काय तो काढूं शकाल.

शि०—प्रायश्चित्त घेऊन स्वधर्मांत येण्याची खुशी असेल तर तसा प्रयत्न करतां येईल. पण तुमचीं आतां बायकामुलें मुसलमान आहेत ना? त्यांची काय वाट?

ने०—त्यांची नको काळजी! ती मंडळी दिल्लींत एका नातेवाइकाकडे आहेत. त्यांचें नांव टाकलें म्हणजे झालें! आतां वय झालें. संसारपाशही तुटले आहेत. आपल्या सेवेचें पुण्य पदरीं पडलें म्हणजे माझी इहलोकची सर्व कमाई झाली!

असें बोलणें झाल्यावर अल्पावकाशांतच महाराजांनीं शास्त्रीपंडित जमवून नेताजीस प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेतलें. 'आषाढ वद्य ४ शके १५९८ (ता. १९ जून सन १६७६) राजश्री नेताजी पालकर यांनीं प्रायश्चित्त घेतलें, शुद्ध झाले.' असा लेख जेधे-शकावलींत आहे.

नेताजीनें पुढें शिवाजीचे सेवेंत उर्वरित आयुष्य वेचलें. शिवाजीच्या पश्चात् त्यानें संभाजीची सेवाही मोठ्या निष्ठेनें केली. अकबर म्हणून जो औरंगजेबाचा पुत्र बापाविरुद्ध बंड करून पुढें संभाजीचे आश्रयास आला, त्याच्या तजविजीसाठीं संभाजीनें नेताजीस नेमून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलें. मुसलमानी भाषा, दरबारी रिवाज व जगाचा अनुभव नेताजीस भरपूर असल्यामुळें त्या शहाजाद्याची तैनात सांभाळण्यास त्याच्या इतका दुसरा लायक इसम संभाजीस मिळाला नसता. पुढें लवकरच नेताजी मरण पावला.

अभ्यास

(अ) **राष्ट्रसंवर्धन**—राष्ट्राची वाढ करणें. **गोत्यांत आणणें**—संकटांत पाडणें. '**अभिमानभृतांवर**'—(संस्कृत) अभिमान बाळगणारांत श्रेष्ठ, म्हणजेच मोठा मानी. **मोर्चा वळविणें**—तोंड फिरविणें. त्याचे मूळचे अर्थ-तोफांचा मारा, तोफांची मांडणी, तोफा डागण्यासाठीं तयार केलेली उंच जागा असे आहेत. 'मोर्चा लावणें' म्हणजे तोफा डागणें असाही अर्थ आहे. **मनसब**—(अरबी) अमुक इतक्या घोडेस्वारांचें पथक ठेवण्याचा अधिकार व त्यासाठीं दिलेली जहागीर. **मुखत्यारी**—पूर्ण अधिकार. **विभूति**—महापुरुष; ऐश्वर्यवान पुरुष, **प्रायश्चित्त**—पाप नाहींसें व्हावें म्हणून केलेलें कर्म (उपवास, दान, तप इत्यादि.) **जेधे शकावली**—शिवाजीच्या वेळच्या 'जेधे' नांवाच्या सरदारांकडची महत्त्वाच्या गोष्टी सालवार लिहून ठेवलेली वही.

(आ) १. नेताजी महाराजांना सोडून गेला याबद्दल तुम्हांला काय वाटतें? तो पुन्हा महाराजांकडे कां आला? शिवाजी महाराजांनीं प्रत्येक वेळीं दाखविलेल्या वृत्तीचें स्पष्टीकरण करा. बजाजी निंबाळकर यालाही शिवाजी महाराजांनीं शुद्ध करून घेतलें होतें, ती गोष्ट माहीत करून घ्या.

२. ह्या धड्यांत आलेले वाक्प्रचार सांगा व तुम्ही स्वतः त्यावरून वाक्यें बनवा.

३. 'पेंडीचें गुरूं' म्हणजे काय? हे शब्द कोणाला लावले आहेत? कां?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७ सारनाथ

श्री. गोविंद चिमणाजी भाटे हे जबरे प्रवास करणारे होते. त्यांनीं हिंदुस्थानांत तर सर्वत्र प्रवास केलाच; पण उतारवयांत ते युरोपचाही प्रवास करून आले होते. या आपल्या प्रवासाचीं वर्णनेंहि त्यांनीं प्रसिद्ध केलीं असून त्यांना मराठी भाषेंतील अशा प्रकारच्या पुस्तकांत मानाचें स्थान मिळालें आहे.

[सारनाथ हें बौद्धधर्मीयांचें एक पवित्र क्षेत्र आहे. तेथल्या अशोक स्तंभाची प्रतिकृति हीच आतां भारताच्या बोधचिन्हाच्या जागीं अधिष्ठित झाली आहे. अशा या सारनाथ क्षेत्राची व तेथल्या पुराण-वस्तु-संग्रहालयाची थोडी जुनी नवी माहिती या धड्यांत आली आहे.]

सारनाथ काशी शहराच्या उत्तरेस पांच मैलांवर आहे. पण ' हिंदुविश्वविद्यालया ' पासून सुमारें दहा मैल दूर पडतें. मी ता. ३ एप्रिल सन १९३५ रोजीं सकाळीं सात वाजतां टांगा करून निघालों, तो सवाआठ वाजतां सारनाथ येथें येऊन पोहोंचलों. उत्तरेकडे वारणा नदीपर्यंत काशी शहराचा भाग लागतो. मग मात्र हिरवींगार शेतें व बागा लागतात. रस्ता बऱ्यापैकीं असून त्याचे दोन्ही बाजूंस सुंदर आंब्यांचीं झाडें लावलेलीं आहेत. त्यामुळें वाईच्या नजीकच्या रस्त्याची आठवण झाली.

एका सावलीच्या झाडाखालीं टांगा थांबला व मी टांग्याबाहेर आलों, तोंच तांबड्या दगडाची नवीन सुंदर इमारत दिसली. हीच पुराणवस्तुसंग्रहालयाची सरकारी खात्यानें बांधलेली इमारत होय. ही इमारत मुद्दाम बुद्धविहाराच्या पद्धतीची बांधली आहे. सध्यां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चौकापैकीं तीन दालनें बांधलीं आहेत. तीन-दालनी इमारतीपुढें हिरवीगार हिरवळ केली आहे व खुजा भिंतीप्रमाणें दिसणारी झुडुपांची कुंपण केली आहे. ती तांबडी लाल नवीन इमारत व तिच्या समोरची ती साधी हिरवीगार बाग हा देखावा फारच मनोहर आहे व तो संग्रहालयामध्यें ठेवलेल्या अप्रतिम कलाकृतिनिधीच्या प्रसादचिन्हा-प्रमाणें वाटला. संग्रहालयाचे व्यवस्थापक नायर नांवाचे तरुण गृहस्थ आहेत. त्यांना मी भेटलों व त्यांनीं मला सर्व संग्रहालय सविस्तरपणें दाखविलें.

या संग्रहालयांत सारनाथ येथें सांपडलेल्या एकंदर ४००० वस्तु आहेत ! त्या ख्रिस्ती शकापूर्वीं तीनशें वर्षांपासून ते सन १२०० पर्यंतच्या काळच्या आहेत. त्या वेळीं सारनाथ या पवित्र स्थानाची जाळपोळ व नायनाट करण्यांत आला व सारनाथ हें पवित्र स्थान नामशेष झालें. त्याचा शोध प्रथमतः सन १९०४ मध्यें लागला. तेव्हां-पासून पुराणवस्तुसंशोधन खात्यानें त्या सर्व भूमिभागावरील सांठलेली माती व उकिरडा उकरून बुद्धकालीन विहारांचे व मंदिराचे अवशेष खुले केले व तेथें सांपडलेल्या नानाविध वस्तूंची नव्या बांधलेल्या संग्रहालयांत कालक्रमानें मांडणी केली. येवढ्या मोठ्या संग्रहालयांतील वस्तूंचें सविस्तर अवलोकन थोड्या वेळांत होणें शक्य नसतें. यामुळें कांहीं थोड्या वस्तु बारकाईनें पाहून मग बाकींच्या-वर ओझरती नजर टाकणें येवढेंच दृश्यदर्शकाला शक्य असतें व तोच मार्ग मीं स्वीकारला. पण या संग्रहालयामधल्या पद्धतशीर मांडणीप्रमाणें कलाकौशल्याच्या दृष्टीनें अप्रतिम असलेल्या वस्तुंचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संग्रह इमारतीच्या मधल्या व मुख्य दिवाणखान्यांत केला आहे, ही दृश्यदर्शकाची मोठी सोय झालेली आहे.

या दिवाणखान्यांत पाऊल टाकण्याबरोबर प्रवाशाचें मन आकर्षण करणारी कलाकृति म्हणजे अशोकस्तंभाच्या माथ्यावरील सिंहाची चौकडी होय. किती हुबेहुब या सिंहाच्या मूर्ति आहेत ! यांकडे सारखें पाहत राहावेसें वाटतें. या स्तंभाचें सर्वच काम कमालीच्या कलाकौशल्याचें आहे ! हे स्तंभ सात आठ फूट उंच आहेत व त्याचे तीन भाग पडतात. पहिला व खालचा भाग पैलू पैलूंचा असून तो घंटेच्या आकाराचा आहे. पैलू किती प्रमाणांत व सफाईनें खोदलेले आहेत ! त्याचेवर चौकोनी चबुतऱ्यासारखा भाग आहे. त्या चौकोनी दगडाच्या मधोमध फार सुबक असें चक्र कोरलें आहे. हें चक्र बौद्ध धर्माचें चिन्ह होय. या चक्राचे बाजूस सिंह, हत्ती, घोडा व बैल अशा चार प्राण्यांचीं चित्रें खोदलीं आहेत व या चबुतऱ्याचे वर चारी बाजूंस चार पूर्णप्रमाण सिंहाचीं चित्रें खोदलेलीं आहेत ! खरोखर अशोकस्तंभाचा अलंकार म्हणजे हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचा एक अप्रतिम मासला होय यांत शंका नाहीं.

या दिवाणखान्यामध्यें व्यवस्थेनें लावून ठेवलेल्या व सारनाथ येथें सांपडलेल्या कलाकृति सर्वच इतक्या उत्कृष्ट आहेत कीं, प्रत्येक कलाकृतीकडे सारखें पाहत बसावेसें वाटतें. पण आपला मार्गदर्शक व आपलें घड्याळ आपल्याला पुढें पुढें ओढीत नेतें व नाइलाजानें आपल्याला पुढें जावें लागतें. येथें बुद्धाच्या उभ्या, बसलेल्या व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ध्यानस्थ असलेल्या पुष्कळ मूर्ति आहेत. त्यांमध्यें बुद्धाला ब्रह्म-साक्षात्कार झाल्यावर त्यानें सारनाथ येथें जो पहिला धर्मोपदेश केला त्याचें निदर्शक असें एक चित्र आहे. हें चित्र सिंहाच्या चित्राप्रमाणें बौद्ध-कालीन मूर्तिकलेचा एक अप्रतिम मासला आहे, यांत शंका नाहीं.

तिसरा एक अप्रतिम कलाकृतीचा मासला म्हणजे बुद्धाचा साक्षात्कारपूर्वींचा उभा प्रचंड पुतळा होय. हा पुतळा तांबड्या दगडाचा आहे. या पुतळ्याचें कामही विशेष वाखाणण्यासारखें आहे. पण या पुराणवस्तुसंग्रहालयामध्यें इतक्या प्रेक्षणीय वस्तु आहेत कीं, त्यांचें सविस्तर बारकाईनें अवलोकन करण्यास सारनाथ येथें दिवसचे दिवस घालविले पाहिजेत. पण माझ्यासारख्या दोन चार तासांच्या आंत परत जाणाऱ्या प्रवाशाला सर्व कलाकृतींकडे ओझरती नजर टाकण्याखेरीज मार्ग नाहीं. मलाही तोच मार्ग स्वीकारावा लागला.

पदार्थसंग्रहालय पाहून झाल्यावर आम्ही बाहेर आलों. पदार्थ-संग्रहालयाचे मागेंच सारनाथ येथील उकरून काढलेल्या भूमिभागांत जुन्या इमारतींचे अवशेष सांपडले आहेत, तिकडे आम्ही गेलों. तेथें गेल्यावर मला तक्षशिला व नुकत्याच पाहिलेल्या मोहोंजदारो या स्थळांची आठवण झाली. सारनाथ येथें पूर्वकाळीं बुद्धधर्मी भिक्षूंची मोठीच वसाहत होती असें दिसतें. येथें एकंदर सात विहारांचे अवशेष सांपडले आहेत. तसेंच या आवाराचे माथ्यावर मुख्य मंदिर सांपडलें आहे. तसेच येथें दोन स्तूप सांपडले आहेत. बहुतेक इमारती विटांच्या असाव्यात असें अव-शेषांवरून दिसलें. मुख्य मंदिराचें काम फारच प्रेक्षणीय असलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिजे असें शिल्लक व मोडक्या तोडक्या त्याच्या भागावरूनही दिसून येतें. या मंदिरानजीक अशोकस्तंभाचे दोन तीन तुकडे पडलेले आहेत. इतक्या काळानंतर व वारा, पाऊस, थंडी, उन्हाळा इत्यादि नाशक कारणांना न जुमानतां राहिलेलें या स्तंभाचें गुळगुळीत पॉलिश विशेष नवलाचें वाटलें. स्तंभाच्या तुकड्याला हात लावला तों आरशाला हात लावल्याचा भास झाला! इतका पॉलिश करून दगड गुळगुळीत केलेला आहे!

अभ्यास

(अ) '**पुराण-वस्तु-संशोधन खातें**'—जुन्या वस्तु भूकंप, ज्वालामुखी इ०अनेक कारणांनीं नाहींशा होतात, कांहीं पृथ्वीच्या पोटांत तशाच असतात; अशा वस्तु शोधून काढण्याचें काम करणारें खातें. **बुद्ध-विहार**—बौद्धांचे मठ. **प्रसादचिन्ह**—आनंदाची किंवा शुभ गोष्टीची दर्शक अशी खूण. **नामशेष होणें**—मूळ वस्तु नाहींशी होऊन तिचें नांव तेवढें राहणें. **अवशेष**—शिल्लक राहिलेले भाग. **दृश्यदर्शक**—प्रदर्शन दाखविणारा (मार्गदर्शक). **ब्रह्मसाक्षात्कार**—विश्वाचें मूळचें कारण किंवा तत्त्व-ज्याच्या पासून हें जग उत्पन्न झालें, तें प्रत्यक्ष दिसणें, त्याचा अनुभव येणें. **तक्षशिला**—फार प्राचीन काळचें एक मोठें विद्यालय. **मोहोंजदारो**—हेंही एक फार प्राचीन शहर भूमीमध्यें सांपडलें आहे.

(आ) १. सारनाथच्या संग्रहालयांतील प्रवाशाचें मन आकर्षण करणारी कलाकृति कोणती? तिचें वर्णन करा.

२. अशोकस्तंभाची कलाकृति कशी आहे? तें थोडक्यांत सांगा.

३. तक्षशिला व मोहोंजदारो यांचीं महत्त्वाची माहिती मिळवून लिहा.

४. "आपला मार्गदर्शक व आपलें घड्याळ आपल्याला पुढें पुढें ओढीत नेतें" या वाक्याचें संदर्भासह स्पष्टीकरण करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८ देवाचें चिंतन

परिचय

संत तुकाराम महाराजांचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य महाराष्ट्रांत तरी सांपडणार नाहीं. त्यांचे अभंग आबालवृद्धांच्या परिचयाचे आहेत. या अभंगांतून त्यांनीं आपलें उपास्य दैवत जें पंढरीचा विठोबा त्याची तर स्तुति व प्रार्थना केलेली आहेच, पण सामान्य लोकांनाही अनेक प्रकारें बोध केला आहे. त्यांचें मोकळें मन नि कळकळ पुढील लहानशा अभंगांतही आढळेल.

१

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥
सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करुनियां मन शुद्ध भावें ॥
तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा फार काय शिकवावें ? ॥

२

पहा ते पांडव अखंड वनवासी । परी त्या देवासी आठवीती ॥
प्रल्हादासी पिता करीतो जाचणी । परी स्मरे मनीं नारायण ॥
सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडूरंगा ॥
तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥

३

अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेहि तेणें वंद्य केले ॥
अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥
ब्रह्महत्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥
तुका म्हणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४

चिंतनासी न लगे वेळ, सर्व काळ करावें ॥
सदा वाचे नारायण, ते वदन मंगळ ॥
पढिये सर्वोत्तम भाव, येर वाव पसारा ॥
ऐसें उपदेशी तुका, अवध्या लोकां सकळां ॥

५

सेवा ते आवडी उच्चारावें नाम ।
भेदाभेद काम निवारूनि ॥
न लगे हालावें चालावें बाहेरी ।
अवघेंचि घरीं बैसलीया ॥
देवाचींच नामें देवाचिया शिरीं ।
सर्व अलंकारीं समर्पावीं ॥
तुका म्हणे होय भावेंचि संतोषी !
वसे नामापाशीं आपुलिया ॥

अभ्यास

१. देवाच्या चिंतनाचा उद्योग-व्यापार हाच खरा हितकारक आहे हें निरनिराळ्या पुरुषांचीं उदाहरणें देऊन ठसविण्याचा प्रयत्न येथें केलेला आहे.
२. पापी माणसें, निंद्य झालेलीं माणसें, ईशचिंतनानें पवित्र झालीं हें अजामेळ, भिल्ली व वाल्या कोळी यांचीं उदाहरणें देऊन सांगितलें आहे. ब्रह्महत्या-म्हणजे ब्राह्मणांचा वध हें मोठेंच पातक मानण्यांत येतें, पण तें करणारा वाल्या ईशचिंतनानें पापापासून मुक्त झाला, इतकेंच नव्हे तर तो वाल्मीकि या नांवानें थोर ऋषि झाला. तो आद्यकवि म्हणून प्रसिद्ध आहे. तोच रामायणाचा कर्ता होय.
३. 'काय थोरपण जाळावें तें ?' यांतील थोरपण म्हणजे काय ? त्याचा धिक्कार येथें कां केला आहे ?
४. देवाचें चिंतन हें ईश्वरप्राप्तीचें सर्वांत सोपें साधन आहे हें तुकारामबोवांनीं कसें पटवून दिलें आहे ? भाव म्हणजे काय ? त्याचें महत्त्व कसें वर्णिलें आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९ राष्ट्रमाता कस्तुरबा

परिचय

[कस्तुरबा ह्या विश्ववंद्य महात्मा गांधींच्या पत्नी. महात्माजी कैदेंत असतांनाच त्यांच्या डोळ्यांसमोर कालवश झाल्या. त्यांची पुण्यतिथि दरवर्षी अनेक ठिकाणी साजरी केली जाते. मुंबईत एका वर्षी या पुण्यतिथीनिमित्त झालेल्या एका साहित्यिकाच्या व्याख्यानांतून पुढील भाग घेतला आहे.]

महात्मा गांधींसारख्या थोर पुरुषाची सहधर्मचारिणी म्हणून पू. कस्तुरबांविषयीं राष्ट्राला आदर वाटणें स्वाभाविक आहे. राष्ट्रानें महात्माजींना 'बापूजी' या नांवानें राष्ट्रपित्याच्या स्थानीं कायमचें स्थापिलें आणि म्हणूनच कस्तुरबा या 'बा' या एकाक्षरी नांवानें राष्ट्रमाता झाल्या.

पण महात्माजींच्या संबंधामुळेंच नव्हे, तर स्वतःच्या आंतरिक सद्गुणांच्या आणि निष्ठेच्या परिमलामुळें देखील कस्तुरबा राष्ट्रमाता झाल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेंत काय आणि हिंदुस्थानांत काय, सरकारशीं लढा देतांना जेव्हां जेव्हां चारित्र्याची, तेज प्रकट करण्याची पाळी आली, तेव्हां तेव्हां कस्तुरबा त्या दिव्यांतून यशस्वी रीतीनें पार पडल्या होत्या.

आणि त्याहून विशेष म्हणजे आर्य सती स्त्रीचा जो आदर्श झपाट्यानें बदलणाऱ्या आजच्या युगांत देखील हिंदुस्थानानें उराशीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जतन करून ठेवला आहे, त्या आदर्शाची जिवंत प्रतिमा म्हणून राष्ट्र कस्तुरबांना ओळखत आहे.

पू. कस्तुरबा अशिक्षित होत्या. त्यांचें भाषाज्ञान सामान्य खेडवळाच्या ज्ञानाहून अधिक होतें असेंहि म्हणतां येत नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतच जाऊन राहिल्यामुळें त्यांना थोडेंसें इंग्रजी समजत असे आणि २५–३० इंग्रजी शब्दहि बोलतां येत असत. मि. अँड्रूझ सारखे परदेशी पाहुणे घरीं आले असतां तेवढ्याच शब्दांच्या भांडवलावर त्या आपलें काम भागवीत असत, आणि केव्हां केव्हां तर त्यांच्या त्या संभाषणांतून अभावितपणें विनोदहि उत्पन्न होत असे.

कस्तुरबांना गीतेविषयीं असाधारण आस्था होती. कोणीहि शिकविणारे भेटले म्हणजे त्या मोठ्या भक्तीनें गीता शिकावयाला बसत. पण त्यांचें गाडें कधींच फारसें पुढें गेलें नाहीं. तरीहि अगदीं आगाखान जेल–महालामध्यें देखील त्यांनीं पुनः पुनः गीतेची संथा घेण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता.

त्यांचा निष्ठेचा दुसरा ग्रंथ म्हणजे तुलसीरामायण. मोठ्या मुश्किलीनें मिळणाऱ्या दुपारच्या अर्ध्या तासांत मोठमोठ्या बटबटीत टाइपाच्या तुलसीरामायणाचे दोहे चष्मा चढवून वाचीत बसलेल्या त्यांना पाहून मोठी गंमत वाटत असे. कस्तुरबांना रामायणदेखील नीटसें कधीं वाचतां आलें नाहीं. पण जरी त्यांना राष्ट्रीय संत तुलसीदासांनीं केलेलें सती सीतेचें वर्णन नीटसें समजलें नाहीं, तरी त्यांना प्रत्यक्ष सती सीता होतां आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जगामध्यें अमोघ अशा दोन शक्ति आहेत. एक आहे शब्द, आणि दुसरी आहे कृति. शब्दांनीं सारी पृथ्वी हलवून सोडली आहे यांत शंका नाहीं; पण अंतिम शक्ति कृतीचीच आहे. महात्मा-जींनीं या दोन्ही शक्तींची असाधारण उपासना केली. पू. कस्तुरबांनीं या दोहोंपैकीं अधिक श्रेष्ठ शक्तीची नम्रपणें उपासना करून संतोष मानला, आणि जीवनसिद्धिहि मिळविली.

दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें त्यांना तुरुंगांत डांबलें. कस्तुरबांनीं आपला बचावहि केला नाहीं, किंवा एकादें सळसळणारें निवेदनहि बाहेर पाडलें नाहीं. " महात्माजींची मी धर्मपत्नी नव्हे असें ठरविणारा कायदा मला मोडलाच पाहिजे. " असें म्हणून त्या सरळ तुरुंगांत गेल्या. तेथें त्यांची तेजस्विता मोडून काढण्याचा सरकारनें प्रयत्न केला. पण सरकारचा त्या वेळचा तो हट्टच मोडून गेला.

डॉक्टरांनीं त्यांना धर्माविरुद्ध आहार घेण्यास सांगितलें, त्या वेळींदेखील त्यांनीं धर्मनिष्ठेवर व्याख्यान दिलें नाहीं. फक्त एवढेंच सांगितलें, " मला निषिद्ध आहार घेऊन जगावयाचें नाहीं. मरण येणार असेल तर येवो. "

कस्तुरबांची कसोटी केवळ सरकारनेंच केली असें नाहीं, प्रत्यक्ष महात्माजींनीं किती तरी वेळां त्यांना ' माझा त्याग कर', ' माझ्या घरांतून चालती हो', ' माझ्या म्हणण्याप्रमाणें तुला वागलेंच पाहिजे', असें म्हणून त्यांना छळून घेतलें. पण त्याहि वेळीं त्या त्यांना हार गेल्या नाहींत. सतीचें कर्तव्य पतीला अनुसरण्याचें आहे, अशी त्यांची निष्ठा असल्यामुळें मनांत कोणताच किंतु टिकवूं न देतां त्या धर्माच्या बाबतींत पतीचें अनुसरण करीत राहिल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १९४२ च्या 'चले जाव' चळवळीच्या वेळीं सरकारनें महात्माजींना एका सकाळीं पकडलें, त्या वेळीं अधिकाऱ्यानें कस्तुरबांना सांगितलें कीं "तुमची इच्छा असल्यास तुम्हीहि बरोबर या." बा म्हणाल्या, "पकडीत असाल तर येईन. सुखासुखी येण्याची तयारी नाहीं." उलट महात्माजी ज्या सभेंत बोलणार होते त्या सभेंत जाण्याचा त्यांनीं निश्चय केला. पतीला पकडल्यानंतर त्यांचें काम पुढें चालविण्याची जबाबदारी बांनीं अनेक वेळां बजावली होती. संध्याकाळीं त्या व्याख्यानाला निघाल्या. सरकारच्या अमलदारांनीं येऊन त्यांना सांगितलें कीं, "माताजी, सरकारचें म्हणणें आहे कीं, आपण कष्ट घेऊं नयेत, घरींच असावें. सभेला जाण्याची दगदग कां करतां?" बांनी त्यांना देशसेवेचें महत्त्व समजावलें नाहीं, देशद्रोह करणारे कुत्रे म्हणून त्यांची निर्भर्त्सनाहि केली नाहीं. त्यांनीं एकाच शब्दांत सरकारच्या सूचनेची बोळवण केली, "सभेंत जाण्याचा माझा निश्चय आहे, आणि मी जाणारच."

आगाखान पॅलेसमध्यें खाण्यापिण्याचे हाल नव्हते. जागा हवाशीर होती. महात्माजींचा सहवास होता पण कस्तुरबांना आपण कैदेंत आहों हा विचारच असह्य होई. "नको येथील हें वैभव, आपली सेवाग्रामची झोपडीच बरी!" असें त्या वारंवार म्हणत. सरकारनें शरिरानें त्यांना कोंडून ठेवलें, पण त्यांच्या आत्म्याला हें सहन झालें नाहीं. पिंजऱ्यांतला पक्षी ज्याप्रमाणें प्राणत्याग करून बंधमुक्त होतो, त्याचप्रमाणें सती कस्तुरबांनीं सरकारच्या तुरुंगांत आपला देह ठेवला, आणि त्या स्वतंत्र झाल्या. त्यांच्या त्या मूक पण तेजस्वी बलिदानामुळें साम्राज्याचा पाया ढांसळला आणि त्यांची हिंदुस्थानांतील सत्ता खिळखिळी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली. कस्तुरबांनीं आपल्या कृतिनिष्ठेमुळें दाखवून दिलें कीं, शब्दाच्या आणि साहित्याच्या डोंगरापेक्षां कृतीचा एक खडाच अधिक मूल्यवान् असतो आणि अधिक पाणीदार असतो. शब्दशास्त्रांत निपुण असणाऱ्या लोकांना कर्तव्याकर्तव्याची नेहमींच विचिकित्सा करावी लागते. कृतिनिष्ठांना असली दुविधा कधींच भोंवत नाहीं. कस्तुरबांच्या पुढें त्यांचें कर्तव्य अगदीं हिऱ्यासारखें स्पष्ट असे. केव्हांहि कसलीहि चर्चा होऊं लागली म्हणजे आपल्या हातून अमुकच होणें योग्य आहे आणि अमुक होणें योग्य नाहीं, अशा दोन वाक्यांत त्या निर्णय देत असत.

आश्रमांत कस्तुरबा सर्वांच्याच माता असत. सत्याग्रहाश्रम म्हणजे तत्त्वनिष्ठ महात्माजींची संस्था, उग्रशासन मगनलालभाई ती चालवीत असत. अशा ठिकाणीं प्रेमाचा आणि वात्सल्याचा विशेष ओलावा मिळत असे तो कस्तुरबांकडूनच. पुष्कळ वेळां तर बा आश्रमाचे नियम देखील धाब्यावर बसवीत. आश्रमांतील मुलें भुकेजलीं म्हणजे त्यांची दाद बांच्याकडेच लागावयाची. नियमनिष्ठांनीं बांच्याविरुद्ध पुष्कळदां तक्रारी करून पाहिल्या. शेवटीं महात्माजींना हार खाऊन ठरवावें लागलें कीं, आपले नियम बांना लागू नाहींत ?

आश्रमांत थोर थोर पुढारी येवोत, किंवा लहानसहान कार्यकर्ते येवोत, त्यांच्या खाण्याची वास्तपुस्त अगदीं प्रेमानें करावी कस्तुरबांनींच आणि त्यांना आळस असा कधींच नव्हता. जिवावरच्या दुखण्यांतून उठल्या तरी अंगांत थोडी शक्ति येतांच आश्रमाच्या स्वयंपाकघरांत जाऊन त्या कामाला लागावयाच्या. अगदीं शेवटीं शेवटीं त्यांचे हातपाय थकले होते, शरीर सुरकतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेलें होतें, तोंडांत एकहि दांत उरला नव्हता, डोळे निस्तेज झाले होते; तरीहि त्या स्वयंपाकघरांत जाऊन पोंचावयाच्याच आणि झेपेल तें काम मनःपूर्वक करावयाच्याच.

त्या जरी अशिक्षित होत्या, संस्था चालविण्याची जबाबजारी किंवा महत्त्वाकांक्षा जरी त्यांच्यांत नव्हती, तरी देशांत काय चाललें आहे याची सूक्ष्म माहिती त्या प्रश्न विचारून किंवा वर्तमानपत्रें चाळून घेत असत.

आजच्या काळीं स्त्रीजीवनासंबंधींचा आपला आदर्श बराच बदलला आहे. आज कोणी स्त्री कस्तुरबांप्रमाणें अशिक्षित राहिली आणि कसल्याच महत्त्वाकांक्षेचा तिच्यांत उदय दिसला नाहीं, तर आपण तिचें जीवन यशस्वी किंवा कृतार्थ झालें असें म्हणणार नाहीं; असें असूनहि पू. कस्तुरबा वारल्याबरोबर सबंध राष्ट्रानें स्वयंस्फूर्तीनें त्यांचें स्मारक करण्याचें ठरविलें आणि सहजासहजीं गोळा न होणारा प्रचंड निधि गोळा करून दाखविला. त्यावरूनच सिद्ध होतें कीं, आपला प्राचीन आदर्श अजूनहि राष्ट्रमान्य आहे. आपल्या संस्कृतीचीं मुळें अजूनहि चांगलींच भरभक्कम आहेत.

हा सर्व थोरपणा कस्तुरबामध्यें आला कोठून? त्यांची जीवन-साधना कोणत्या प्रकारची होती? शिक्षणाच्या द्वारा बाहेरून असें त्यांनीं कांहींच घेतलें नव्हतें. त्यांच्यामध्यें खरोखर म्हणजे आर्य आदर्शाला साजेसे कौटुंबिक सद्गुणच होते. असाधारण संधि मिळतांच आणि तितकीच असाधारण कसोटी येऊन पडतांच त्यांनीं आपल्या स्वभावसिद्ध कौटुंबिक सद्गुणांना व्यापक केलें आणि त्यांच्या जोरावरच प्रत्येक वेळीं जीवनसिद्धि मिळविली. सूक्ष्म

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणांत किंवा लहानशा पायावर जी शुद्ध साधना केली जाते तिचें तेज इतकें कांहीं लोकोत्तर असतें कीं, कितीहि मोठा प्रसंग असो, किंवा व्यापक प्रमाणावर कसोटी होवो, चारित्र्यवान् मनुष्याला स्वतःच्या शक्तीचा फक्त गुणाकारच करावयाचा असतो.

सती कस्तुरबांनीं अगदीं बालबोधपणें पातिव्रत्याची, कुटुंब-वत्सलतेची आणि तेजस्वितेची कास धरिली आणि तेवढ्या जोरावर महात्माजींच्या महात्म्याला त्या पुऱ्या पडल्या. आज हिंदु, मुसलमान, पारशी, शीख, बौद्ध, ख्रिस्ती सर्व धर्मांच्या लोकांचा बनलेला हा विशाल देश अत्यंत निष्ठेनें कस्तुरबांची पूजा करीत आहे, त्यांचें स्मरण करून स्वतःची तेजस्विता परजीत आहे.

अभ्यास

(अ) **सहधर्मचारिणी**—पत्नी, विवाहित स्त्री. (पतीसह त्याचा धर्म आचरणारी.) **आंतरिक**--आंतले, अंगांत असलेले. (अंतर + इक) **चारित्र्य**-सच्छील; पातिव्रत्य. **दिव्य**—तेजस्वी किंवा संकटांनीं भरलेलें; अलौकिक कृत्य. **असाधारण**—अतिशय; पुष्कळ. **मुश्किल**—संकट. **स्त्रीजीवन**—स्त्रीयांची राहणी. **अमोघ**—हटकून फळ देणारी. **अंतिम**—शेवटची. **जीवनसिद्धि**—आयुष्याचें सार्थक; जन्माला आल्याचें साफल्य. **निषिद्ध**—धर्मविरुद्ध. **कृतिनिष्ठा**—कृतीवरील विश्वास; आचरणावरील श्रद्धा. **तत्त्वनिष्ठ उग्रशासन**—कडक शिक्षा करणारे; कडक शिस्त धरणारे. **धाब्यावर बसवणें**—न मानणें **जीवनसाधना**—जन्म सफल होण्यासाठीं करावयाचीं कर्तव्यें.

(आ) (१) तत्त्वनिष्ठ, नियमनिष्ठ व कृतिनिष्ठ या शब्दांचे अर्थ नीट लक्षांत आणा.

(२) पुढील वाक्यांचें स्पष्टीकरण करा—

१. 'शब्दांनीं सारी पृथ्वी हलवून सोडली आहे यांत शंका नाहीं. पण अंतिम शक्ति कृतीचीच आहे.'

२. 'कस्तुरबांनीं या दोहोंपैकीं अधिक श्रेष्ठ शक्तीची नम्रपणें उपासना करून संतोष मानिला आणि जीवनसिद्धि मिळविली.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२० शंभर वर्षांपूर्वीचें स्वप्न

परिचय

कै. श्री. विष्णुबुवा ब्रह्मचारी हे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत (सन १८२५-१८७१) इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रांत स्थिर झाल्यावर होऊन गेलेले एक तडफदार गृहस्थ होते. त्या वेळीं ख्रिस्ती मिशनरी आपल्या धर्माचा लोकांना उपदेश करतांना परधर्माची नालस्ती करीत. त्यांना हे विष्णुबुवा खरमरीत उत्तरें देत. त्यांचे राजकीय व सामाजिक विचारही त्या काळच्या सामान्य लोकांपेक्षां बरेच पुढें गेलेले होते. "सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध" या नांवाच्या पुस्तकांत त्यांचे हे विचार पाहावयास मिळतात.

[दीडशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत मराठ्यांचें राज्य नाहीसें होऊन इथें इंग्रज लोकांचा अंमल सुरू झाला, तेव्हां त्यांच्या हातून ज्या कांहीं चांगल्या गोष्टी घडल्या त्यांत त्यांनीं इंग्रजी भाषा आणि इंग्लंडचा इतिहास आम्हांला शिकविला, ही गोष्ट महत्त्वाची होती. हा इतिहास आम्हांला समजल्यावर आमच्यांतल्या विचारी लोकांचे डोळे उघडले आणि ते आपल्या भावी स्थितीविषयीं विचार करूं लागले. त्यांतले जे दूरदर्शी होते यांनीं पुढें काय होणार किंवा व्हावें या संबंधानें आपले विचार प्रगट केले होते. ते विचार किती बिनचूक होते पाहा.]

महाराष्ट्राला समाजसत्तावाद नवीन नाहीं. आमच्या ग्रामपंचायतीमधें आणि ग्रामव्यवहारामधें तो मुरलेलाच होता. इंग्रजी राजवटींत तो अस्तंगत झाला होता. पण त्याचीं स्वप्नें महाराष्ट्रांतल्या लोकधुरिणांना नि सुधारकांना शंभर वर्षांपूर्वींच पडलीं होतीं !

विष्णुबुवा ब्रह्मचारी हे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतले एक समाजसुधारक व द्रष्टे होते. त्यांनीं त्या वेळीं प्रदर्शित केलेले विचार आत्तांच्या समाजसत्तावाद्यांनाच नव्हे तर 'कम्युनिस्टांना' ही मागें टाकणारे होते. ते म्हणतात :—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व प्रजेकडून सर्व जमिनीची लागवड करवावी. ती अशी कीं ज्या ठिकाणीं जी वनस्पति चांगली पिकेल त्या ठिकाणीं तिची लागवड करावी. आणि अनेक प्रकारचीं फळें, कंद, भाज्या, अन्न वगैरे...उत्पन्न करून गांवोगांव कोठारें भरून ठेवावीं व त्यांतून सर्व गांवकऱ्यांनीं पोटास लागेल तितकें अन्न न्यावें व जनावरास चारा न्यावा."

"त्याचप्रमाणें शीतकाळ, उष्णकाळ, व पर्जन्यकाळ या बाराही महिन्यांत एकसारखें सर्व जमिनींतून उत्पन्न करावें व तें सर्वांचें उत्पन्न एकत्र व एकाचेच ताब्यांत राहून त्यांतून सर्वांनीं खावयास विपुल न्यावें. सरकारनें लोकरीचे, तागाचे, रेशमाचे व कापसाचे या प्रमाणें अनेक तऱ्हेचे कपडे तयार करावे व गांवोगांव खजिन्यांत ठेवावे. त्यांतून ज्याला जो कपडा पाहिजे तो त्यानें न्यावा व सोन्या-रुप्याचे मोतीं व हिरे यांनीं जडलेले अलंकार तयार करून गांवोगांव ठेवावे व ते सर्व स्त्रीपुरुषांनीं वापरावे आणि मोडले म्हणजे पुनः राजाच्या खजिन्यांत आणून टाकावे आणि नवे घेऊन जावे."

"तसेंच शस्त्रें, यंत्रें तयार करून गांवोगांवीं ठेवावीं व सर्व प्रकारचे खेळ गांवोगांवीं ठेवावे. आगगाड्या व तारायंत्रें गांवोगांवीं असावीं. सर्व प्रकारच्या कारखानदारांनीं, शेतकऱ्यांनीं व सरकारनें अहिंसक खाणें खावें व तें सर्वांनीं एका कोठारांतून नेऊन खावें. सर्वांचीं लग्नें, लग्न करणाऱ्या खात्याच्या मार्फतीनें राजांनीं करावीं व आवडत नसली तर ज्याला जी नको त्याला दुसरी करून द्यावी व तिला दुसरा पति करून द्यावा म्हणजेच स्वयंवर असावें. सर्वांचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोरें पांच वर्षांचीं झालीं म्हणजे तीं मुलें राजाच्या ताब्यांत द्यावीं. नंतर त्यांनें त्यांना सर्व विद्या शिकवून ज्याला ज्या कामांत जास्ती उद्योग करण्याची संवय असेल त्याला त्या कामाकडे लावून द्यावा व स्त्रीपुरुष वृद्ध झालीं म्हणजे त्यांच्याकडून कामधंदा न करवितां त्यांनीं स्वस्थ बसून खावें व त्या त्या खात्यांचे पार्लमेंटसभेचे सभासद असावें आणि जगत्कर्त्याचे उपकार आठवीत बसावें."

अभ्यास

१. शंभर वर्षांपूर्वी भरतखंडांतल्या सामान्य लोकांना वाटत होतें कीं इंग्रजी राज्य हें आतां चिरकाल टिकणार. पण त्या वेळचे विचारी लोक ओळखून होते कीं हें राज्य कितीहि चांगलें असलें तरी 'स्वराज्य तें स्वराज्य!' त्याची सर सुराज्याला कधींच यावयाची नाहीं. केव्हांना केव्हां इंग्रजांना इथून जावें लागणारच. ते गेल्यावर इथें जें सुराज्य होईल त्याचें स्वप्न या धड्यांत पहावयास मिळतें. आज हें स्वप्न खरें झाल्याचें आपण पाहत आहों. कारण भरतखंड स्वतंत्र झाल्यावर आपले थोर पुढारी या देशाच्या उन्नतीच्या ज्या योजना आखीत आहेत आणि इथल्या राज्यव्यवस्थेची जी घटना तयार झाली आहे त्यांतून या धड्यांत अपेक्षिलेल्याच गोष्टी पुढें घडून येणार आहेत.

२. या धड्यांतील विचार वाचून तुम्हांला काय वाटतें तें थोडक्यांत लिहा.

३. येथें दर्शविलेली व्यवस्था निरनिराळ्या खात्यांमार्फत व्हावयाची आहे, तेव्हां तीं खातीं कोणकोणतीं हवींत व त्यामध्यें काम करणारे इसम कसे नेमावे तें सांगा.

४. हे विचार तुम्हांला मान्य नसल्यास त्याबद्दलचीं कारणें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१ भलऽरी

परिचय



श्री. 'गिरीश' यांचें संपूर्ण नांव शंकर केशव कानेटकर. 'गिरीश' हें त्यांनीं काव्याकरतां घेतलेलें टोपण नांव आहे. यांचें पूर्वायुष्य शेतकरी वातावरणांत गेलें. त्यामुळें शेतकरी जीवनाशीं त्यांचा चांगला परिचय आहे. त्यांच्या कवितांचे 'फलभार,' 'कांचनगंगा' इत्यादि संग्रह प्रसिद्ध आहेत.

[हें कुणबाऊ भाषेतलें गीत आहे, पीक काढतांना हुशारी वाटवी म्हणून असलीं आनंददर्शक गाणीं शेतकरी म्हणत असतात. 'भले, रे, भले' या शब्दांचें भलऽरी असें खेडवळ रूप आहे.]

भलऽर भलऽर, भलऽरि दादा ! भल गडि दादा ! ॥ धृ० ॥
तांबडं फुटलं झुंजूमुंजू । सुकीर चांदनि लागली इझूं ।
थंड वात करतुया कुजूंबुजूं । म्होर हात चालीव जोसांत मर्दा
भलऽरि दादा ! भल गडि दादा ! ॥ १ ॥

कापुर ओढ्याचं झुळझुळ पानी । पांखरासंगं गाउन्‌श्यानी ।
रंजवील गड्या खेळ्यावानी । न्हिरीचा खाऊन चल भाकरकांदा ।
भलऽरि दादा, ! भल गडि दादा ! ॥ २ ॥

बाच्या किरतीची सुमरून आन । लुटायला जाऊं मोत्याची खान ।
उपटून काढूं कणसाळलं रान । चला राव भिडवुन खांद्यास खांदा ।
भलऽरि दादा ! भल गडि दादा ! ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



शिवारिं जित्राप नागावानी। सळसळ आवाज डुलती फनी।
डुइवर धरल मोत्यांचं मनी। कवळुन आनुं या वर्साचा सौदा।
भलऽरि दादा! भल गडि दादा! ॥ ४ ॥

कडूसा पडतां संपल पाळी। ढवळी होइल मोकळी काळी।
इर्जीकीला मिळेल नळी। काळ्या रातीला फुलविल चांदा
भलऽरि दादा! भल गडि दादा! ॥ ५ ॥

इरवाळ ठिपकाल डुइचं पानी। शिगल खळं डोंगरावानी।
भरत्याल कनगी, गंजी, रानीं। खात्याल सम्दी प्वाटभर मलिदा।
भलऽरि दादा! भल गडि दादा! ॥ ६ ॥

अभ्यास

(अ) **तांबडें फुटणें**—पूर्वादिशेला सूर्योदयापूर्वी तांबूस रंग येतो त्याला 'तांबडें फुटणें' असें म्हणतात. **सुकीरचांदणी**—शुक्राची चांदणी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वढा—ओढा. **खेळयावानी**—खेळगड्याप्रमाणें. **न्हिरी**—न्याहरी **बाची किरत**—बापाची कीर्ति. **फनी**—फणी. **मनी**—मणी. **डुई**—डोई. **इर्जीक**—कामगारांना घालायचें जेवण. **चांदा**—चंद्र. **इरवाळ**—पुष्कळ वेळ. **खळें डोंगरावानी शिगल**—खळ्यांत डोंगरासारखी म्हणजे मोठी धान्याची रास होईल. **प्वाटभर**—पोटभर

(आ) १. पिकाला 'मोत्यांची खाण' म्हटलें आहे. पिवळें झालेलें पीक डुलत असतें त्यावर नाग फणी डोलवीत आहे व त्यानें डोकीवर मोत्याचे मणी धरले आहेत असें अलंकारिक वर्णन आहे.

२. सकाळच्या वेळचें वर्णन थोडक्यांत पण गोड शब्दांनीं केलें आहे तें पहा. कणीस या नामावरून कणसाळलं हें क्रियापद व शीग यावरून शिगल हें क्रियापद कवीनें बनविलें आहे. नामावरून क्रियापदें करण्याची कवींची रीत आहे. गद्यांत अशीं क्रियापदें क्वचित् येतात.

३. परस्पर सहकाराची जरूरी या जगांत सर्वांनाच असते. शेतकऱ्यांना तर ती सर्वांत जास्त असते. इथें ही जरूरी दाखविणारे शब्दप्रयोग कुठें आले आहेत ?

---

२२ सीतेचा रावणास उपदेश

परिचय

कै. श्री. चिंतामण विनायक वैद्य हे जबरे विद्याव्यासंगी व विद्वान् गृहस्थ होते. यांनीं महाभारताचा सूक्ष्म अभ्यास करून त्यावर इंग्रजी-मराठी भाषेंत उत्कृष्ट ग्रंथरचना केली. म्हणून त्यांना 'भारताचार्य' या नांवानें संबोधीत. रामायण-महाभारतांतील महत्त्वाचा भाग विवेचन-रीतीनें त्यांनीं आपल्या 'श्रीरामचरित्र' व 'श्रीकृष्णचरित्र या पुस्तकांत दिला आहे. याशिवाय त्यांनीं इतर ग्रंथलेखनही पुष्कळ केलेलें आहे.

[रावणानें सीतेला लंकेंत पळवून् आणल्यावर 'अशोक' वनांत ठेविलें होतें. सभोंवतीं क्रूर राक्षसिणींचा पहारा होता. एकदां रावण सीतेचें मन वळविण्यासाठीं सीता बसली होती त्या ठिकाणीं आला आणि त्यानें आपल्या वैभवाचा व पराक्रमाचा दिमाख तिच्यापुढें मिरवला. त्या वेळीं त्या साध्वीनें रावणाला दिलेलें सडेतोड उत्तर पुढील उताऱ्यांत पहावयास मिळेल.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कित्येक सुंदर स्त्रियांनीं हातांत सोन्याच्या दीपिका धरल्या आहेत, कित्येक हातांत पंखा घेऊन मधून चालणाऱ्या त्या भव्याकृतीस वारा घालीत आहेत, कित्येक थंड पाण्यानें भरलेल्या सुवर्णाच्या झाऱ्या घेऊन पुढें चालत आहेत, एका स्त्रीनें पांढरें शुभ्र छत्र त्याच्या डोकीवर मागून धरलें आहे, अशा थाटानें रावणाची स्वारी अशोक वनांत आली. त्याला पाहतांच झंझावातानें जशी एकादी कळी कांपूं लागते त्याप्रमाणें ती बिचारी सीता कांपूं लागली. तिनें पाय पोटाशीं घेतले आणि आपले हात मांडीबाहेर बांधून घेतले. याप्रमाणें पोटाशीं पाय घेऊन जमिनीवर राक्षसिणीच्या मध्यें बसलेली, धुळीनें सर्वांग भरलेली; चिखलांत पडलेल्या कमलिनीप्रमाणें दिसणारी, अनाथ सीता पाहून रावणाला अधिकच मोह उत्पन्न झाला. सीता मात्र मनोरूप रथानें रामापाशीं तितक्यांतल्या तितक्यांत सहस्रवेळ जाऊन आली असेल !

रामावर भक्तीनें परिपूर्ण प्रेम करणारी सीता आपल्या दुःखमय स्थितीचा अंतच दिसत नाहीं असें वाटून रडूं लागली. पौर्णिमेच्या रात्रीं चंद्र ढगांनीं व्याप्त झाल्यामुळें चोहोंकडे जसें निस्तेज होतें किंवा एकादी सेना नायक मेल्यामुळें शून्य भासूं लागते, किंवा एकाद्या नदीचें पाणी जसें प्रवाह तोडून बाहेर काढून दिल्यामुळें नदी शुष्क पडून रुक्ष दिसूं लागते, त्याचप्रमाणें अतिशोकानें व रावणाच्या भयानें क्षीण झालेली सीता अत्यंत अनुकंपनीय दिसूं लागली. ती तिची दुःखद स्थिति लक्षांत आणून तिचें होईल तितकें दुःख कमी करावें या हेतूनें रावणानें तिच्यासमोर हळूच येऊन मोठ्या गोड शब्दांनीं बोलण्यास आरंभ केला :—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"हे सुंदर स्त्रिये, मला पाहतांच भीतीनें व त्रासानें तूं आपल्या शरिराला संकुचित करून पोटाशीं पाय ओढून बसलीस, जणूं काय



माझ्या दृष्टीस सुद्धां पडूं नये असें तुला वाटतें. अशा प्रकारचा व्यर्थ त्रास तूं कां करून घेतेस ? मी तुझ्यावर अत्यंत प्रीति करतों, मी तुला दुःख देऊं इच्छित नाहीं. माझ्यापासून तुला कोणतीच भीति नाहीं. माझ्याविषयीं तुझ्या मनांत प्रीति नसेल तर मी तुला स्पर्शही करणार नाहीं. हे देवी, तूं येथें कोणत्याही प्रकारचें भय बाळगूं नकोस. माझें तुला एवढेंच सांगणें आहे कीं, तूं असा व्यर्थ शोक करूं नकोस. माझ्यावर विश्वास ठेव. तुझ्यासारखें सुंदर रूप परमेश्वरानें दुसरें निर्माण केलेंच नाहीं असें मला वाटतें. सर्व पृथ्वी जिंकून तुझा बाप जो जनक राजा त्याला मी ती अर्पण करीन. माझ्यासारखा बलाढ्य राजा या जगांत दुसरा नाहीं. कोणी शत्रु माझ्या समोर उभा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहील असें मला वाटत नाहीं. तर माझ्यासहवर्तमान सर्व त्रैलोक्याचें तूं राज्य कर व यथेच्छ भोग्य वस्तूंचा उपभोग घे. वाटेल त्याला वाटेल तितकें द्रव्य किंवा पृथ्वीही दे. माझ्यावर विश्वास ठेवून मला वाटेल तो हुकूम कर. अरण्यांत हाकलून दिलेला, राज्यापासून भ्रष्ट झालेला, तपस्व्याचें व्रत घेतलेला राम आतां जिवंत असेल कीं नसेल याचीच शंका आहे. आणि असला तरी माझ्या हातांतून तुला तो कधींहि सोडवूं शकणार नाहीं."

हें त्या भयंकर राक्षसाचें भाषण ऐकून बिचारी सीता अत्यंत दुःखानें व्याकुळ होऊन डोळ्यांतून अश्रु गाळूं लागली. नंतर कांहीं वेळ विचार करून ती महापतिव्रता आपल्या समोर गवताची काडी धरून बोलूं लागली :—

"रावणा ! तूं परस्त्रीवर मन ठेवलें आहेस, हें वाईट आहे. तें मन तेथून काढून तूं आपल्या स्त्रियांच्या ठिकाणीं लाव. जशा तुझ्या भार्या तुला रक्षण कराव्याशा वाटतात त्याचप्रमाणें दुसऱ्यांनाहि आपल्या स्त्रिया रक्षण कराव्याशा वाटतात. आपल्या मनाच्या स्थितीवरून दुसऱ्याच्या मनाचा विचार कर आणि आपल्या स्त्रियांच्या ठिकाणीं संतुष्ट राहा. ज्याप्रमाणें पापी मनुष्यानें सिद्धीच्या प्राप्तीची आशा करणें व्यर्थ आहे त्याचप्रमाणें तूंही माझी आशा धरणें व्यर्थ आहे. हें माझें बोलणें तुला गोड लागणार नाहीं. पण तें तूं मोडलेंस तर सर्व राक्षसांचा संहार होईल. राजा जर आत्मसंयमन सोडून अन्यायास प्रवृत्त होईल, तर त्याच्याबरोबर त्याचें समृद्ध राज्यही लयास जातें. मला वाटतें, तुझ्या एकट्याच्या अपयशामुळेंच सर्व रत्नांनीं भरलेल्या लंका नगरीचा लवकरच उच्छेद होणार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धनाच्या किंवा ऐश्वर्याच्या लोभानें मोहून जाणारी मी नव्हें. जशी सूर्याची प्रभा सूर्याला सोडून राहत नाहीं त्याचप्रमाणें राघवावांचून मी दुसऱ्या ठिकाणीं राहणार नाहीं. तर रावणा ! हेंच तुला कल्याणकारक व युक्तही आहे कीं, ह्या दुःखानें ग्रस्त झालेल्या अभागिनीला राघवाला नेऊन भेटव. रामचंद्र शरणागतवत्सल आहेत; त्यांना तूं शरण जा आणि प्रसन्न कर. जर तुला आपल्या जिवाची पर्वा असेल तर शुद्ध मन करून मला लौकर रामाकडे पोंचीव, नाहीं तर रामाच्या धनुष्याचा घोर राहु लवकरच तुला ग्रासून टाकील. राम–लक्ष्मणांचे तीक्ष्ण बाण जळणाऱ्या तोंडाच्या सर्पाप्रमाणें या नगरीवर पडूं लागतील. हजारों लाखों राक्षसांचे प्राण घेणारे रामाचे बाण ही सर्व नगरी दणाणून सोडतील. राम–लक्ष्मणांच्या शून्य आश्रमांत शिरून राक्षसाधमा, तूं मला जबरदस्तीनें घेऊन आलास. जसा कुत्रा सिंहाचा वास आला म्हणजे त्याच्या समोर उभाही राहत नाहीं, त्याचप्रमाणें तूं लढाईच्या वेळेस त्यांच्या समोर उभा राहणार नाहींस, तर वेळींच उमग आणि रामाला शरण जा."

अभ्यास

(अ) **शून्य भासणें**—विचारहीन होणें; गोंधळलेली मनःस्थिति होणें. **अनुकंपनीय**—कींव येण्यासारखी. **शरणागत**—शरण आलेला. **शरणागतवत्सल**—शरण आलेल्या विषयीं दयाळू.

(आ) १. सीतेनें रावणाशीं बोलतांना गवताची काडी तोंडासमोर कां धरली ?
२. रावणानें आपलें वैभव व पराक्रम यांचें वर्णन केलें व सीतेला मोह पाडण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा परिणाम सीतेवर काय झाला ? कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. 'रामाच्या धनुष्याचा घोर राहु लवकरच तुला ग्रासील' हें रूपक कितपत योग्य आहे, याचा विचार शिक्षकांच्या मदतीनें करा.

४. सीतेच्या भाषणांत एक मोठें सामान्य नीतितत्त्व आहे तें कोणतें तें सांगा.

---

२३ दगडी कोळशाची खाण

परिचय

लेखक कै. महादेव शिवराम गोळे हे पुण्याच्या 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' चे आजन्म सेवक, विद्यार्थ्यांचे कळकळीचे मार्गदर्शक, आणि अनेक विचारप्रधान पुस्तकांचे लेखक होते. शास्त्रीय विषय सुबोध रीतीनें मांडण्याची त्यांची तऱ्हा पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

[दगडी कोळसा ही आधुनिक शहरी जीवनांतील एक आवश्यक वाव आहे. इंग्लंडनें एकोणिसाव्या शतकांत आपली भरभराट केली ती लोखंड नि कोळसा यांच्या जिवावरच. हे दोन्ही पदार्थ भूपृष्ठावर सांपडत नसून पृथ्वीच्या पोटांतून खणून काढावे लागतात. पैकीं दगडी कोळशासाठीं तर पृथ्वीच्या पोटांत फार खोलपर्यंत जावें लागतें. तिथें काम करतांना वरून शुद्ध हवा आंत सतत येत राहील अशी व्यवस्था करावी लागते. ही व्यवस्था कशी करतात हें इथें सांगितलें आहे.

विषय शास्त्रीय असला तरी तो लेखकानें सुगम करून सांगितला आहे.

जेव्हां भूपृष्ठाखालीं खोल काम करावयाचें असतें तेव्हां खाणींत सदोदीत शुद्ध हवेचा पुरवठा करावा लागतो. याकरतां खाणींमध्यें एका बाजूनें हवा आंत येण्यास वाट असावी लागते, व दुसऱ्या बाजूस दूषित हवा बाहेर जाण्यास वाट असावी लागते. याप्रमाणें नुसत्या वाटा ठेवूनच भागत नाहीं, तर त्या वाटांमधून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नियमित दिशेनें वाऱ्याचा प्रवाह वाहत राहील अशाविषयीं कांहीं योजना करणें जरूर असतें.

कोळशाची खाण सुरू करण्यापूर्वीं आरंभीं दोन ठिकाणीं कोळशाच्या थरास जाऊस पोहोंचणाऱ्या दोन मोठ्या विहिरी खणतात. या विहिरींच्या जागा अशा ठिकाणीं घेतात कीं, एकीचें वरचें तोंड दुसरीच्या तोंडाहून बरेंच उंच जातें. ज्या विहिरीचें तोंड खालच्या पातळीवर असतें तिचा शुद्ध हवा खाणींत पाठविण्याकडे उपयोग करतात; जिचें तोंड वरच्या पातळीवर असतें, तिचा दूषित हवा बाहेर जाऊं देण्याकडे उपयोग करतात. या दोन विहिरींचे तळ प्रथम एका बोगद्यानें जोडतात. याप्रमाणें सिद्धता झाल्यावर एकीकडून दुसरीकडे हवेचा प्रवाह नियमित दिशेनें चालावा म्हणून दूषित हवेच्या विहिरीच्या तळाशीं एक मोठी भट्टी पेटवितात; व ती सारखी जळत ठेवितात. भट्टीच्या उष्णतेनें तिजवरील हवा तापून हलकी होते व विहिरीच्या वरच्या तोंडानें ती बाहेर पडूं लागते. या रीतीनें एका बाजूनें हवा बाहेर जाऊं लागतांच तिची जागा भरून काढण्यास दुसऱ्या विहिरीच्या बाजूनें हवेचा प्रवाह वेगानें आंत शिरूं लागतो; तो मधल्या बोगद्यांतून वाहून भट्टीकडे येतो, व येथें तापून वर चढून निघून जातो. या प्रमाणें सारखा क्रम सुरू झाला म्हणजे खाणींत शुद्ध हवेचा उत्तम पुरवठा होतो, व दूषित हवा तत्काळ बाहेर जाते.

आतां जेथें खाणीच्या फटींतून ज्वालाग्राही वायु (मार्श ग्लास) बाहेर पडत असतो, तेथें त्याचें हवेशीं मिश्रण झाल्यावर जर त्यास आच लागली तर तो एकदम मोठा बार होऊन जळतो व त्यायोगें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाणींत काम करणारांच्या जिवास मोठा धोका असतो अशा खाणींत विहिरीच्या तळाशीं सारखी भट्टी पेटवून ठेवितां येत नाहीं याकरतां एका विहिरींतून दुसऱ्या विहिरींत शुद्ध हवा शोषून घेण्याचीं दुसरीं कांहीं साधनें योजितात. कित्येक खाणींत विहिरीच्या तोंडाशीं वाफेनें चालणारे मोठे पंखे लावून त्यांच्या साहाय्यानें हवेचा प्रवाह उत्पन्न केलेला असतो. दुसऱ्या कित्येक खाणींत तापलेल्या कढत वाफेच्या तोट्या थोरल्या विहिरींत आणून ठिकठिकाणीं वाफेचे फवारे सोडून तिच्या उष्णतेनें विहिरींतील हवा तापवितात. मग ती हलकी होऊन वर चढून आपोआप बाहेर पडते, व दुसऱ्या विहिरींतून शुद्ध हवेचा प्रवाह येऊन तिच्या जागीं भरतो.

अभ्यास

१. "गरज ही शोधाची जननी आहे" असें म्हणतात तें कसें खरें आहे हें या धड्यांतील वर्णनावरून समजून घ्या.

२. हवेच्या अंगच्या कोणत्या गुणांचा उपयोग खाणींतील शुद्ध हवेच्या पुरवठ्यासाठीं करून घेतात ?

३. एकाद्या पाण्याच्या खोल विहिरींत उतरलें असतां तिथें गुदमरल्यासारखें वाटतें तें कां हें तुमच्या शब्दांत सांगा.—शक्य असेल तर त्याचा अनुभव घेऊन त्या अनुभवाचें वर्णन करा !

४. ज्वालाग्राही पदार्थ म्हणजे काय ? अशा दोन पदार्थांचीं नांवें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४ जगीं गरिबांचें कोणि नाहिं वाली !

परिचय

श्री. वासुदेव गोविंद मायदेव हे श्री. धोंडोपंत कर्वे यांनीं स्थापन केलेल्या महिला विद्यापिठाचे एक कळकळीचे कार्यकर्ते व प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध आहेत. शिवाय ते उत्कृष्ट कवि-विशेषतः मुलांसाठीं गेय काव्यें लिहिणारे-कवि आहेत. प्रेमळपणा, प्रसाद आणि गेयता हे यांच्या कवितांचे विशेष गुण आहेत. 'भावतरंग' 'मुलांचीं अभिनय गीतें' 'बहुविध शिशु गीतें' इत्यादि त्यांचे कितीतरी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

[या जगांत पैशाचा प्रभाव मोठा विलक्षण आहे. धन हाच या जगांतला खरा मित्र आहे. असें अनेक कवींनीं वर्णन केलें आहे; तें नेहमींच खरें नसलें तरी व्यवहारांत गरीब माणसांची मोठीं कुचंबणा होते यांत संशय नाहीं. इतर चांगले गुण अंगीं असूनसुद्धां जवळ पैसा नसल्यामुळें केवढी हानि होते हा कटु अनुभव कवीनें येथें एका निष्पाप बालिकेच्या मुखानें सांगितला आहे.]

(वृत्त दिंडी)

कुंद ओल्या खोलींत लक्तरांत ।
बाळ गोपाळ प्रभा झोंप घेत ॥
मात्र माता जागते जशी ज्योत ।
हलुनि अंधारीं मनस्तरंगांत ॥ १

दिवस तीचे तोंडास लपविण्याचे ।
दिवस कष्टानें घास आणण्याचे ॥
दिवस निःशब्दें अश्रु गाळण्याचे ।
पिलां पाहोनी जीव कंठण्याचे ॥ २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रभा बाला ती चारु मंदहास ।
सानथोरांच्या पात्र कौतुकास ॥
बुद्धिविनयांहीं मान्य ती गुरूंना ।
खेळिमेळीनें हवीशी सरूयांना ॥ ३

× × × ×

पहा निश्चल हें सभास्थान केंवीं ।
स्तिमित विद्यार्थी गुरुहि सर्व तेंवीं ॥
प्रभा बाला बोलते करुण बोलीं ।
जगीं गरिबांचें कोणि नाहिं वाली ! ॥ ४
गरीबांना भावना बुद्धि नाहीं ।
गरीबांना मानापमान नाहीं ॥
गरीबांच्या वाटेंत कंटकांच्या ।
उभ्या राशी नेहमीं असायाच्या ! ॥ ५
वकिल डॉक्टर हे सर्व कुणासाठीं ? ।
असति त्यांचे ज्यांचिया वित्त गांठीं ॥
बोल करुणेचे प्रभा बालिकेचे ।
हृदय हलवीती सखींचें गुरूंचें ॥ ६

× × × ×

दिवस प्लेगाचे, दिवस औषधांचे ।
दिवस पैशाचे, दिवस डॉक्टरांचे ॥
दिवस चोरांचे, दिवस वकीलांचे ।
दिवस गरिबांचे स्वर्ग साधण्याचे ! ॥ ७
'नको जाऊं ! अपरात्र कोण ! आई ।
दूर घर, तें ! मी मरत खास नाहीं ! ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुठुनि पैसे देशील डॉक्टरांचे ? ।
अगऽकोणीही नव्हत गरीबांचे ' ॥ ८
म्हणे डॉक्टर, ' घेईन वीस बाई ' ।
एकदांची मोटरहि ऐकुं येई ॥
परी तत्पूर्वीं त्यजुन बाळ गेली ।
म्हणत 'गरिबांचें कोणी नाहिं वाली !'। ९

अभ्यास

(अ) **मनस्तरंग**—(मनस् + तरंग) मनांतील विचारांच्या लाटा.
निश्चल—स्तब्ध.

(आ) १. हीं पद्यें वाचल्यावर मनाला हुरहुर लागते, डोळ्यांत आंसवें येतात तोंडून ' गरिबांचें वाली कोणी नाहीं ' असे उद्गार सहजच येतात ! मनाची अशी वृत्ति होते म्हणुन 'करुण' रस या पद्यांत आहे असें समजावें-

२. एका विधवा बाईला मुलगा गोपाळ व मुलगी प्रभा अशी दोन मुलें असतात. त्यांतील प्रभा ही सुरेख, हसतमुख अशी असते. त्यामुळें शेजारचे लहानथोर लोक तिचें कौतुक करतात; शाळेंतील शिक्षकांना तिची बुद्धि व विनय यामुळें ती आवडते; व मैत्रिणींनाही ती हवीशी वाटते. एकदा ती सभेंत भाषण करते.—गरिबांना कोणी वाली म्हणजे रक्षण करणारा नाहीं, हाच तिच्या भाषणाचा मुख्य भाग असतो. तिचें भाषण गुरु व मैत्रिणी यांच्या हृदयाला हलवून सोडणारें असें होतें.

पुढें गांवांत प्लेग सुरू होतो, डॉक्टरांना पैसे मिळविण्याचे ते दिवस असतात, चोरांचें फावतें, गरिबांना मात्र मरण येतें व स्वर्गवास लाभतो !

अशा वेळीं प्रभा प्लेगनें आजारी पडते. डॉक्टर आणूं का, म्हणून आई तिला विचारते. पैसे कोठून देशील ? असें प्रभा म्हणते. तरी पण आई डॉक्टर आणण्यास जातेच. डॉक्टर केवळ वीस घेऊं, असें सांगून मोटारनें येतात; पण त्या वेळीं मुलीचे प्राण गेलेले असतात ! असें करुण वर्णन येथें आहे. हेंच वर्णन तुम्ही दहा ओळींत लिहून काढा.

३. ' तोंडास लपविण्याचे दिवस,' ' वित्त गांठीं असणारे ' यावर थोडक्यांत टीपा द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५ मुंबईचा सिंह

परिचय

लेखक श्री. अनंत वासुदेव मराठे हे वृत्तपत्रकार, इतिहास व चरित्रलेखक, मार्मिक टीकाकार, म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनीं अनेक शालोपयोगी व इतर पुस्तके लिहिलेलीं असून एकाद्या मोठ्या ग्रंथाचें व प्रबंधाचें सुबोध सार काढण्याची होतोटी त्यांना चांगली साधली आहे. 'इंग्रजांचें स्वराज्य' 'लोकमान्य टिळक' 'अंतरिक्षांतील अकरा ग्रह' सिंदबादच्या सात सफरी' इत्यादि त्यांचीं लहानमोठीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

[मुंबई हें हिंदुस्थानांतील पहिल्या प्रांतांचें शहर नि तिथली म्युनिसिपालिटी म्हणजे एक प्रचंड संस्थानच आहे. या म्युनिसिपालिटीचा कारभार ज्या कायद्यानें चालतो त्या कायद्याचे जनक सर फेरोशशहा मेथा हें मुंबईतले एक नामांकित गृहस्थ होते. शिवाय त्या कालच्या महत्त्वाच्या सर्व सार्वजनिक कार्यांत त्यांचें अंग असेच. अशा या पुरुषाचें हें त्रोटक चरित्र आहे.]

" सिंह ? आणि मुंबईत ? "

" होय. मुंबईतल्या 'राणीच्या बागेंत' तुम्हांला सिंह पाहायला मिळेल. एकादी 'सर्कस' मुंबईत आली म्हणजेही या वनराजाचें दर्शन मुंबईकरांना घडतें. सिनेमांत वनाचे देखावे दाखवितात तेव्हांही पडद्यावर मोठ्या भव्य आकाराचा सिंह कधीं दृष्टीला पडतो, पण आज मी तुम्हांला सांगणार आहें ती गोष्ट या सिंहाचीं नव्हे. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"आज सांगणार आहें ती गोष्ट एका सिंहासारख्या शूर व दिसण्यांत उग्र अशा गृहस्थाची आहे. कोटांत जाऊं लागलें म्हणजे बोरीबंदरच्या समोर मुंबईच्या म्युनिसिपालिटीची भव्य इमारत दिसते. त्या इमातीच्या मुख्य दरवाजासमोर एका उंच चबुतऱ्यावर ब्रांझ धातूचा एक उंच पुतळा उभा केलेला आहे. त्या पुतळ्याकडे जरा

वर मान करून पाहा. म्हणजे त्याच्या अंगावरचा तो लांब झगा, त्याच्या डोक्यावरची ती उंच टोपी, रुंद कपाळ, कल्लेदार मिशा आणि उभें राहण्याची एकंदर ऐट हीं पाहून हा पुरुष मोठा इभ्रतीचा व वजनदार असला पाहिजे असें तुमच्या तेव्हांच लक्षांत येईल."

"सिंहाच्या आयाळाची आठवण देणारे दाढीमिशांचे कल्ले, शरिराची लालबुंद भव्य इमारत आणि प्रतिपक्ष्याच्या काळजाचा थरकांप करणारें मेघगर्जनेसारखें वक्तृत्व" असें या पुरुषाचें वर्णन केलेलें आहे. लोकमान्य टिळकांनींहि त्यांना "पुरुषसिंह" ही पदवी लाविली होती. आणि खरेंच, हा गृहस्थ जिवंत असेपर्यंत ह्याच्या शब्दाबाहेर जाण्याची साऱ्या मुंबईत कोणाची ताकद नव्हती. म्हणून याला "मुंबईचा सिंह" असें म्हणत असत. ह्या पुरुषसिंहाचें नांव सर फेरोजशहा मेथा. पैकीं 'सर' ही यांची पदवी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती. फेरोजशहा हें त्यांचें पाळण्यांतलें नांव नि मेथा हें आडनांव होय.

मुंबईत हिंदु, मुसलमान, पारशी ख्रिश्चन इत्यादि अनेक धर्मांचे लोक राहतात. पैकीं पारशी धर्मांचीं कुटुंबें बहुतेक सारींच श्रीमंत व सुखवस्तु आहेत. फेरोजशहांचा जन्म अशाच एका सुखवस्तु पारशी कुटुंबांत झाला. (सन १८४५). फेरोजशहांचे वडील मोठे व्यापारी होते. ते कलकत्त्याला असत. पण त्यांचें कुटुंब मुंबईलाच असे. आपल्या कुटुंबांतील मंळळीला कांहीं उणें पडूं नये इकडे यांचें लक्ष असे. त्यामुळें फेरोजशहांचें बालपण सुखांतच गेलें.

त्यांच्या लहानपणची एक मजेदार गोष्ट आहे ती अशी :—

सात वर्षांच्या वयाच्या सुमारास फेरोज तापानें आजारी पडला; तो कित्येक दिवस अगदीं बेशुद्ध अवस्थेंत होता. डॉ. भाऊ दाजी हे त्या वेळचे मुंबईतले नामांकित वैद्य त्याला औषध देत. त्यांनीं सांगितलें कीं, हा आजार या मुलाच्या मेंदूच्या अति चलाखपणा-मुळें उद्भवला आहे. त्याच्या मेंदूला पूर्ण विश्रांति मिळून जर तो यांतून निभावला तर मात्र हा पुढें एक महापुरुष होईल.

बरेच दिवस तसेच गेले. आणि एक दिवस फेरोज जागा होऊन ओक्साबोक्शीं रडूं लागला ! जवळच्या मंडळींनीं 'रडतोस कां ?' म्हणून विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें 'माझी आजी मला बागेंत दिसली. त्या बागेंत जिकडे तिकडे फुलेंच फुलें होतीं. पण म्हातारीनें मला ढकलून बाहेर काढलें !' घरांतल्या वडील माणसांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें ऐकलें, तेव्हां तीं म्हणाली, "बरें झालें! हा शुभशकुन आहे. आतां या मुलाला भय नाहीं." पुढें तो त्या आजारांतून उठला. नि चांगला बरा झाला.

फेरोजशहांचें प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मुंबईतच झालें. सन १८६१ मध्यें ते मॅट्रिक परीक्षा पास झाले. पुढें सन १८६४ मध्यें ते बी. ए. झाले आणि त्यानंतर सहा महिन्यांच्या आंतच त्यांनीं एम्. ए. ची परीक्षा दिली. विद्यार्थीदशेपासूनच त्यांचा रुबाब पाहण्यासारखा होता. केवळ बरोबरच्या सोबत्यांवरच नव्हे तर कॉलेजांतल्या प्रोफेसरांवरही त्यांची छाप सहज पडे.

फेरोजशहांचें हिंदुस्थानांतलें उच्च शिक्षण अशा रीतीनें आटोपण्याच्या सुमारासच एका दानशूर पारशी गृहस्थानें कोणी विलायतेस जाउन बॅरिस्टर होऊन येणार असेल तर त्याच्यासाठीं कांहीं शिष्यवृत्त्या देण्याचें योजिलें होतें. फेरोजशहांनीं यांतली एक शिष्यवृत्ति मिळविली आणि ते विलायतेस गेले. तिथें आधुनिक हिंदुस्थानचे 'आजोबा' दादाभाई नौरोजी पूर्वींच जाऊन राहिले होते. त्यांचीं फेरोजशहांना फार मदत झाली. आणि दादाभाईंच्या सार्वजनिक कार्यांत फेरोजशहांनीं मनःपूर्वक भाग घेतला.

तीन चार वर्षें विलायतेंत काढल्यावर सन १८६८ मध्यें फेरोजशहा बॅरिस्टर होऊन मायदेशीं परत आले. आणि मुबईंत बॅरिस्टर म्हणून त्यांनीं आपलें बिन्हाड थाटलें. प्रथम कांहीं दिवस काम नसल्यामुळें हायकोर्टांत जाऊन बसणें आणि कज्जे कसे चालतात त्याचें निरीक्षण करणें यांतच ते आपला वेळ घालवीत. घरचा रिकामा वेळ मात्र चहापाण्यां, राजकीय विषयांवरचे वाद-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विवाद आणि मित्र मंडळीशीं थट्टामस्करी यांत जात असे पण पुढें लवकरच त्यांचें मुंबईतल्या पुढारी मंडळींत उठणेंबसणें होऊं लागलें. जे. पी. हा त्या वेळचा बहुमान त्यांना मिळाला. आणि त्यामुळें म्युनिसिपालिटीच्या कारभाराशीं त्यांचा संबंध येऊं लागला. सरकारी नोकरी न करतां स्वतंत्र वृत्तीनें वागून सार्वजनिक कार्यांतहि लक्ष घालावें असा विचार याच वयांत त्यांनीं पक्का केला. पुढें हळूहळू त्यांचें वकिली काम वाढत गेलें. आणि चारदोन महत्त्वाचे खटले ' जिंकल्यावर ' त्यांचा लौकिक फार वाढला. विशेषतः गुजराथ-काठेवाडच्या छोट्या-मोठ्या संस्थानिकांचीं व व्यापाऱ्यांचीं कामें त्यांना मिळूं लागल्यामुळें त्यांची प्राप्तीही झपाट्यानें वाढत गेली.

पण त्यांचें नांव लोक आज आदरानें घेतात तें, ते मोठे श्रीमंत होते म्हणून नव्हे, तर त्यांनीं आपल्या स्वतंत्र बाण्यानें प्रसंग पडला तेव्हां म्युनिसिपालिटींत आणि म्युनिसिपालिटीच्या बाहेरही त्या वेळच्या इंग्रज सरकारी अधिकाऱ्यांशीं धीटपणें भांडून लोकांच्या हक्कांचें रक्षण केलें आणि मुंबईच्या म्युनिसिपालिटीचा दर्जा वाढवून तिला हिंदुस्थानांतल्या पहिल्या प्रतीच्या स्वराज्यसंस्थेचें रूप मिळवून दिलें म्हणून.

मुंबई कॉरपोरेशनप्रमाणेंच मुंबई युनिव्हर्सिटी, मुंबई कायदे-मंडळ व हिंदी राष्ट्रीय सभा या नामांकित संस्थांतही मेथांनीं महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. हिंदी राष्ट्रीय सभेचे तर ते पहिल्या पासून कित्येक वर्षें केवळ प्राणच होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा रीतीनें आयुष्याचीं सुमारें ४०।४५ वर्षें साऱ्या लोकांवर आपली छाप ठेवून व अनेक सार्वजनिक कार्यें तडफदारपणें चालवून हा महापुरुष वयाच्या सत्तराव्या वर्षीं मुंबईतच मृत्यु पावला. (सन १९१५) त्याची आठवण कायम राखण्यासाठीं लोकांनीं त्यांचा पुतळा तर उभारला आहेच; पण शिवाय सन १९४५ मध्यें त्यांच्या जन्माला १०० वर्षें पुरीं झालीं म्हणून म्युनिसिपालिटीनें मोठा समारंभ केला आणि नंतर सुमारें ५ लक्ष रुपये जमवून त्यांच्या नांवानें मुंबई युनिव्हर्सिटींत 'नागरिकशास्त्र' आणि 'राजकारण शास्त्र' यांचें शिक्षण देण्याची योजना केली.

मुलांनो, मेथांच्या ह्या चरित्रापासूस काय शिकावें हें काय निराळें सांगायला हवें ?

अभ्यास

(अ) '**कोट**'—मूळ मुंबईच्या भागाभोंवतीं तट होता. तो ज्या भागाभोंवतीं होता, त्या भागाला आतां 'कोट' हेंच नांव राहिलें आहे. बोरीबंदर पासून दक्षिणेस हा भाग आहे. यांत हायकोर्ट, सेक्रेटरीएट, युनिव्हर्सिटी, कौन्सिल हॉल, व मोठमोठ्या कंपन्यांचीं ऑफिसें आहेत. **रुबाब**—दरारा (रु+आब—फारशी शब्दापासून) **जे. पी.**—एक सन्मान्य व अधिकार दर्शक पदवी. (जस्टिस ऑफ दि पीस.)

(आ) १. अधोरेखित वाक्यांचा अर्थ स्पष्ट करा.

२. मेथांच्या स्वरुपाचें वर्णन तुम्ही आपल्या शब्दांनीं लिहा.

३. राष्ट्रीय सभेचा त्रोटक इतिहास लिहून काढा.

४. दादाभाई नौरोजींनीं विलायतेंत कोणती कामगिरी केली तें समजून घ्या. त्यांना 'आधुनिक हिंदुस्थानचे आजोबा' असें कां म्हटलें आहे ? महात्मा गांधींना असेंच दुसरें कोणतें विशेषण लावतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. मेथांसंबंधीं कांहीं गमतीच्या आठवणी मिळवा. (मुंबई म्युनिसिपालिटीच्या कचेऱ्यांत-शाळांत सर्वत्र 'मुंबई टाइम' होता. हिंदुस्थानांत इतर सर्व ठिकाणीं 'स्टँडर्ड टाईम सुरू झाला त्या वेळीं मेथांनीं त्या वेळच्या इंग्रजी नोकरशाहीला जोराचा विरोध करून आपली इच्छा तडीस नेली आणि पुढें त्यांची स्मृति म्युनिसिपालिटीनें ह्या रूपानें कायम राखली. पण नुकताच म्युनिसिपालिटीच्या सर्व कचेऱ्यांतून वगैरे स्टँडर्ड टाईम सुरू झाला आहे.)

---

२६ पाडशी म्हैस

परिचय

कै. विनायक लक्ष्मण बर्वे हे एक थोर साहित्यक व चोखंदळ लेखक होऊन गेले. कथा, कादंबरी, नाटक, लघुनिबंध या सर्व साहित्यप्रकारांत त्यांनीं चांगलें नांव कमविलें होतें. 'आनंद' या टोपण नांवानें त्यांनीं कांहीं कविताहि लिहिल्या होत्या. 'कलमी आंबे' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध असून कलमी आंब्यांची निपज होणाऱ्या कोंकणचीच पार्श्वभूमि त्यांच्या या कथांत दृष्टीस पडते.

[कोकणांत कुटुंबवत्सल गृहस्थाच्या घरीं बहुधा एकाददुसरी दुभती म्हैस असतेच. ती दूध देईनाशी झाली–'पाडशी' झाली-म्हणजे ती विकून तिच्या बदली दुसरी दुभती घ्यावयाची, अशी साधरणतः पद्धत असते. अशा वेळीं एका घरीं अनेक दिवस काढलेल्या जनावराला घरच्या माणसांचा आणि घरच्या मोठ्या माणसांना नसला तरी लहान मुलांना त्या जनावराचा लळा लागलेला असतो. या परस्परप्रेमामुळें प्रसंगीं वात्सल्य नि कृतज्ञता हे गुण कसे उचंबळून येतात हें या कथेंत दाखविलें आहे.

कथेचा प्रसंग कोकणांतील एका खेड्यांत आश्विन महिन्यांत घडलेला आहे.]

–१–

दुधाचा तांब्या घेऊन यमू आज अगदीं उजाडतांच गोठ्यांत गेली. कामं घाईघाईनं उरकून आज तिला कुठं बरं जायचं असावं? हां बरोबरच! आधींच आश्विनांतील नवरात्राचे दिवस,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत आज तर मंगळवार. झालंच—! तिचा बेत, आज—नक्की नक्की—गांवच्या देवीला—विंध्यवासिनीला—जाण्याचा असावा !

तिनं गोठ्यांत गेल्यावर पावड्यानं शेणसडा दूर केला. डाव्या हातीं दुधाचा तांब्या घेऊन, म्हशीच्या पाठीवर थाप देत देत ती अलगत खालीं बसली. लुगड्याच्या ओच्यांची बसत बसत तिनं आवराआवर केली.

तांब्यांतील पाण्यानं आचळ धुतल्यावर "कण् कण्" दूध काढूं लागली. दूध काढतांना—

आपली ही पाडशी म्हैस आज उद्यां जाणार ! तिच्या जागीं नव्यानंच व्यायलेली तान्ही म्हैस येणार ! दोहोंच्या किंमतींत पडणारी तफावत काय स्वरूपाची असेल कोण जाणे ! तान्ही म्हैस किती तरी दूध देईल, दूध काढतांना आपली कश्शी एकतानता होईल, लपलप करीत लुचणारं रेडकूं बाजूला करतां करतां कसे नाकीं नऊ येतील, फेसानं भरलेला तांब्या—तांब्या कां ? चांगली चरवी—दुभत्याच्या फडताळाकडे नेतांना आपल्याला कित्ती कित्ती आनंद होईल—

असे विचार घोळवणाऱ्या यमूचं, धार काढण्याचं कामही-तितक्यांत संपलं. दुधाचा तांब्या डचमळवीत निघणाऱ्या यमूकडे, ती पाठमोरी जात असतां, पाडशी म्हैस "वांय्" करीत कौतुकानं पाहात होती. जणूं यमू हें तिचं पाडसच ! समोरच येणाऱ्या आईच्या हातीं तांब्या देत देत यमू म्हणाली—

"मला झट्पट् न्हाऊन घेऊं दे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांब्यांतील दुधाकडे पाहत यमूची आई म्हणाली—

" भारीच आटली म्हैस ! "

" पण अश्शी म्हैस कांहीं मिळायची नाहीं दुसरी. "

इतक्यांत यमूचे बाबाही आले. पाय धुवावयाला गरम पाणी देऊन यमू आपल्या स्नानाच्या तयारीला लागली.

गरिबीचाच पण ठाकठिकीनं संसार करणारं तें कुटुंब होतं. यमू ही त्यांची वडील मुलगी; चौदा पंधरा वर्षांची. तिच्या पाठीवर चार पांच भावंडें लहानगीं असून घरांतल्या कित्येक जबाबदारीच्या कृत्यांकडे तिला फार फार पाहावं लागे. दूध काढण्यासारखीं कामं तर तिला मनापासून आवडत. शहरवजा खेडेगांवांत राहणाऱ्या मुली जशा गृहकृत्यांत निष्णात व सांसारिक व्यवहारांत चुरचुरीत असतात तशाच त्या लाघवी व भावनाप्रधानही असतात. आपलीं माणसं व घरदार; घराजवळचा झाडझाडोरा व गुरंढोरं; रोजरोज भेटणारीं गडीमाणसं व आयाबाया; याच घरगुती पसाऱ्यांत त्यांच्या अवघ्या उज्ज्वल भावना गुंतून राहिलेल्या असतात. त्यांच्या भावनेला विशेष प्रकारचा अंकुर फुटायचा तर तो सणावारीं ! गांवच्या देवीला जायचं, हाही एक त्यांपैकींच विशेष उत्साहाचा भाग असतो.

यमूच्या गांवच्या कित्येक स्त्रिया, मुलंबाळं आज त्याच तयारींत होतीं. थोडासा नीटनेटकेपणा करून यमू खास निघण्याच्या तयारीनं अंगणापलीकडच्या रस्त्याकडे पाहात होती.

मुलींबाळींचे घोळके तिला दिसूं लागले. हातीं फराळाचे डबे, कांकड्या, चिबूड घेऊन जाणाऱ्या कित्येक स्त्रिया तिच्या अवलोकनांत येऊं लागल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उलट दिशेनं पाडसवाल्या तान्ह्या म्हशीहि कित्येक लोक नेत असतांना तिला दिसल्या. म्हशींची नेआण याच दिवसांत होत असते. म्हशींचा व्यापार करणारे गोपाल, हेड्ये, अगर अहीर यांचाहि सुळसुळाट याच दिवसांत होतो, हेंही यमूला माहीत होतें.

रेडकांच्या मागं अधीर वात्सल्यानं धावणाऱ्या म्हशींकडे पाहून, यमूला फार आनंद होई. झुंबराप्रमाणं डुलडुलणाऱ्या ओट्या व आचळ पाहून तिला समाधान वाटे. जन्माला येऊन आठ दहा दिवसच झालेल्या रेडकांना खांद्यावरून उचलून नेणाऱ्या कुळंब्यांमागून "वांय" वांय" करीत अधीऱ्या चालणाऱ्या म्हैसढोरांचं लाघव हें मातृहृदयाच्या निःसीम प्रेमाचा भाग आहे हेंही यमूच्या ध्यानांत आल्यावांचून राहत नसे. क्वचित् रस्त्यानं जाणाऱ्या पाडशा म्हशीही यमूच्या दृष्टीस पडत; त्या बिचाऱ्यांना दोऱ्यांनीं बांधून नेणं भाग पडे !

या साऱ्या नेआणीकडे पाहून यमूच्या अप्रगल्भ मनांत, लेकी-सुनांच्या सासरमाघारपणाचे विचार आल्याशिवाय कसे राहतील तिच्या साध्याभोळ्या मनांत आपले तेच विचार घोळले. आपणांसही सासरीं जाण्याचा खेद व माहेरीं येण्याचा आनंद उपभोगायला मिळणार—!

—पण इतक्यांत तिचीं भावंडंही जाण्याच्या तयारीनें हुदडत आल्यामुळं यमू त्यांच्यासह घराबाहेर 'विंध्यवासिनीच्या' रस्त्यानं निघाली. तीं सर्वजणं रस्त्याला लागायला व एक म्हशी विकणारा हेड्या यमूच्या अंगणांत शिरायला एकच गांठ पडली.

"आम्हांला पुष्कळ दूध देणारी म्हैस दे अं" असें त्याच्याजवळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सस्मितपणानं बोलून यमू पुढं झाली. तिचीं भावंडंही मागून पळत निघालीं.

तो हेड्याही मान हालवीत अंगणांत गेला.

– २ –

यमूचे वडील ओटीवरच भेटले.

" चांगली म्हैस हाय दादा ! ध्यताव काय ?" तो हेड्या म्हणाला,

" म्हैस तर हवीच आहे. पण तुझ्या किंमती—"

" अंदु किंमती लय उतरल्याति !—"

" आधीं म्हैस तर पाहूं."

" दावतां आणूनशान !" असं म्हणून तो हेड्या रस्त्यावर गेला. रस्त्यानजीक एका झाडाखालीं त्यानें ५–६ म्हशी उभ्या करून ठेवल्या होत्या.

" व्हयती चांदी म्हैस घेऊनशान यऽअऽअऽअ बेगिन." असं आपल्या जोडीदारास सांगून तो हेड्या परत ओटीवर आला. बैठक मारून त्यानं पानहि नखलायला सुरुवात केली.

" काय दादा अंदु धंदाच नाय ! चांगल्या दुभत्या जनवराला चामड्याची किंमत बि यत नाय."

" अरे पैसाच महाग झालाय मुळीं ! तोंवर म्हशीला कुठलं मोल."

" तांपित खरांच. तुमची पाडशी हाय ना ?."

" तर ! पाडशी घेतलीस तर आम्ही तान्ही घेऊं तुझी बघ !"

"असां म्हनताव ! हाय काय वाड्यांत ? नंदर टाकुनशान येतां बरी."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असं म्हणत तो हेड्या मागीलदाराच्या गोठ्याकडे गेला.

गोठ्यांतल्या पाडशा म्हशीकडे त्यानं "नंदर" तर टाकलीच.

ती पाडशी म्हैस मात्र चरायचं सोडून त्याच्याकडे केंविलवाण्या चेहेऱ्यानं पाहूं लागली. तिच्या तोंडांतून गवताचे अर्धवट चावलेले तण तसेंच बाहेर लोंबत राहिलें. हा न्यायला आलेला काळपुरुष आहे हें त्या मुक्या जनावराच्या झटकन ध्यानांत आलं. यावेळीं आपलं संरक्षण करायला यमू धावत आली तर किती बहार होईल हेही विचार त्या मूक प्राण्याच्या माथाडींत खास खास आले असतील.

तो हेड्या परतून आला, पण ती पाडशी म्हैस मात्र त्याच ठाणांतून त्याच हावभावानं पाहत राहिली. तिचं खाणंही बंद झालं!

यमूचे वडील त्या तान्ह्या म्हशीला गोंजरीत गोंजरीत न्याहाळीत होते. ती पुढील दारच्या अंगणांत उभी होती. तिच्या शेपटीचा गोंडा चघळीत तिचं रेडकूंही जवळच होतें.

"हो किती दूध देते?"

"फेंसासकट सात शेर नि म्हनतांव काय?" हेड्यानं चटकन् सांगून टाकलं.

"बरं, किंमत?"

"साठ रुपये व्हतील बघा."

"बरं, माझ्या पाडशीची काय किंमत केलीस?"

"रुपये ३०, एक पैसा कम् नाय आन् जास्त नाय."

"म्हणजे अदलाबदल करायची तर रुपये ३० तुला मोजले पाहिजेत?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"अव रुपये ३० म्हंजी हायकाय भुस्काट!" तो हेड्या अगदीं 'वरपक्षा'च्या ऐटीनं बोलला.

"अरे बाबा, मी गरीब कुटुंबवत्सल आहें. तीस रुपये तुला भुस्कट वाटले तरी मला ते भारीच वाटतात. असं कर. माझ्या पाडशीची किंमत धर रुपये ३०, नी तुझ्या तान्हींची किंमत धर रुपये ५०: अदलाबदल कर नी रुपये २० घेऊन जा," असं म्हणत यमूचे वडील अंगणांतून ओटीवर आले. या त्यांच्या हालचालींत करारीपणाचा भाव स्पष्टपणें व्यक्त झाला, तरी पण नंतर खूपशी घासाघीस झालीच!

अखेर होना करतां करतां रुपये २१ देऊन अदलाबदल कायम ठरली.

तान्ही म्हैस गोठ्यांत नेऊन पाडशीच्या जागीं बांधण्यांत आली!

मात्र पाडशी म्हैस कांहीं केल्या गोठ्यांतून बाहेरच पडेना.

मरणाच्या द्वारीं असणाऱ्या वयोवृद्धालाहि हें जग सोडतांना ज्या यातना होत असतात त्याच यातना—त्याच मानसिक यातना—त्या पाडशा म्हशीच्या चर्येवर स्पष्टपणें दिसूं लागल्या;

अखेर लाठीच्या तडाक्याखालीं नरमवून तिला चालू केली.

यमूच्या त्या घराजवळून जातां जातां व्याकुळ नजरेनं घरांत—आंत कुठंतरी—ती पाहूं लागली. तिची चालही मंदावली. त्याबरोबर मागच्या माणसानं एक फटकारा लगावला, तर दोरी धरून चालणाऱ्यानं दोरीला जोराचा हिसका मारला; त्या पाडशा जनावराचे हे हाल चालूत असतां तो हेड्या ओटीवर खण् खण् रुपये मोजून घेत होता!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साऱ्या आशा खुंटल्याचं समजतांच ती पाडशी म्हैस खालीं मान घालून रस्त्यानं पावलांकडे पाहात पाहात संथपणें चालूं लागली. गरीब बिचारी मौन जात !

यमूच्या आईनं आंबोणाचं घमेलं नेऊन नव्या म्हशीच्या पुढ्यांत ठेवलं. दूर उभी राहून समाधानानं त्या दुधाळ म्हशीकडे ती पाहूं लागली.

भरपूर दुभत्याचा आनंद ! चारदोन कच्चींबच्चीं असणाऱ्या घरगुती मातेचा गांवठी आनंद ! शहरच्या मोजदातींत तो कस्पटाप्रमाणं असला तरी गांवांतल्या गांवांत गदगद हालवणारा असतो हें आपल्याला सहज अनुभवतां येईल.

यमूची आई त्याच आनंदांत गर्क होती. तो आनंद जास्त उत्कृष्ट व्हावा म्हणून तिनं त्या नव्या म्हशीपुढें आंबोण—रोजच्या पेक्षांही जास्त लज्जतदार असं नेऊन ठेवलं. नंतर झपझप पावलं टाकीत ती घरांत आली.

" छानच म्हैस आहे हं. किती दूध देईल म्हणाला तो ? "

" चांगलं फेसासकट सात शेर ! निदान सहा शेर तर खरं ? " यमूचे वडील आपल्या पत्नीला सांगत होते.

—३—

तें पाडशी ढोर हताश होऊन मार्ग आक्रमीत होतं.

कुठं नेणारे नेतील तिथं जायचं !

त्याच रस्त्यानं समोरून—

यमू व तिचीं भावंडें येत होतीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विंध्यवासिनीचं दर्शन आटोपून ती घराकडे निघालीं होतीं, आश्विनांतील नव्या सृष्टीचा आनंद, हिरव्याचार गवताची रमणीयता, पिकल्या भातशेतांचा उन्मादक हेलावा, डोंगरांतून चुन्याच्या रेघांप्रमाणें दिसणारे दूरदूरचे पन्ह्ये, या अखिल सौंदर्याचा बेहोषपणा त्या सर्व मुलांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट दिसत होता. यमूनें तर आपल्या हातांत रानफुलांचा भला मोठा तुरा घेतला होता. तीं सारींजणं आनंदनिर्भरानं कीं उन्हामुळं लालवंडलीं होतीं हें सांगणं कोणाही चतुराला कठीण झालं असतं. भरल्या हुरुपानं येतां येतां यमूनें समोरून येणारी आपली पाडशी म्हैस ताबडतोब ओळखली.

क्षणांत तिचा चेहरा पार काळवंडून गेला.

त्या पाडशा जनावरानंही आपल्या आवडत्या यमूला तात्काळ ओळखलं. तिच्या निराशेला क्षणार्धांत अंकूर फुटला. सारं बळ एकवटून तिनं जोराचा हंबरडा मारून दोरीसह आपली सोडवणूक करून घेऊन, ती चौखूर धावूं लागली.

तिच्या मागून धावणाऱ्यांनाही तिला पकडणं अशक्य झालं.

ती नेमकी यमूच्या घरामागील गोठ्यांत येऊन उभी राहिली.

धांपा टाकतां टाकतां तिचं सर्वांग लाटेप्रमाणें हालत हेलावत होतं.

थोडा दम गेल्यावर तान्ह्या म्हशीपुढील अंबोणांत तिनं तोंड घातलं. त्याबरोबर एकाद्या वरचढ मालकिणीप्रमाणें त्या नव्या म्हशीनं तिला जोराची धाड मारली. त्या धाडीला भिऊन तें पाडशी जनावर बाजूला झालं.

त्या नव्या तान्ह्या म्हशीचा पाठीराखेपणा करण्याकरतांच कीं काय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो हेड्या व त्याचे दुसरे असामीहि वहाणा करकरवीत गोठ्यांत शिरले. त्यांच्या मागोमाग यमूही घाईघाईनें गेली.

" ** मारि लयच येरां जनावरां " म्हणत हेड्यानं भलं मोठं लोढणं अडकवलं त्या पाडशीच्या गळ्यांत.

दुसरे आसामी दोरी घेऊन ओढूं लागले.

त्या जनावरानं दोरीला उलटी खेंच मारली. पाहणाऱ्याला " रश्शीखेंच " चालत असल्याचा भास झाला असता !

गोठ्यांतून ढोर हालत नाहीं हें पाहून हेड्यानं दणके देण्यास सुरवात केली.

धब् ! धब् !

यमूकडे पाहात त्या ढोरानं जबडा पसरून जीभ बाहेर काढली.

यमूच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तिच्यानं तें पाहवेना.

" सोडा बरं तिला. खबरदार ओढाल तर ! " यमू झपकन् म्हशीजवळ गेली. नवऱ्याच्या हालजाचानं बेजार झालेली एकादी बहीण चांगल्या स्थितींत असणाऱ्या आपल्या दुसऱ्या बहिणीला प्रथम भेटींतच जशी उत्कंठतेनं स्फुंदत स्फुंदत मिठी मारील तशीच यमूनं त्या म्हशीच्या गळ्याला मिठी मारली.

तात्काळ म्हशीच्या चेहऱ्यावरही उमदेपणा वावरूं लागला.

" जा तुम्ही येथून ! "

" हां काय ? म्हैस न्याया नको ? "

" नको. जा जाऊन बाबांना सांगा ! "

" म्हंजे ब्येस !! सौद्यापरि सौदा गेला—! चला र. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते सर्वजण पुढील दारीं आले.

व्यवहारांची प्रतिष्ठा ठेवतां ठेवतां वृद्ध होऊं पाहणाऱ्या हरएकाच्या भावना मरून जात असतात. यमूच्या बाबांचंही असंच झालं होतं. गोठ्यांत जाऊन यमूची प्रथम त्यांनीं मनधरणी केली, कानउघडणीही केली. व्यवहाराची जाणीव दिली. इतकेंच काय पण पुढं दडपशाही देऊन यमूला घरांत चालती केली.

माजघराच्या दारापाशीं हुंदके देत देत यमू उभी राहिली.

आणि गोठ्यांत फिरून रश्शीखेंच सुरू झाली.

धबा धबा आवाज होत होते.

यमूच्या अंतःचक्षूसमोर उकललेला जबडा व जीभ दिसूं लागली.

यमूचं अंगही शहारलं.

अखेरीस ती म्हैस बाहेर आणलीच त्यांनीं !

त्याबरोबर यमूच्या हृदयाचं पाणीच झालं.

ती ताडकन् बाहेर आली.

" कांहीं झालं तरी मी म्हैस नेऊं द्यायची नाहीं. " किन्हेऱ्या आवाजानं तिनं सर्वांना बजावलं.

सर्वजण उभे राहिले.

" बाबा, तुम्हांला दुधाची काळजी नको. आम्हीं सारींजणं दुधाशिवाय राहूं. माझं रतन देईलच मुळीं दूध ! बघा देईल कीं नाहीं तें ! पाहा तर खरं ! "

" वेडी कुठली ! " तिची आई म्हणाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"आचरट नाहीं तर" तिचे वडील म्हणाले.

त्यांच्याकडे लक्षच न देतां यमू तडक गोठ्यांत गेली व तान्ही म्हैस सोडून त्या जागीं पाडशीला बांधूं लागली.

"तें कांहीं नाहीं! जा आपली म्हैस घेऊन. काढ रुपये! टंगळ-मंगळ नाहीं चालायची!"

तिच्या करारी मुद्रेमुळं म्हणा अगर कशामुळं म्हणा त्या हेड्यानं सर्व रुपयें यमूच्या समोर टाकून तान्ह्या म्हशीसह पाय काढला तिथून।

यमूचे आईबाप या संसारिक बखेड्यामुळं अगदीं नाखूष झाले. यमू मात्र त्या दिवसापासून गोठ्यांत दिवसांतून पंचवीस वेळां जाऊं लागली. म्हशीचीं निगा पूर्वीपेक्षांही अधिक मायेनं होऊं लागली.

पाहिजे तर त्याचा परिणाम म्हणून म्हणा, पाहिजे तर मुकं जनावरही मायेमुळं सज्ञान झालं म्हणून म्हणा, पाहिजे तर जनावरा-लाही मायेचा अर्थ कळतो म्हणून म्हणा पण तें पाडसं जनावर पूर्वीपेक्षां जास्त, जवळ जवळ दुप्पट दूध देऊं लागलं.

घरांत यमू असेपर्यंत पाडसेपणीं व तान्हेपणीं त्या जनावराचं दूध केव्हांच कसं आटलं नाहीं, या गोष्टीचा अद्यापही सर्व गांवाला अचंबा वाटत आहे!

अभ्यास

(अ) **पाडशी**—बरेच दिवस दूध देऊन झाल्यावर कमी दूध देऊं लागलेली. **हेड्या**—गाई, म्हशी वगैरे जनावरांची खरेदी-विक्री करणारा. **अहीर**—गवळी. **पऱ्हे** (ए. व. **पऱ्हा**)—वहाळ, ओढे. **रश्शी-खेंच**—दोरीच्या परस्पर विरुद्ध दोन टोंकांना धरून दोरी ओढणें (इं. 'टग ऑफ वॉर') **आनंदनिर्भर**—अतिशय आनंद.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनधरणी—सौम्य शब्दांनीं मन वळविणें. **कानउघाडणी**—कठोर शब्दांनीं दोष देणें. **दडपशाही देणें**—दडपून-दरडावून आपल्या मनाप्रमाणें करावयाला लावणें.

(आ) १. काळपुरुष म्हणजे काय ? म्हशीला हेड्या काळपुरुष कां वाटला ?

२. या धड्यांतील मुलगी व बाप यांच्यांत स्वभावभेद दिसून येतो तो कशामुळें ?

३. 'नखलणें' 'नरमवणें' व 'लाल वरणें' या शब्दांत रचनेचा कांहीं विशेष दिसतो कां ! कोणता ?

४. तुम्ही एकादी वस्तु दुकानदाराकडून विकत घेतांना घासाघीस करतां आहां अशी कल्पना करून दुकानदाराशीं झालेला संवाद लिहून काढा.

५. या धड्यांतील कुणबाऊ शब्द एकाखालीं एक लिहून त्यांच्यापुढें तुमच्या दृष्टीनें असलेले 'शुद्ध' शब्द लिहा.

---

२७ धर्माचेंच रक्षण करतों !

परिचय

मोरोपंत हे सुप्रसिद्ध कवि गेल्या अठराव्या शतकांत होऊन गेले. आर्या अथवा 'गीति' हें त्यांचें आवडतें वृत्त होतें. त्यांनीं रामायण महाभारतादि ग्रंथांतील कथा मराठी काव्यांत गोवून मराठी भाषेचें वैभव वाढविलें. कविता करण्याचा नाद त्यांना लहानपणींच लागला नि तो त्यांच्या मृत्यूपर्यंत टिकला. त्यांनीं सुमारें पाऊण लाख कविता लिहून ठेविली होती.

[भारतीय युद्ध अठरा दिवस चाललें होतें. त्यांत कौरवांच्या बाजूनें **कर्ण** व पांडवांच्या बाजूनें **अर्जुन** एकदा समोरासमोर लढत असतां कर्णाच्या रथाचें चाक एकाएकीं जमिनींत रुतलें—भूमातेनें तें गिळंकृत केलें म्हणाना—तेव्हां कर्ण रथाखालीं उतरून चाक वर काढूं लागला. तो त्या कामांत गुंतला असतांनाच अर्जुनानें समोरून कर्णावर बाणांचा वर्षाव चालविला तेव्हां कर्ण अर्जुनाला म्हणाला, "तूं धर्मज्ञ असतां शस्त्रहीन अशा मजवर बाण मारून अधर्म कसा करतोस ?" त्यावर कृष्णानें त्याला जशास तसें उत्तर देऊन 'आम्ही धर्माचेंच रक्षण करतों आहों' असें सांगितलें तो कथाभाग पुढील आर्यांत आहे.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्ववधोद्यतार्जुनातें कर्ण म्हणे, " बळ तुझें अनंत रहा ।
स्वस्थ मुहूर्तभरि, रणश्रद्धा पुरवील, गा अनंतर हा ॥ १

रथचक्र उद्धरूं दे श्रुतिशास्त्रज्ञा, महारथा, कुलजा, ।
साधु न हाणिति अरिला, पाहति अधृतायुध व्यथाकुल ज्या ॥ २

तूं स्वरथीं, क्षितिवरि मी, तूं सायुध, मी अशस्त्र कवच रणीं ।
न वधावें मज, जों मी गुंतुनि गेलों असें रथोद्धरणीं ॥ ३



भ्यालों न तुज हरीसहि; जो न तुला विमुख, काय कातर तो ।
कथितों यास्तव कीं जन धर्में भवसिंधु, नायका, तरतो. ॥ ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रक्षावा धर्म बुधें, कुशळाचा धर्म हा निधी राहें ।
स्थिर, जें करिसि निरायुधमथन करिल धर्म हानि, धीरा, हें ॥ ५

कृष्ण म्हणे, राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें ।
नीच व्यसनीं बुडतां निंदिति दैवास, न स्वकर्मातें ॥ ६

जेव्हां तूं, दुर्योधन, दुःशासन, शकुनि एकमति झालां ।
कैसे कपटद्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां ॥ ७

जेव्हां सभेसि नेली पांचाळी, मानिलें मनीं शर्म ।
तेव्हां गेला होता कोठें, राधासुता, तुझा धर्म ? ॥ ८

फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग, ।
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां ? वृषा, सांग. ॥ ९

चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले, असें नृपें खोटें ।
कर्म करवितां, कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें ? ॥ १०

केले दग्ध जतुगृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां ।
गेला होता कोठें धर्म तुझा, सूतनंदना, तेव्हां ? ॥ ११

अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां, त्वां वारिलें न तें कर्म; ।
तेव्हां गेला होता कोठें; राधासुता, तुझा धर्म ? ॥ १२

पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि जो जसा कुचला ।
आतांचि बरा सुचला ! काळगृहा सर्व व्हा परासु चला; ॥ १३

मार्गेंचि तुम्ही भजतां धर्माला तरि तुम्हांसि वांचविता; ।
आतां मरा, न वांचे दीप्तगृहीं जो न तोय सांचविता; ॥ १४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मागेंचि धर्म करितां, जरि देतां राज्य, धर्म वांचविता; ।
न जगे, जो दुर्भिक्ष-व्यसनापूर्वीं न धान्य सांचविता. ॥ १५

रक्षावा धर्म असा करिसी उपदेश तरि असे मान्य; ।
रक्षितसों धर्मातें; आम्हांला धर्म ठाउका नान्य. ॥ १६

अभ्यास

(अ) **स्ववधोद्यतार्जुन**—(स्व+वध + उद्यत + अर्जुन) आपला वध करावयास तयार झालेला अर्जुन. **अनंतर**—मग. **उद्धरूं**—वर काढूं. **श्रुतिशास्त्रज्ञ**—वेद आणि शास्त्र जाणणारा. **कुलज**—चांगल्या कुळांत जन्म पावलेला. **अधृतायुध**—(अ+धृत+आयुध) हातांत शस्त्र न धरलेला. **व्यथाकुल**—संकटांत सांपडलेला. **कातर**—भित्रा **शर्म**—सुख. **वृष**—(बैल.) कर्णाचें नांव (हें निंदाव्यंजक आहे.) **जतुगृह**—लाखेनें युक्त असें घर. **परासु**—गतप्राण (पर+असु) **रक्षितसों धर्मातें**—येथें धर्म म्हणजे पांडवाचा मोठा भाऊ धर्मराज. या चरणांत 'धर्म' शब्दावर श्लेष आहे.
नान्य—(न+अन्य) दुसरा नव्हे.

(आ) १. कर्ण अर्जुनाला 'थांब, बाण मारूं नकोस' असें कोणत्या कारणामुळें सांगत होता ? कृष्णानें त्याचीं कोणकोणतीं अधर्म्य कृत्यें सांगितलीं ? कृष्णानें कोणती 'कोटी' केली आहे ! (कोटी—चतुरपणाचें भाषण). येथें 'धर्म' शब्दाचा दुसरा अर्थ करून कोटि साधली आहे.
३. सूत—सुत गृह—ग्रह. या शब्दांचे अर्थ सांगा. लिहितांना थोडी चूक झाली तर त्यांचे अर्थ कसे बदलतील पाहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२८ प्रियकर गेला नि रुमालही गेला

परिचय

[पुण्यांत 'सकाळ' नांवाचें दैनिक नि 'स्वराज्य' नांवाचें साप्ताहिक निघत असतें. त्यांत इतर विषयांबरोबर जगांतील निरनिराळ्या देशांतील उद्बोधक व मनोरंजक माहितीहि येत असते. हा धडा अशाच माहितीच्या आधारें तयार केला आहे.]

जिप्सी ही युरोपखंडांतली एक भटकी जात आहे. ही मूळची इजिप्त देशांतली आहे असें म्हणतात. तर कित्येक संशोधकांनीं तिचें मूळ हिंदुस्थान हेंच ठरविलें आहे. कांहीं असलें तरी हिंदुस्थानांतील लमाणांप्रमाणें या जातीचे लोक एका ठिकाणीं स्थिरपणें कधीं राहावयाचे नाहींत, एवढें मात्र खरें ! त्यांच्यांतले पुरुष घोड्यावर बसण्यांत पटाईत असतात. कांहीं जनावरांचे डॉक्टर असतात तर कांहीं सटरफटर धदां करूनही पोट भरतात.

त्यांच्या स्त्रिया 'ज्योतिषा'चा धंदा करतात. बरींवाईट औषधें विकतात नि भीक मागूनही निर्वाह करतात. या लोकांच्या चेहऱ्यांवर उग्रपणा नि भित्रेपणा दोन्ही एकाच वेळीं पाहावयास मिळतात.

या लोकांचें-विशेषतः त्यांच्या स्त्रियांचें-वैशिष्ट्य जादूटोणा करून लोकांना भुरळ पाडण्याचा कसबांत असतें. "भविष्यकथना"चे कामीं जिप्सी स्त्रियांचा हातखंडा असतो. गंडे आणि ताईत किंवा मंतरलेल्या जिनसा विकून त्या चांगलाच पैसा कमवितात. गोड भाषेनें दुसऱ्यावर मोहिनी घालून त्यांना लुबाडणें ही कला त्यांना चांगलीच साधलेली असते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढील गोष्ट स्पेनमध्यें घडलेली आहे.

एकदा एक स्पॅनिश स्त्री एका मोठ्या शहराच्या राजरस्त्यांतून विमनस्कपणें चालली होती. तिच्या चेहऱ्यावर कसली तरी हुरहुर स्पष्ट दिसत होती. तिला पाहून रस्त्यावर कडेला ठाण मांडून बसलेली एक जिप्सी स्त्री म्हणाली, " बाई, तुमचा प्रियकर तुमच्याशीं बेइमान झाला आहे खरं ना ? " आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिचें म्हणणें खरें होतें.

" तुमच्या भजनीं त्यानें पुन्हा लागावें म्हणून मी कांहीं करूं का ? आपल्या हृदयाच्या खोल कप्यांत दडून बसलेल्या भावना इतक्या अचूकपणें उलगडून दाखविणाऱ्या त्या जिप्सी स्त्रीबद्दल त्या स्पॅनिश स्त्रीचे मनांत किती विश्वास, किती आपलेपणा निर्माण झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. तिचें म्हणणें तिनें चटदिशीं मान्य केलें. राजरस्त्यांत हा जादूटोणा करणें बरें नव्हे असें वाटून स्पॅनिश स्त्रीनें त्या जिप्सी स्त्रीची एका निवांत स्थळीं दुसऱ्या दिवशीं भेट घेण्याचा संकेत केला.

" तुमच्या प्रियकराला पुनः तुमच्या पायाशीं लोळण घालयला लावणें मला मुळींच कठीण नाहीं, " ती जिप्सी स्त्री म्हणाली, " त्यानें तुम्हांला भेट म्हणून दिलेला एखादा हातरुमाल तुमच्या-जवळ आहे का ?

एक रेशमी रुमाल त्या स्पॅनिश स्त्रीनें पुढें केला. " आतां एक नाणें या कोपऱ्यांत रेशमानें शिवा. दुसरें दुसऱ्या टोंकाला शिवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशीं चार कोपऱ्यांत चार नाणीं शिवा, नि मधोमध सोनें शिवलें पाहिजे.

सांगितल्याप्रमाणें तीं नाणीं आणि सोनें जागचेजागीं शिवलें गेलें. "द्या तो रुमाल आतां माझ्याजवळ. मी आज मध्यरात्रीं तो मंतरीन. तुम्ही पाहिजे, तर माझ्याबरोबर पाहायला या, मी काय करतें तें. पण एवढें मात्र नक्की हं, उद्यां सकाळीं तुमचा प्रियकर तुमच्याकडे लाळ घोटीत आला पाहिजे!"

या जादूटोण्याच्या भीतीनें ती स्पॅनिश स्त्री मध्यरात्रीं त्या जिप्सी स्त्रीकडे गेली नाहीं. पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिचा प्रियकर तर तिला भेटला नाहीच. पण तिचा हातरुमालसुद्धां तिच्या दृष्टीला कधीं पडला नाहीं!

अभ्यास

(अ) **राजरस्ता**—मोठा रस्ता; मुख्य मार्ग. **हुरहुर**—चिंता, काळजी **प्रियकर**—प्रेम करणारा किंवा जडलेला पति; नवरा. **बेईमान**—खोटेपणा, अप्रामाणीकपणा किंवा (**एकाद्याच्या**) **भजनी लागणें**—नादीं लागणें. **हृदयाचा खोल कप्पा**—मनांतला आंतला भाग. **जादूटोणा करणें**—भुताटकी करणें; मंत्रतंत्र करणें—घालणें; नजर बंदीनें चमत्कार दाखविणें. **लाळ घोटणें**—लांगूल चालन करणें. अगदीं नम्र होणें.

(आ) १. लमाण म्हणजे कोण? त्यांच्यांत नि जिप्सींत कोणतें साम्य आहे?
२. स्पॅनिश स्त्रीचा त्या जिप्सी स्त्रीवर विश्वास कां बसला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२९ आंगठ्याचा प्रताप

परिचय

श्री. गणेश राजाराम वाळिंबे उर्फ 'रामतनय' हे ग्रामीण जीवनावरील कादंबऱ्या लिहिणारे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. खेड्यांतील वास्तव जीवनाचा जिव्हाळ्याचा अनुभव असल्यामुळें त्यांच्या कादंबऱ्यांत त्या अनुभवाचें प्रतिबिंब आपोआपच पडलेलें दिसतें. 'खरा उद्धार' 'साखरगोटी' 'प्रमिला बेन' इत्यादि कादंबऱ्या आणि 'कॅ. प्रताप,' 'वाळू नि बगडी' इत्यादि त्यांच्या गोष्टी बऱ्याच नांवाजलेल्या आहेत.

['खरा उद्धार' या कादंबरींत अरविंद हा एक समाजसेवक खेड्यांत गेलेला असतो. त्या खेड्यांतील सखाराम नांवाचा एक शेतकरी गांवांतल्या तंट्यापायीं तुरुंगांत गेलेला असतो. सखाराम निरपराधी आहे हें खेड्यांतल्या लोकांना माहीत असतें. मग तो तुरुंगांत कसा गेला? हें गौडबंगाल त्या खेड्यांतल्या शेतकऱ्यांच्या तोंडूनच अरविंदाला एकदा ऐकायला मिळालें. आशीक्षित पण प्रामाणिक शेतकऱ्यांना इंग्रजी अमदानींतील कायदेबाज गुंडांकडून कसा त्रास पोचत असे याचें वर्णन पुढील हकीकतींत आढळेल. त्याचप्रमाणें या कोर्टकचेऱ्या खेड्यांतील नैतिक ऱ्हासाला बऱ्याच प्रमाणांत कशा कारणीभूत झाल्या हेंही येथें पाहावयास मिळतें.]

सखारामाच्या शेताजवळ रायबा नांवाच्या शेतकऱ्याचें शेत होतें. त्याच्या जमिनीच्या पट्टीला लागून बळी पाटलाची जमीन होती. तिला लागून सखारामाची जमीन व तिच्या पलीकडे श्रीपतीच्या जमिनीची पट्टी अशा त्यांच्या वडिलार्जित जमिनी होत्या. सखारामानें स्वकष्टानें आपल्या जमिनींत विहीर खणलेली होती. परमेश्वरकृपेनें तिला भरपूर पाणी लागलें होतें. रायबानें सुद्धां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विहीर खणली, पण तिला पाणी बिलकूल लागलें नाहीं. बळी पाटलाची विहीरच नव्हती. श्रीपतीच्या वडिलांनीं काढलेल्या विहिरीस बेताचें पाणी असे. सखाराम व श्रीपतीचे वडील हे जीवश्च-कंठश्च स्नेही होते. रायबाचा मुलगा बच्चा हा शेटजींच्या येथें नोकर होता. तो त्यांचीं पडतील तीं कामें करीत असे. त्याच्या नोकरीमुळें रायबाला कोणाचें कर्ज नव्हतें.

सखारामाविषयीं सर्वांना आदर वाटत असे. तो कैदेंत पडलेला पाहून लोक हळहळत. सखारामाचा अपराध नव्हता ह्याची खात्री सर्वांना होती.

एके दिवशीं रात्रीचीं जेवणें आटोपून शेतकरी आपापल्या शेतांत शेकोटीभोंवतीं शिळोप्याच्या गप्पा मारीत बसले होते. सखारामाच्या झोंपडीवरून हा देखावा मोठा सुंदर दिसत होता. शीतल चंद्रप्रभेनें सर्व वातावरण प्रसन्न झालें होतें. शिवारांतील शेकोट्या आपल्या सौम्य अग्निज्वालांनीं शेतकऱ्यांच्या अंगांतील हुडहुडी धुडकावून लावीत होत्या, त्यामुळें त्यांना उत्साह वाटून पिकाच्या अंदाजाच्या मनोराज्यानें ते उल्हसित झाले होते. आकाशांतील लुकलुकणाऱ्या तारकांशीं हास्यविनोद करण्याकरितां कीं काय, त्या ज्वाला मधून मधून डोलत होत्या.

सखारामाच्या झोंपडीपुढील जागेंत राधाबाई व जिजा ह्या माय-लेकी आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी बोलत तुळशीवृंदावनाजवळ बसल्या होत्या. आंब्याखालील शेकोटीभोंवतीं अरविंद, श्रीपती, रायबा, गोप्या, व रायबाचा जांवई ठकोजी हे बसले होते. ठकोजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा नुकताच तलाठ्याच्या कामावरून कमी झाला होता. अरविंद त्या मंडळींत समरस झाला होता. तो त्या वेळीं सहज म्हणालाः—

"तुम्ही मंडळी सज्जन दिसतां त्याप्रमाणें सखाराम असावा, मग बिचाऱ्याच्या दैवीं तुरुंगवास कां बरं आला?"

कांहीं वेळ कोणीच बोलेना.

थोड्या वेळानें ठकोजी म्हणालाः—

"दादा, तुम्हांला खेड्याची माहिती बेताची दिसते. आम्ही माणसं गरीब दिसतों, पण सारींच तशीं असत नाहींत. 'दिसतं तसं नसतं'. पण सखाराम मात्र प्रामाणिक व गरीब खरा. त्याला आमच्यासारख्यांनीं गोत्यांत घातलं! त्या बिचाऱ्याचा कांहींही अपराध नव्हता."

रायबानें जांवयास डोळा घातला, तेव्हां तो त्याच्याकडे पाहून म्हणाला, "मामा, आतां तर माझी नोकरी गेली आहेच. मग खऱ्या गोष्टी सांगण्यास काय हरकत आहे? ही कांहीं कोर्टापुढील जबानी नव्हे! मग खोटं कशाला बोला?"

रायबाला वाटलें, जांवयाला आपल्यापेक्षां पुष्कळ अधिक माहिती दिसते. पण गोप्या हा बळी पाटलांचा नोकर, तेव्हां तो पाटलांकडे जाऊन पुन्हा वणवा पेटवील, म्हणून तो जांवयास दाबीत होता. तो मधून मधून गोप्याकडे पाहत होता. गोप्याच्या लक्षांत ही स्थिति आली; तो रायबाला म्हणालाः—

"पाटील, भिऊं नगा असं! ह्यो गोप्या असा हरामजादा नाई! माजा पाय तुटुनशान गेलाय. मी जलमाचा अदू झालोंय! माजं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नशीब थ्वार म्हनून आताबी मरतां मरतां वांचलुया या दादांमुळं! आतां मी कवाबी ख्वाटं बोलनार नाई आन् चाडीबी करनार नाई!"

गोप्याचे डोळे भरून आले. त्याला पुढें बोलवेना.

श्रीपती त्याच्याकडे संशयी मुद्रेनें पाहत होता. त्याचाही संशय गेला. पुढें सर्वजण मोकळ्या मनानें बोलूं लागले, त्यावेळीं ठकोजी जोरानें म्हणालाः—

" दादा सखाराम कैदेंत पडला, त्याला कारण त्याचा प्रामाणिकपणा व त्याचा आंगठा!"

यावेळीं ठकोजीनें आपला डाव्या हाताचा आंगठा दाखविला. अरविंदला तें जरा चमत्कारिक वाटलें. तो संशयी दृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागला.

ठकोजी—दादा, मी चेष्टा करीत नाहीं. त्याचा आंगठा त्याला पुष्कळ नडला हें अगदीं खरं आहे. मी चारदोन रुपयांच्या आशेनं त्या पापाचा भागीदारही झालों! आतां वाईट वाटून काय उपयोग! अशा एका कामांत माझी सोन्यासारखी चाकरी गेली. कैदेंत पडलों नाहीं. माझं नशीब! पण पापानं मिळविलेलं धन मात्र त्या तडाख्यांत खलास झालं!

त्यानें एक सुस्कारा टाकला.

अरविंद—मघां तुम्हीं आंगठा दाखविला त्याचा बोध मला होत नाहीं. मग खरी हकिकत सांगाना? थोडी करमणूक होईल झालं!

ठकोजी—खेड्यांतील लोकांना जीव कीं प्राण म्हणजे त्यांची मालकीची जमीन. तिच्याकरितां ते आपल्या जिवाचीही पर्वा करणार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहींत. तीवर कर्जाचा डोंगर उभारतील, पण तिची मालकी उघड्या डोळ्यांनीं दुसऱ्याकडे गेल्याचं त्यांना पाहवणार नाहीं. जन्मदात्या आईवरील त्यांचं प्रेम कमी होऊं शकेल; पण जन्माची मीठभाकरी देणाऱ्या ह्या भूमातेवरील अस्सल शेतकऱ्याचें प्रेम कधींही कमी होणार नाहीं. तिच्यांतील झाडझाडोरा कोणी अनधिकारानं तोडला कीं त्याचा जीव तुट्टूं लागेल ! त्याच्या शेतांतील विहिरीच्या पाण्याचा कोणी अपहार करील, तर त्याच्या जिवाचं पाणी पाणी होईल !

"माझ्या हें लक्षांत आलं. पण सखारामाच्या कैदेचा यांत कोणता संबंध येतो हें तर तुम्ही सांगतच नाहीं !" अरविंद अधिरपणें म्हणाला.

रायबा—जरा ऐका दादा, ह्यो सांगतुया तें संमदं खरं है. सखारामाच्या हिरीला देवदयेनं लई पानी है; म्हनून तर त्येला तरास झालाय !

अरविंद—पाणी भरपूर आहे हें खरं. असं जिवंत आणि स्वच्छ पाणी पिणारे तुम्ही भाग्यवान् आहांत. पाणी पाहिल्याबरोबर दृष्टीला अगदीं समाधान वाटतं.

रायबा—दादा, तुमासारक्याच्या नदरला समादान वाटत असल, पन आमासारक्या शेजाऱ्यांना लई वंगाळ वाटतया ना ? शेजारच्या हिरींना पान्याचा खनखनाट, पन त्याची हीर मार तुडुंब भरल्याली. शेजाऱ्याचीं पिकं उनानं करापल्यालीं, आन त्याच्या जिमिनींत हिरवंगार पीक ! आमच्या पापी नदरला बघवत नाई दादा, आमी खरींच दुस्ट मानसं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठकोजी—ह्या दुष्टपणाला आमच्यासारखे साथीदार असल्यावर मग गोरगरिबांच्या सुखांत माती पडण्यास अवकाश कोणता ?

अरविंद—अशी कोणती दुष्ट कृति तुमच्या हातून घडली, म्हणून तुम्हांला पश्चात्ताप वाटतो ? सांगण्यासारखं असल्यास सांगून टाकाना ? त्यामुळें तुमच्या मनांतील तळमळ तरी निघून जाईल !

ठकोजी—त्याचं असं झालं दादा, सखारामबाबांच्या जमिनीला लागून बळिबा पाटलांची जमीन आहे. त्या जमिनींत आतां उसाचं पीक कसं भरदार आहे पाहा !

अरविंद—हो ! ऊस तर जोमांत आलेला दिसतो. मी श्रीपतीला म्हटलं होतं; एकदा ऊस आणीनास; चार पैसे द्यावे लागले तर देऊं. पण तो म्हणाला, "मी उसाकडे पाहणार नाहीं; दुसऱ्याच्या मळ्यांतून मोळीभर आणून देतों पाहिजे तर !"

रायबा—शिरप्या तकडं ढुंकून सुदा पाहनार नाई ! त्येचा व पाटलाचा उभा दावा !

श्रीपती—तुमचं नी त्याचं जमतंय ना ?

अरविंद—तलाठीसाहेब, तुम्ही सांगा आपली हकिकत. कशाला दुसऱ्याच्या उखाळ्या पाखाळ्या काढा !

ठकोजी—सखारामबाबा भोळा, त्याच्या विहिरीचं पाणी बळी पाटलांनीं आपल्या शेंतांतील वाळत चाललेल्या पिकाकरितां मागितलं. विहिरीला अपरंपार पाणी. गांवचा पाटील पाणी द्या म्हणतो, तर द्यावं एक साल, असं वाटून त्यानं पाणी दिलं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अरविंद—दिलं असेल पाणी ! पण आजही त्या शेताला ह्या विहिरीचें पाणी मिळतें हें कसें ?

ठक्कोजी—ह्याला कारण आमची दुष्ट कृति आणि सखारामानं दिलेला निशाणी आंगठा, दादा !

अरविंद—याची फोड करून सांगाल का ?

ठक्कोजी—गांवांतील जमिनीच्या हक्कनोंदणीचे कागद पाटील तलाठ्याच्या ताब्यांत असतात. त्याला क व ड पत्रक म्हणतात. त्यांत बळीपाटलांनीं ही विहीर समाईक म्हणून लावण्यास मला सांगितलं. पाटलांनीं मलाही खूष केलं ! मी तशी नोंद करतांना बळी पाटलाचा व सखारामबाबांचा जबाब लिहून व त्यावर सखाराम-बाबांचा निशाणी आंगठा घेतला. एकदोन वर्ष पीकपाहणीच्या पत्रकांत बळी पाटलाचं बागाईत पीक नोंदीत आलों. त्यामुळं त्या विहिरींत बळी पाटलाचा फुकटांत निम्मा हिस्सा चालू केला.

अरविंद—सखारामबाबांना ह्याचा सुगावा कांहींच लागला नाहीं ?

ठक्कोजी—त्यांना लागेल तर आम्ही चित्रगुप्त कसले ? कोणी अधिकारी आला, कीं त्याची सरबराई खूप ठेविली कीं झालं ! तो अशा कागदांवर सह्या करितांना विचारतो कशाला ? कोणाची तक्रार असल्यास तो तरी चौकशी करणार ! पण ह्या आंगठेवाल्या गोर-गरिबांना ह्यांतलं समजून येतं कशाला ? शिवाय असे लोक त्या वेळीं शेतांत असावयाचे. आम्ही त्यांना रुजवातीकरितां चावडींत अधि-काऱ्यासमोर बोलावितों तरी कशाला ? सारा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ हा दादा !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अरविंद—पण ह्यामुळें सखारामाला कैद कशी ?

रायबा—दादा, आमाला पाटील तलाट्याच्या हिकमती समजल्या नाहींती, तरी आमी आपल्या जिमिनींत रोज असतोय. हकडची तनसडी तकड गेली कीं आमाला खपत नाई. बळिबा पाटलाचं आन् सकारामाचं असंच त्येढं आलं दादा ! म्वाट सुटल्यावर सकारामाचा योक बैल एकदां बळिबा पाटलाच्या जिमिनींत धावला आन् बांदा-वरल्या गवतावर चरूं लागला. पन ह्या गोप्यानंच रट्टा देऊनशान त्येला पिटाळलं. इतक्यांत बळिबा ततं आला. त्येनं सकारामावर त्वांड लई सोडलं. त्येंचा झगडा सुरू झाला. तवां दहापांच जन आमी जमलों ततं. सकारामाची समजूतबी घातली. पन त्यामुळं बळिबा पाटील लई फुगला. त्याचं त्वांड सुरूच होतं. धन्याच्या जिवावर गोप्याबी गुरगुरत व्हता तवां !

श्रीपती – पण बळ्याचा मोदळा म्यां राव कसा फेकून दिलाय तेंबी सांगाना दादांना !

रायबा—शिरप्या ! म्हनूनच तर पाटील तुला पान्यांत पाहातुया. उगाच बडबड करूं नगस. आतां गोप्याबी बरा झालाय. आन् तो बळिबाबी गांवांत नाई. नाईतर तुझ्यामागं हात धुऊन लागला असता त्यो. आतां त्वांड आवरून आस बरं शिरप्या !

गोप्या—नगा सांगूं रायबा पाटील मागची कहानी ! त्यो दिस मनांत आला कीं लई भ्या वाटतं मला आताबी !

रायबा—दादांना समदं सांगूं या कीं ! आतां तुला भ्या कसलं ? तो बळिबा आतां हाय कुठं इतं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीपती—मीच सांगतों दादा तुम्हांला. सखारामबाबा रागावला. दुसऱ्या दिवशीं बळ्या पाटलाची मोट त्यानं बंद पाडली. बळ्या पाटील गांवांतून धावत आला. तो सखारामबाबाशीं धिंगामस्ती करण्याच्या इच्यारांत होता. काकू जवळ होती. ती रडूं लागली. मीबी धावत गेलों. मी त्याच्याच तालमींतला. तवां माझी भीती त्याला वाटत नव्हती. सखारामबाबानं मोटचं बैल पिटाळून दिल होत. तो धाववर बसला होता. दोघांची बाचाबाची चालू होती. लोक गोळा झाल. तो बाबांच्या अंगावर गेला. कोणीच त्याला आवरेना. बाबांना तो धक्के देणार, इतक्यांत काकू मध्यें पडल्या. त्यांनीं शिव्या दिल्यामुळं बळ्या फार चिडला. त्यानें एक काठी मारली. पण झटकन् काकू पुढें झाल्या. त्यामुळं ती त्यांना लागून त्या जमिनीवर पडल्या! बळ्या पाटलापुढं कोणीच येईना. जो तो लांबून 'पाटील, हें बरं नव्ह!' एवढं ओरडून सांगत होता. पण मला फार चीड आली राव! मी मागून गेलों व बळ्या पाटलाचा मोदळा दिला हिरींत फेकून! माझ्या दुप्पट तो गडी! पण मला चेव आलेला! मी विहिरींत फेंकल्याबराबर मी राव जी धूम ठोकली तों गेलों गांव सोडून!

रायबा—अर, तूं पळालास म्हणूनशानी त्येच्या तडाक्यातनं सुटलास. नाईतर जिता राहिला नसतास शिरप्या!

अरविंद—मग काय! याच भांडणामुळं सखारामबाबांना शिक्षा झाली म्हणतां? बरा उलटा न्याय म्हणायचा!

रायबा—त्यामुळं नाई दादा. बळिबा पाटलाच्या तालमींतल्या शिरप्या पोरानं त्याला उचलूनशान हिरीमंदी फेकल्याचं त्येला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लई वंगाळ वाटलं ! हीर काटोकाट भरली व्हती. म्हनूनशान् त्यो जायबंदी जाला नाई. पन शिरप्याचा सूड कवां उगवीन असं त्येला होऊन गेलं. पण ह्येनं तर पोबारा केलेला ! मंग दांतव्हट खात खात त्यो गेला. गांवांत जकडं तकडं पाटलाचा बोजवारा उडाला; म्हनूनशानी त्येनं घरबी त्या दिशीं सोडलं नाई दादा !

ठकोजी—काय झालं बघा, शिरप्या रात्रीं कोठें गेला कोणास ठाऊक ! नाहींतर तो ठार व्हायचा. बिचाऱ्या गोप्याचा पाय मात्र त्या गडबडींत तुटला व गोप्या लंगडा कोल्हा बनला !

गोप्या—जरा दम दादा. मीच सांगतुं पुडं ! त्या दिशीं रातीं पाऊस पडला व्हता. म्हनूनशान शिरप्याची ख्वाप मोकळी व्हती बगा. तींत मी लवंडलों. अक्षी काळाकुट अंधार पडला व्हता तवा ! माजा डोळाबी लागत व्हता, तवां योक हळूहळू काळ्या त्वांडाचा समंद आला. आन् काय सांगतां राव ! त्येनं कुराडीचा घाव घातला माझ्या पायावर ! 'आयईग, आयई !' असं मी किंचाळलों. तवां 'शिरप्या नव्हर नव्ह' म्हनूनशानी समंद पळाला. मला मंग सूद नवती दादा !

रायबा—गोप्याच्या किंचाळीनं समंद रान गराजलं ! मी आन सकाराम धावत धावत गेलों तकडं. गोप्याला सूद नव्हती तवा ! आमी कसा बसा त्येचा पाय बांधला. आन पाटलाच्या गोट्यांत त्येला नेऊन टाकलं दादा !

अरविंद—मग ह्याला कोणीं मारलें ? त्याच्या मालकानं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोप्या—नव्ह वो नव्ह ! आमचा मालक असं करायचा नाई दादासाब ! कोनी भूतच शिरप्याच्या छाताडावर बसन्याकरतां आलं असल, शिरप्यानं पाटलाला हिरींत फेकलं म्हणूनशान ! म्हसोबाबी आला असल त्येला मारायला ! पण त्येला तथं मीच गावलों. देवार, देवा !

गोप्याला त्या वेळची आठवण होऊन त्याचें अंग थरारूं लागलें.

अरविंद आश्चर्यानें स्तंभित झाला व म्हणाला :—

" काय गौडबंगाल आहे हें समजत नाहीं. कांहीं माणसांना काळीज नसतें, हेंच खरें ! "

ठकोजी—काळीज कसलं घेऊन बसलां राव ! खेड्याचा कायदा न्याराच असतो. पाण्याचा खटका चालूच होता. सखारामबाबादेखत मोट धरण्याची पंचाईत पडूं लागली. तेव्हां पाटलाला हा खटला त्याचा कांटा काढण्याला फार उपयोगी पडला. शिरप्या आरोपी म्हणावा तर तो परागंदा झालेला ! मग सखारामबाबा आरोपी; जबाबावर आंगठा बाबांचा; आम्ही लिहिणार एक; वाचणार दुसरं; त्यावर निशाणी आंगठा घेतला कीं, काम झालं ! सखारामबाबांना वाटत होतं, आपण निरपराधी, देव आपल्या बाजूचा, पण कोर्टांत देव कांहीं आला नाहीं ! साक्षीपुरावा तयार करणारे आम्ही. पाण्यासारखा पैसा खर्चणारे आम्ही. सखारामबाबांचं नांव घेणारा गोप्या. झाली शिक्षा बाबांना !

अभ्यास

(अ) १ खेड्यांतील लोकांचें कोणतें वैशिष्ट्य वांतील वर्णनावरून लक्षांत येतें ? त्यांना आपली जमीन जीव कीं प्राण कां वाटते ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ पाटील हा खेड्यांतला राजा आणि कुळकर्णी किंवा तलाटी हा त्याचा प्रधान अशी स्थिति पूर्वकालींही होती. इंग्रजी आमदानींत यांचे अधिकार नाहींसे झाले; पण त्यांची गुंडगिरी मात्र वाढली. याचें कारण काय असावें असें तुम्हांला वाटतें ?

३ खेड्यांतल्या नोंदबुकांचीं कोणतीं नांवें इथें आलीं आहेत ? त्यांत कोणत्या नोंदी केलेल्या असतात त्यांची माहिती मिळवा.

४ या धड्यांत आलेले पांच वाक्प्रचार एका खालीं एक मांडून त्यांचे अर्थ स्पष्ट करा.

५ 'वंगाळ,' 'नदर,' 'हिरी,' 'योक' 'भ्या' या शब्दाऐवजीं तुम्ही कोणते शब्द योजाल ?

६ गांवांतले गुन्हे हुडकून काढण्यासाठीं सध्यां कोणती व्यवस्था आहे ? त्यांत कोणती सुधारणा व्हावी असें तुम्हांला वाटतें ?

---

३० हिंवाळा

परिचय

अनिल—श्रीयुत आत्माराम रावजी देशपांडे हे मध्यदेशांतील प्रसिद्ध विद्वान् व कवि असून मुक्तछंद काव्याचे हे प्रवर्तक व अभ्यासक आहेत. मुक्तछंद हा शब्द व छंदःप्रकार प्रवर्तन करणारा पहिला लेख यांनीं नागपूरच्या वागीश्वरी मासिकांत लिहिला होता. यांचे फुलवात, भग्नमूर्ति पेतें व्हा इत्यादि काव्याचे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. हा काव्यप्रकार आतां सर्वमान्य होत आला आहे व याचें श्रेय ह्यानांच आहे.

[येथें घेतलेली कविता त्यांच्या 'फुलवात' या पुस्तकांतून घेतली आहे. शिशिर-ऋतूंत निसर्गाची स्थिती कशी होते; या दृष्टीनें या कवितेकडे पाहा—]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(जाति—अभिसारिका)

(चाल—सुटला पितृदिशेचा वारा)

चढली शिशिर ऋतूची कळा
आली सृष्टिवरी अवकळा
सुटले सोसाट्याचे मेघामधले वारे
गोठलें हिमाद्रिंत गंगाजल कीं सारें
भरली हरिणांना हुडहुडी
ससेही देउन बसले दडी
सृष्टीला भरलें हिंव थरथरे अंग
लोपले धुक्यांतच सर्व उषेचे रंग
मिटल्या वेलींवरल्या कळ्या
फुलांच्या झडल्या कीं पाकळ्या
उपवनिंचा गेला बहर सर्व ओसरुनी
कोषांतच पडलीं फूलपाखरें मरुनी
गारठल्या राघू मैना
पसरे फुलावर दैना
झाडांची गळली पात, लता भयभीत
कंठांतच थिजलें कोकिलमनिंचें गीत !

अभ्यास

(अ) **कळा**—तेज. **अवकळा**—निस्तेजपणा, मलिनपणा. **उपवन**—(सुद्दाम तयार केलेली) बाग. **कोष**—कीटक आपल्या अंगाभोंवतीं तंतूंची पिशवी करतात ती. **पात**—पानें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(आ) १. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत व शिशिर असे सहा ऋतु आपण मानतों. हेमंत व शिशिर यांत थंडी असते. कडक थंडामुळें झाडांचीं पानें गळून पडत असतात. सृष्टीला शोभा झाडांच्या हिरव्यागार पानांनींच अधिक आलेली असते. शिशिर ऋतूंत बहुतेक पानें गळून जातात. ह्यामुळें सृष्टीची शोभा नाहींशी होते अर्थात तिला निस्तेजपणा येतो. गार गार वारे सुटतात, पशुपक्ष्यांना थंडीमुळें कांपरें भरतें, कीटक कोशांत जातात. फुलें नसतात, इत्यादि वर्णन कवीनें केलें आहे.

२. 'कंठांतच थिजलें कोकिलमनिंचें गीत'—याचा सरळ दिसणारा अर्थ व कवीला सुचवावयाचा अर्थ याविषयीं गुरुजींजवळ चर्चा करा.

---

३१ मास्टर कृष्णाचें गायन

परिचय

लेखक श्री. बाळकृष्ण वामन फाटक हे चालू पिढींतलें विनोदी लेखक असून त्यांच्या विनोदाचे क्षेत्र कोल्हटकर-गडकरी चिंतामणराव जोशी इत्यादींहून भिन्न आहे. शिवाय पौराणिक कथा खुलवून लिहिण्यांतहि ते कुशल आहेत. मधून मधून 'रेडिओ वरही त्यांचीं भाषणें होत असतात. 'आण्णा' 'चाळींतील चाळे' 'कारकुनांचे धंदे' 'महारथी कर्ण' इत्यादि त्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

[श्री. कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्टर कृष्णा हे एक नामांकित गवई आहेत. त्यांच्या गायनाला लोकांच्या उड्यांवर उड्या पडतात. या गोष्टीचा फायदा एका चाळींतल्या गृहस्थानें घेऊन आपल्या मुलाची कशी जाहिरात केली हें या गोष्टींत सांगितलें आहे.]

"ही 'रंके' चाळ कुठंशी आली हो?" हातांत 'लोकमान्य' घेतलेल्या 'भोळ्यां' नीं विचारलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" ती ना ? ' रावबावडी 'जवळ " ' काळे ' म्हणाले.

" पण ही ' रावबावडी ' तरी कुठं आहे ? "

" 'रंके' चाळीजवळ. " ' काळे ' संथपणें उत्तर देते झाले !

" अहो, पण ह्या दोन्ही कुठंशा आहेत ? "

" एकमेकांजवळ ! " निर्विकार मुद्रेनें ' काळ्यां 'नीं म्हटलें.

" माझे आई ! " ' भोळे ' कोपरापासून हात जोडीत बोलले,

" वात्रटपणा पुरे; आतां खरं सांगा पाहूं. "

" पण कां हो, कशाला पाहिजे ही तुम्हांला ? "

" अहो, तिथं मास्टर कृष्णाचं गाणं आहे—"

" काय ? मास्टर कृष्णाचं ! " ताडकन खुर्चीवरून उठत 'काळे' उद्गारले, " आणा; आणा पाहूं तो ' लोकमान्य ' ! " त्यांनीं तो अंक जवळजवळ हिसकावून घेतला आणि वाचल्यावर ते म्हणाले, " काय नामी संधी आलीय् ! "

" होय ना, म्हणून तर—"

" अहो, पण तिथं पासाशिवाय प्रवेश कसा मिळणार ? "

" पाडूं कुठून तरी भोंक. तुम्ही कुठं आहे तें तर पाहा. मला नुसतं सांगा कीं ' भोळ्या ' आंत शिरलाच म्हणून समजा ! "

" ठीक. मग तुमच्या पत्रावळीजवळ आमचा द्रोण बरं का ! "

" डोंट् वरी, डोंट् वरी. " ' भोळे ' बोलले, " तें मी करीन. "

" करा बुवा ! गायन ऐकावं तर मास्टरचंच ! अशी हृदयाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तार छेडतोय म्हणतां! तें "जो पिया तोडूं," तें "सा सुंदर बदन," तें "वंदे मातरम्"—

"झिंजोटी रागांतलं ना? कलकत्त्याला काय इंप्रेशन मारलंय म्हणतां!"

"—आणि 'पियाकर धर देखो दरकत है?—' आठवते कीं नाहीं तुम्हांला ती चीज?" 'भोळ्यां'नीं विचारलें; आणि ते जे रंगांत आले ते गाऊंच लागले—

"पियाकर धर देखो दरकर है—पियाकर धर—
पियाकर धर—"

"धरतों बाबा धरतों!" 'काळे' मध्येंच ओरडले, "पण ती चाळ?—"

"शोधून काढा" 'भोळ्यां'नीं बजावलें.

"ओ. के." 'काळे' उद्गारले.

* * * *

सात वाजले होते.

चाळीच्या प्रवेशद्वाराजवळच

"मास्टर कृष्णाचें गायन, रात्रौ १०"

असा बोर्ड लटकत होता, त्याच्याकडे नजर टाकीत लोक आंत शिरत होते.

"अरे, गायनाला पास कसे नाहींत?" एक शंकाळला.

"एवढ्याशा व गल्लींतल्या चाळींत राहणारे लोक, पण वृत्ति कशी विशाल! नाहीं तर ते "बाराबाग इस्टेट'चे लोक! म्हणे फक्त चाळवासीयांसाठीं!!" दुसरा उत्तरला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणखी एक आंत शिरणारा बरोबरच्याला म्हणाला, " पायांतल्या बुटांचं काय ? "

" अरे, विचारतोस काय ? घे काढून हातांत !" आणि असें म्हणत त्यानें स्वतःचें चिखलानें बरबटलेलें चप्पल बरोबरच्या बझार-पिशवींत कोंबलें देखील !

मंडपांतील सर्व जागा माणसांनीं फुलून गेली. किनाऱ्यावर एका-मागून एक लाटा येऊन आदळाव्या तशी मंडळी येऊन धडकतच होती. मुंगी रिघण्यासही वाव नव्हता. पण अशांतही एक गलेलठ्ठ इसम, " अरे वईउड्या ! मी येऊं का ?" म्हणून तेथें बसलेल्या एका इसमाला खुणावीत आपला मार्ग काढूं लागला. त्या गर्दींतून पुढें जातांना कधीं ह्याच्या गळ्यांत पड, तर कधीं त्याच्या डोक्यावर बस; एकदां ह्याच्या खांद्यावर हात ठेव, तर दुसऱ्यानें त्याच्या मांडीवर पाय ठेव; असा त्यानें प्रकार चालविला होता. मध्येंच वीतभर जागा जाहे असें वाटल्याबरोबर त्यानें तेथेंच टेंकण्याचा प्रयत्न केला. तो बसतो असें पाहिल्याबरोबर आजूबाजूच्या मंडळींनीं त्याला वीरासारखा वरच्यावर उचलून धरला. पण ते तरी एवढें धूड किती वेळ वर धरून ठेवणार ? सोडावाच लागला त्यांना; आणि मग जी कांहीं स्वारी खालीं कोसळलीय ! त्यामुळें त्याचा एक फायदा झाला तो हा कीं, खालचीं माणसें हा अंगावर पडेल म्हणून आपोआप दूर झालीं आणि त्याला आयतीच रिकामी जागा मिळाली ! अंग ठेंचल्याच्या दुःखापेक्षां जागा मिळाल्याचा आनंद केव्हांही अधिक होता !

* * * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आठ वाजून गेले.

जमा झालेली मंडळी स्वस्थ थोडीच बसणार ? कांहींनीं हातरुमाल हलविले तर कांहींनीं कागदी विमानें वर उडविण्यास सुरुवात केली. हीं बेटीं विमानें वर उडत तीं नेमकीं स्त्रियांच्या अंगावर येऊन पडत ! इतक्यांत कुणींशी टोपी काढली, त्यासरशीं "शेंडे नक्षत्र उगवलें" म्हणून ओरड सुरू झाली. ह्या ओरडींत एकानें एक टोपी हवेंत भिरकाविली. मग काय, ती खालीं पडूं द्यायची नाहीं म्हणून खटपट सुरू झाली आणि त्या टोपीचा अक्षरशः 'फुटबॉल' बनविण्यांत आला ! जवळच्या भिंतीला टेकून एक शिडी उभी करण्यांत आली होती. तिच्या एकेका पायरीवर दोहोंपेक्षां अधिक माणसें उभीं राहिलीं होतीं. शेवटीं आणखी एकानेंच चढण्याचा प्रयत्न केला व एका काडीच्या भारानेंही उंट कोसळला म्हणतात तशीं सारीं उभीं माणसें शिडीसह खालीं कोसळलीं !

आतां नऊ वाजले होते.

प्रेक्षकांतून एकानें दुसऱ्यास म्हटलें, "या चाळींत पूर्वीं कधीं असा मोठा प्रोग्राम झाल्याचं आठवत नाहीं."

"नसला म्हणून काय झालं ?" दुसरा उत्तरला. "अरे, सटरफटर कार्यक्रम करण्यापेक्षां एक असा भग्गच प्रोग्राम करावा."

"होय तर, म्हणजे लेका तुझी सोय होईल."

आणखी अनेक तऱ्हेची बोलणीं सुरू होतीं, इतक्यांत एकाएकीं "आले ! आले !!" अशी आरोळी उठली. टाळ्या वाजूं लागल्या,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिट्या सुरू झाल्या. आणि एकानें तर आपला बेंडबाजाही बाहेर काढला !

एक उंच टोपी घातलेला आणि एक फॅशनेबल पण बोडका असे इसम गर्दींतून व्यासपीठाकडे जाऊं लागले. त्यांना पेटी आणि तबलावाले समजून लोकांनीं वाट करून दिली.

ते पुढें गेले आणि व्यासपीठाजवळ आल्यावर मागें वळून त्यांनीं सर्व श्रोतृसमुदायावर एक विजयी नजर फेंकली आणि तेथेंच टेकले नी काय !

सारे लोक थंड पडले !

"खूप केलीत टोपीवाले" एक ओरडला.

"नुसतीच टोपी नाहीं. टोपी खालीं डोकं आहे बरं का ?" दुसऱ्यानें साथ केली.

"आणि ते मागचे बोडके भाई ?" एक आवाज आला. "त्यांनीं तर आपणांस चांगलीच टोपी घातली कीं !"

"त्यामुळंच त्यांच्या डोक्यावर नाहीं बरं का !" दुसरा एक उद्गारला.

आतां पावणेदहा वाजले होते.

स्टेजवर तबला, पेटी आली. लोकांचा जीव भांड्यांत पडला. तालसूर जमविण्यास सुरुवात झाली. पांचदहा मिनिटें गेलीं, साधारण पंधराएक वर्षांचा मुलगा तंबोरा घेऊन मध्यें येऊन बसला. मास्टर कृष्णाला तो साथ करणार असावा असें लोकांना वाटलें. बरोबर दहाला त्यानें 'यमन' राग गाण्यास प्रारंभ केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक आ वासून पाहत राहिले.

" अरे हा कोण मध्येंच उपटसुंभ ? "—एक आवाज.

" चालूं द्या, सिगारेटची तलफ विडीवर !"—दुसरा.

" मास्टर कृष्णा येईपर्यंत तेवढीच करमणूक ! " तिसरा.

पहिली चीज संपली. कांहींनीं मौज म्हणून तर कांहींनीं मनापासून टाळ्या वाजविल्या.

त्या मुलाला स्फुरण चढलें.

त्यानें आतां " डोळे हे जुल्मि गडे "ला सुरुवात केली.

पहिल्यानें सारी सभा चित्रासारखी तटस्थ होती, पण थोड्याच वेळांत ती नागासारखी डोलूं लागली. त्या मुलानें श्रोत्यांवर चांगलीच छाप पाडली. " हाय रे मार डाला ! " श्रोत्यांतून उद्गार येऊं लागले.

आणखी दहा मिनिटें गेलीं. लोक इतके रंगले कीं आपण मास्टर कृष्णाचें गाणें एकावयास आलों ही जाणीव त्यांना नसावी असें वाटलें !

आतां त्यानें " वारा फोंफावला " गाण्यास सुरुवात केली.

* * * *

खालीं मंडपांत हा प्रकार चालला होता, तर वरच्या मजल्यावर एका खोलींत 'केतकर,' 'शंकरराव,' 'आबा,' 'भय्यासाहेब' आणि इतर मंडळी बसली होती. खालून एकूं येणाऱ्या प्रत्येक तानेसरशीं केतकरांचें हृदय आनंदानें उडत होतें; पण इतरांचे चेहरे मात्र एरंडल प्याल्यागत झाले होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'केतकर' 'म्हणाले, "हं, भय्यासाहेब, मीं माझे शब्द खरे केले आहेत; आतां पैजेचे पंचवीस रुपये काढा पाहूं. माझ्या मुलाचं गाणं कुत्रासुद्धां ऐकणार नाहीं म्हणून म्हणत होतां ना! तीं पाहा खालीं शेंकडों माणसें त्याचें गाणें ऐकत आहेत, अगदीं आनंदानें ऐकत आहेत—"

'शंकरराव' केतकरांची कड घेऊन म्हणाले, "न ऐकायला काय झालं? तुमच्या मुलांत-कृष्णांत-गूणच तसे आहेत. पण 'शेजारची होकल कुरडी' अशी आमच्या कोकणांत म्हण आहे, त्यांतला प्रकार!"

"आम्ही पैज हरलों. हे रुपये घ्या." भय्यासाहेब सांगूं लागले, "केतकर, तुम्हीं आमच्यावर कुरघोडी केलीत आणि शेंकडों लोकांनाही चकवलंत. तुमच्या मुलाचं नांव 'कृष्णा' असल्यामुळें तुमची ही ट्रिक साधली; पण घी देखा लेकिन बडगा?"

केतकरांनीं घाबरल्यासारखा चेहरा करून म्हटलें, "काय?"

"अहो, तुमचा मुलगा कृष्णा—म्हणजे मास्टर कृष्णा—लोकांना किती वेळ बनवील? मास्टर कृष्णराव कुठं आहेत, म्हणून शेंकडों लोकांनीं गिल्ला केला कीं तुम्ही काय करणार?"

"माझ्या मुलाचं—मास्टर कृष्णाचं—गाणं शेंकडों लोकांनीं शांतपणें ऐकून टाळ्या वाजविल्या ना? तुम्ही त्याला कचरा किंमत देत होतां. लोकांनींच निकाल दिला. झालं माझं काम. तुम्ही आणि ते लोक, काय तें पाहून घ्या." केतकरांनीं कानांवर हात ठेवले!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"असं काय करतां केतकर?" उत्सवचालक विनवणी करून सांगूं लागले, "तें पाहा—तें ऐकलंत? मास्टर कृष्णा कुठं आहे म्हणून लोक ओरडूं लागले. हें डोकं लढवलंत तसाच यांतून कांहीं मार्ग काढा. हे लोक गप्प राहायचे नाहींत. मांडव मोडतील, स्टेज तोडतील, काय वाटेल तें करतील. जनतेचा क्षोभ आहे तो—कांहीं करा पण आमची अब्रू वांचवा."

"बचावीन पण एका अटीवर—"

"बोला काय ती. तुम्हीं सांगितल्याप्रमाणं आम्हींही तुमचं गुपित राखलं. खरा कोण गाणार हें लोकांना कळूं दिलं नाहीं. तेव्हां—"

"आभारी आहें मी तुमचा. पण माझ्या मुलाचं गाणं शेंकडों लोकांनीं ऐकावं अशा लायकीचं आहे ही गोष्ट कबूल?"

"कबूल." 'गोविंदराव' म्हणाले. 'सुसरीबाई तुझी पाठ मऊ' म्हणून कार्य साधून घेण्यावांचून गत्यंतरच नव्हतें.

"तुम्ही सर्व ही गोष्ट मानतां ना? मग चाळीतर्फे माझ्या मुलाला—मास्टर कृष्णाला—एक पदक द्या पाहूं."

"द्यायला आमची ना नाहीं; पण या वेळीं पदक—"

"त्याची नको काळजी. हें घ्या." केतकरांनीं खिशांतून पदक बाहेर काढीत म्हटलें, "त्यावर सर्व कांहीं लिहिलेलं आहे."

कार्यकारी मंडळाला धक्काच बसला! केतकरांच्या पद्धतशीर योजनेचें त्यांना कौतुक वाटलें. पण 'आबां'च्यानें राहवेना. त्यांनीं विचारलें :—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"केतकर, तुमच्या डोक्याची तारीफ करावी तेवढी थोडीच. पण जमलेल्या लोकांच्या बाबतींतहीं तुम्ही कांहीं योजना आंखलीच असेल—"

"तें काय विचारायला का पाहिजे?" 'भय्यासाहेब' केतकरांना हरभऱ्याच्या झाडावर चढवीत म्हणाले, "यांतून त्यांनीं मार्ग काढलाच असणार! चाळीच्या म्हणजे पर्यायानं त्यांच्याही अब्रूचा प्रश्न आहे हा."

केतकरांच्या अंगावर मूठभर मांस चढलें. त्यांनीं विचारलें, "किती वाजले?"

"पावणे अकरा." भय्यासाहेब उत्तरले.

"ठीक. चला खालीं आणि उरका पाहूं हा पदकदान-समारंभ."

"प...पण मास्टर कृष्णरावांचं—" 'शंकरराव' मध्येंच शंकाळले.

"मी माझी जबाबदारी ओळखतों. मुकाट्यानं मी सांगतों तसं करा."

कार्यकारी मंडळ खालीं आलें. केतकरांच्या मुलाला चाळीतर्फे पदक देण्यांत आलें! मग व्यवस्थापक म्हणाले, "सद्गृहस्थहो, आतां शेवटची भैरवी म्हणून मास्टर कृष्णा आपलें गाणें संपवील."

"तें ठीक; पण मास्टर कृष्णराव कुठं आहेत?" लोकांनीं एकच गिल्ला केला.

"शांत व्हा." केतकरांनीं सांगितलें, "ते आल्याबरोबर तुमच्याकडे आणून सोडतों. तोंवर ही भैरवी ऐका."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक गप्प बसले. भैरवीचे कोमल मधुर स्वर हवेंत पसरूं लागले. इकडे कार्यकारी मंडळाचीं हृदयें धडाधड उडत होतीं. केतकर कसा मार्ग काढणार हेंच त्यांना कळेना.

बरोबर अकरा वाजतां "केतकर, केतकर" करीत तारवाला शिपाई ओरडत आला. तो थेट केतकरांजवळ व्यासपीठाकडे गेला. गाणें थांबलें; सर्वांचेंच लक्ष इकडे वेधलें. केतकरांनीं तार वाचली आणि आंबट चेहरा करून म्हटलें, 'कांहीं अपरिहार्य कारणामुळें मास्टर कृष्णराव येत नाहींत.'

निराश अंतःकरणानें मंडळी निघून गेली. करतात काय बिचारे!

"बाकी बरी झाली. आमच्या चाळीकडे कोणी फिरकत नसे. आले कीं नाहीं हजारों लोक! कसं बनवलं केतकरांनीं?" एक चाळकर म्हणाला.

"अरे, पण तुम्हांलाहि बनवलं त्याची वाट काय?" दुसऱ्यानें म्हटलें.

अभ्यास

(अ) १ या गोष्टींत दाखविलेली फसवणूक दुष्टपणाची नव्हती मग ती कोणत्या हेतूनें करण्यांत आली असें तुम्हांला वाटतें?

२ गर्दीतल्या चेंगराचेंगरीचें वर्णन कसें केलें आहे? अशा गर्दींत आलेले तुमचे स्वतःचे अनुभव सांगा.

३ यांत आलेल्या तीन म्हणी सांगून त्या संबंधाच्या गोष्टी थोडक्यांत सांगा.

४ यांत कोणते इंग्रजी शब्द आले आहेत? त्यांच्या ऐवजीं तिथेंच त्या अर्थाचे मराठी शब्द घातले तर बरे दिसतील कां? का?

५ 'शेंडी' 'टोपी' या शब्दांवर इथें कोणत्या कोटया केल्या आहेत?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३२ तिबेटच्या स्वतंत्र वनिता

परिचय

लेखिका सौ. मालतीबाई दांडेकर ह्या अलीकडच्या स्त्रीलेखिकांतील एक अग्रेसर लेखिका आहेत. महाराष्ट्रांतील अनेक नियतकालिकांतून त्यांच्या गोष्टी वारंवार प्रसिद्ध होतात आणि स्वतंत्र गोष्टींचींही त्यांचीं पुस्तकें लोकमान्य झाली आहेत. त्यांच्या भाषेंतील सहजसुंदरता या वर्णनात्मक गोष्टींतही दिसून येते.

[तिबेट हा भरतखंडाच्या उत्तरेला असलेला एक लहानसा स्वतंत्र देश आहे. आपल्या पुराणांत वर्णिलेला स्वर्ग लोक तो हाच असावा असें अनेक संशोधकांचें म्हणणें आहे. पण तें कसेंही असलें तरी या देशाचे नि भारतखंडाचे प्राचीन कालापासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत ही गोष्ट निःसंशय आहे. अशा या देशांतील स्त्रीवर्गाचे आचारविचार नि सामाजिक राहणी यांची ओळख इथें एका विशिष्ट पद्धतीनें करून देण्यांत आली आहे.]

जीभ बाहेर काढून स्वागत !

यावें, यावें ! वास्तविक आम्ही अगदीं तुमचे शेजारीच. पण ही मोठी हिमालयाची भिंत मधें आहे ना ? हिमालय ओलांडला कीं आमचा तिबेटच सुरू होतो बरं का ? पण तो पांच हजार फूट बर्फाचा पर्वत कोणी ओलांडूंच शकत नाहीं, म्हणून आम्ही दुरावलों आहोंत तुम्हांला ! हसूं नका गडे. ही अशी जीभ बाहेर काढणं म्हणजे आम्ही 'स्वागत करीत आहों' असं समजायचं तुम्ही ! इकडे हीच आहे पद्धत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोळ्यांचा चहा !

घ्या ना, चहा घ्या. खरंच, सांगायचं राहिलं. हा चहा तुमच्याप्रमाणें गोड न् पातळ नाहीं हो ! इकडे हिवाळ्यांत थंडी भयंकर, तेव्हां थंडीनं गोठून हे लोण्याचे सुद्धां बघा कसे घट्ट खडे झाले आहेत. लोणी अन् मीठ घालतों आम्ही चहांत, मग घालतों जवांचं पीठ. अन् रवीनं घुसळून गोळे करतों. ते पाहा, तुमच्यापुढें चार लाडू चहाचेच आहेत, ते घ्या ! काय नाहीं आवडला ? बरं तर, घरांत चला. तुम्हांला हवा तसा करून देतें मीं !

तंबाखू ओढणाऱ्या वनिता

आमचीं घरं आपलीं साधीं, दगडमातीचींच असतात हो ! छप्पर पाहा, अगदीं सपाट आहे. अन् भिंतीवर बुद्धाच्या प्रतिमांचीं चित्रं आहेत. सबंध तिबेट बुद्धधर्मीय आहे. तुमच्या हिंदुस्तानाप्रमाणें इकडेही गरिबी आहे. ज्या लोकांना दगडमातीही घरं बांधायला नसते ते लाकडांचीं घरकुलं करतात. आणखी आमच्यांत कांहीं नेहमीं फिरणारे कायमचे प्रवासी असतात, त्यांचं तर तंबू हेंच घर असतं ! मुक्काम पडेल तिथें तंबू उभारावा ! त्या पाहा, दूर इमारती दिसतात ना ? तीं देवळं आहेत मोठमोठीं, अन् तिथें आमचे धर्मगुरु—लामा न् मुख्य गुरु दलाई लामा—येऊन राहतात. तो मोठा 'पोताल' राजवाडा पाहा. तिथें तर पांचशें लामा न् नोकर राहतात. "दलाई लामा" हेच आमचे राजे असें समजतों आम्ही...घेतलात का चहा ? आवडला नाहीं ? तंबाकू घ्या ना थोडी ! अय्या ? तुम्ही ओढीत नाहीं होय ! बरं, निदान तपकीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरी ? तीही नको...? बरं बरं, राहूं द्या. इकडे सारींच माणसं, स्त्रिया—पुरुष, तपकीर अन् तंबाकू ओढतात सर्रास, म्हणून विचारलं आपलं तुम्हांला !

चक्रानें प्रार्थना !

हां हां, हें दारावर होय ? हें किनई आमचं प्रार्थनेचं चक्र अडकवलेलं आहे. तुम्ही फिरवाना हें. पाहुण्यानंही हें फिरवावं म्हणजे शुभेच्छा दाखवल्यासारखं होतं ! आम्ही प्रार्थना अशीच करतों. प्रार्थना म्हणून म्हणून तोंड दुखेल, म्हणून आम्ही कागदावर प्रार्थना लिहून या चक्रांत ते कागद ठेवून फिरवतों ! जितके फेरे, तितकीं पारायणं होतात ! इकडे पुष्कळ लोक रस्त्यांतूनही हीं यंत्रं हातांत घेऊन जात असतात. अन् मोठमोठ्या पवनचक्क्या अन् पाणचक्क्यांवर सुद्धां हीं यंत्रं असतात, म्हणजे पाणी अन् वारा यांच्या सहाय्यानं प्रार्थना मोठी होते ! आहे कीं नाहीं मजा ?

सुंदर भाकरी !

तुम्ही लांबून आलांत, भूक लागली असेल तर चला जेवायला, तयार आहे जेवण. गहूं, जव, वाटाणे अन् घेवड्याच्या शेंगा एकत्र कुटून आईनें सुंदर भाकरी केल्या आहेत. शिवाय, 'याक'चे अर्धे-कच्चें मांस आहे, डुकरं अन् उंटाच्या मांसाचं अन् चरबीचं सुंदर पक्वान्न आहे, चहाचे लाडू आहेत. अगबाई, तुम्ही मांसाहार मुळींच घेत नाहीं ? अय्या, मग तुमचं निभावतं तरी कसं ? बरं, तुम्ही आपली भाकरी अन् चहाचे लाडू घ्या म्हणजे झालं. गोड मानून घ्या हो, या याकीचा पाहुणचार !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अन् पोषाख ?

झालं ना जेवण ? आतां बाहेर हिंडायला जाऊं या. थांबा मी पोषाख करतें आधीं. काय टक लावून पाहतां बाई आमच्या गरिबांच्या पोशाखांत एवढं ? हा पाहा, माझा पायघोळ, लालभडक फ्रॉक. हा किनई मेंढीच्या कातड्याचा केला आहे अन् हा वर पट्टा पाहिलात का बांधायचा ? कांही लोंकरीचाच आहे. आमच्या पोशाखांत खिसेबिसे नाहींत. तेव्हां ह्या पट्ट्यांतच आम्ही खूप वस्तु ठेवतों झालं ! ही पाहा सुरी आहे, चिलीम तर असायचीच, प्रार्थना-चक्रही छोटं आहेच, थोडी विणकामासाठीं लोंकर आहे, सगळं मावतं यांत.

दागिने ?

आमचे बूट पाहा. पिवळ्या लालभडक चामड्याचे गुडघ्यापर्यंत बूट आम्ही वापरतों. तो पाहा, माझा भाऊ आला. त्यानं टोपीसुद्धां चामड्याची घातलेली आहे. आमच्या पोशाखांत स्त्री-पुरुषांत या टोपीशिवाय फारसा फरक नसतोच ! त्या टोपीला लेस पाहिलीत ना किती सुरेख आहे ती ? कोंकराच्या कातड्याची मींच विणून लावली आहे बरं का ती ! काय म्हणतां ? माझ्या भावाच्या कानांत काय दिसतंय् ? अहो, ती भिकबाळी आहे चांगली जंगी ! अन् तिचं ओझं कानाला फार होतं म्हणून आम्ही त्याला एक दोरी बांधून केसांत देतों अडकवून ! ही भिकबाळी मोती अन् वैडूर्यरत्नांची आहे. आमच्या इकडे या रत्नाच्या खाणी आहेत हो ! थांबा जरा. गळ्यांत आम्ही सोन्या—चांदीचे, किंवा तांब्याचेही हार घालतों....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण माझा हा एक अलंकार किती सुंदर दिसतो, पाहा तरी एकदां.... चामड्याचा किंवा कापडाचा तुकडा हा असा मुलींच्या डोक्याच्या मापानं घ्यायचा, अन् एक टोंक कपाळावर अन् एक लांब पाठीमागें सोडायचं. यावर जरीचं तऱ्हेतऱ्हेचं काम करतों आम्ही. ह्यावर सोन्या–मोत्यांचं जडावकाम असतं, कुठं कुठं सुंदर मणि, रत्नंसुद्धां बसवतात. हा मी डोक्याला बांधतें. सणावारीं आम्ही हा मुकुट घालतों. आज आमच्या तान्ह्या भावाचं नांव ठेवतील. पांचवा दिवस आहे ना? बारसं आहे आज तेव्हां घालून येतें हें डोक्याला, पाहा मी किती सुंदर दिसतें या माझ्या दागिन्यानं! बाबा तर म्हणतात, कीं याकी एकाद्या राणीप्रमाणें दिसते हा मुकुट घातल्यावर!

याक म्हणजे कामधेनु!

होय का हो? हं...चला झाली तयारी. पण थांबा, एक राहिलंच! बाहेर थंडी फार आहे...म्हणून उघड्या हातांना चरबी फांसून जाऊं या. नाहीं तर तुम्हांला त्रास होईल. अन् तुम्हीही माझे हे बूट घाला जाऊन येईपर्यंत. कारण, बर्फांतून या साध्या वहाणांचा निभाव लागणं कठीण! पाय घसरतात सारखे...आमच्या बुटांना पाहा जाड कसे दोरखंडाचे तळवे केले आहेत ते! वाटेल तितका बर्फ असूं द्या...आतां तुमचे पाय घसरणार नाहींत...हं चला! हे आले बघा आमचे दोन याक...बसा तुम्ही एकावर! मीही बसतें यावर...अन् जाऊं या! छे, छे! याकला भिऊं नका मुलींच! तो अगदीं गरीब आहे. केसाळ बैलच म्हणतात इकडचा! किती केस आहेत, पाहिलंत ना? अहो, इकडची हवा अशी विचित्र;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थंडी फार; इतकी कीं जिन्नस गोठतात !...उन्हाळ्यांत इतकं उन्ह लागतं कीं अंगाला सुद्धां भेगा पडतात !...म्हणून ही चरबी फांसावी लागते ! आमचे याक म्हणजे कामधेनूच आहेत या हवेंत ! प्रकृतीनें कसे मजबूत असतात ! अन् हिमालयाच्या वाटेल त्या भागांत प्रवासाला चला ! माझा याक कुठेंही न घसरतां तुम्हांला घेऊन जाईल...किंवा तुमची मोठमोठीं ओझीं तो वाहून आणील ! दऱ्याखोऱ्यांतून, बर्फाच्या उतारावरून, अडीअडचणींतून—पाहणारा-लाच भय वाटेल अशा जागींसुद्धां—आमचे याक जिवाची पर्वा न करतां चढउतार करतात. वेळप्रसंगीं नदीनाल्यांतून पोहून जातील. डोंगरांच्या चढणीवर नेतील; जंगलांत हवं तिथं चला ! कधीं माघार घेत नाहींत ! याकचा उपयोग आम्हांला अनेक तऱ्हेनं होतो बरं ! आमचे कपडेही यांच्या या केसाळ चामड्यांचे असतात. या दाट केसांचं विणकाम करून आम्ही तंबूंचीं कापडं सुद्धां तयार करतों ! शिवाय याचं मांस फारच स्वादिष्ट असतं बरं का ! आमचा एक अगदीं म्हातारा याक होता; फारच आवडता होता तो. माझं "याकी" असं नांव ठेवलं आहे तें त्याची आठवण म्हणूनच हो ?

शिक्षण.

छे, छे ! आमचं कसलं शिक्षण ? इंग्रचीचं बंड इकडे मुळींच नाहीं. आमचे लामा परकीयांना मुळीं परवानगीच देत नाहींत देशांत यायला ! त्या सुधारणाही नकोत अन् ती मग परवशता पण नको ! खरं ना ? मला पाली भाषेंतले ग्रंथ वाचतां येतात. भगवान् बुद्धांचं चरित्र मला माहीत आहे; पण घरगुती कामं काय थोडीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतात? कापडं विणणं, ही डोक्याची बिंदी करणं, मांसाचा स्वैंपाक, सगळीच त्रासाची राहणी. शिवाय आम्ही शेतांतूनही राबतों.

स्त्रियांना पुष्कळच स्वतंत्रता

आमच्याकडे स्त्रियांना पुष्कळच स्वतंत्रता असते हो! आम्ही पुरुषांत मिसळून नाचगाणीं करतों. आमची मावशी तर शेतांत जाते, दुकान संभाळते, सगळा व्यापार पाहते. तेव्हां पुरुषांशीं बोलायचं नाहीं हें कसं जमणार? आमच्या तिबेटांत स्त्रीला मान्यता असते! अय्या! आलोंच आपण मामांच्या तंबूजवळ. मामा आमच्या बाबांप्रमाणें शेतकरी नाहींत, ते फिरते व्यापारी आहेत, म्हणून बाराहि महिने तंबूंतच घर करतात. चला तंबूंत. मामींची हालहवाल पाहूंया जरा!

मिच् मिच् डोळे!

तंबूबाहेर पाहिलंत का, मांस सुकवायला ठेवलं आहे तें! थंडी फार, तेव्हां हें नासण्याची भीति नाहीं—थंडींत जरा ठेवलं कीं एकदम सुकून जातं. अहो, लाकडाला सुद्धां भेगा पडतात थंडीनं! काय सांगावे हाल? या पाहा, किती शेळ्या न् मेंढ्या चरताहेत पलीकडे. या सगळ्या मामांच्याच आहेत हं! त्या पाहा, आमच्या मामी दूध काढीत आहेत शेळ्यांचं. त्यांनीं मेंढराच्या कातड्यांचे कोट एकावार एक तीन चढवले आहेत थंडीमुळः! छे, छे; ! त्यांचे डोळे बिघडलेले नाहींत कांहीं! चकचकीत बर्फाकडे पाहून पुष्कळ लोकांचे डोळे इकडे असेच मिच्मिच् करतांना दिसतील तुम्हांला! —उद्यां यांचा मुक्काम हलेल. शेळ्या, मेंढ्या, डुकरं, याक, सगळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्यां फिरतीवर निघणार ! इकडचं सोनं, कस्तुरी, टाकणखार, लोंकर हे चीनमध्यें विकून त्याबद्दल कापड अन् चहाच्या विटा हे खरेदी करीत असतात.

स्वतंत्र राष्ट्रांत जन्मलेली स्वतंत्र स्त्री.

बसा ना ! सतरंज्या देखील कातड्याच्याच आहेत. किती मऊमऊ आहेत पाहा तरी ? पुन्हा चहा द्या मामी यांना थोडा. या हिंदुस्तानांतून आल्या आहेत....काय निघालांत ? हे चार चहाचे लाडू प्रवासांत राहूं द्या जवळ ! अन् हा एक छोटासा कातड्याचा कोट तुमच्या मुलासाठीं घेऊन जा, या तिबेटी मैत्रिणीची आठवण म्हणून ! बराय्, या आतां. लक्ष्यांत राहूं द्या कीं याकीच्या चालीरीती विचित्र असल्या तरी ती स्वतंत्र राष्ट्रांत जन्मलेली स्वतंत्र स्त्री आहे म्हणून !

अच्छा, नमस्ते ! प्रवास जपून करा हो !

अभ्यास

१ या धड्यांत तिबेट स्त्रियांसंबंधानें ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्याच गोष्टींचीं इकडच्या स्त्रियांसंबंधाची माहिती द्या. उदाहरण :—स्वागत, चहा, भोजन, पोषाख इ०

२ यांत आलेल्या गोष्टींशिवाय आणखीही कांहीं विचित्र चाली त्या देशांतल्या स्त्रियांत दृष्टीस पडतात. त्या तिबेटसंबंधाचीं पुस्तकें मिळवून समजून घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३३ घनश्याम सुंदरा....!

(भूपाळी)

कवि होनाजी बाळा हा शेवटच्या बाजीराव पेशव्याच्या काळांतला शाहीर कवि होता. (कित्येकांच्या मतें होनाजी व बाळा वेगवेगळे असून बाळा हा होनाजीच्या फडांतला डफवाला होता). त्यानें ऐतिहासिक पोवाडे, लावण्या वगैरे बरेंच काव्य रचिलें. त्याची कविता त्या वेळच्या सामान्य पद्धतीप्रमाणें प्रसंग पाहून तत्काळ तयार होई.

[भूप हा गायनांतला एक 'राग' असून त्या रागांत रचलेलें गाणें ती भूपाळी होय. भूपाळ्या प्रायः पहांटेच्या शांत वेळीं म्हणावयाच्या असतात. प्रस्तुत भूपाळी श्रीकृष्णासंबंधी असली तरी तींत कवीच्या वेळच्या समाजाचें चित्र उमटलें आहेच.]

घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला ॥
उठिं लवकरि वनमाळी ! उदयाचळीं मित्र आला ॥धृ०॥

सायंकाळीं एके मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं ॥
अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ॥
अधमर्षणादि करूनि तापसी तपाचरणदक्षी ॥
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं ॥
यमुनाजळासि जाति मुकुंदा ! दध्योदन भक्षीं ॥

चाल बदलून मुक्तता होउं पाहे, कमलिनीपासुनी भ्रमरा ॥
पूर्वदिशे मुख धुतलें, होतसे नाश तिमिरा ॥
उठिं लवकरि गोविंदा ! सावळ्या नंदकुमरा ॥

चाल पहिली मुखप्रक्षालन करीं आंगिकारीं भाकरकाला ॥उठिं०॥१॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती ॥
गीत गाती सप्रेमें गोपी सदना येति जाती ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालूं पाहती ॥
आनंदकंदा ! प्रभात झाली उठ, सरली राती ॥
काढिं धार क्षीरपात्र घेउनी धेनू हंबरती ॥
दारिं उभे गोपाळ हाक मारुनि तुजला बाहती ॥

चाल बदलून हे मुक्ताहार कंठीं, घालिं या रत्नमाळा ॥
हातीं वेत्रयष्टि बरवी कांबळा घेइं काळा ॥
ममात्मजा मधुसूदना, हृषिकेशी जगत्पाळा ॥
चाल पहिली हंबरताति वासरें हरि ! धेनुस्तनपानाला ॥ उठिं०॥ २ ॥

प्रातःस्नानें करुनि गोपिका अळंकारें नटती ॥
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभिती ॥
प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळि गाती ॥
अर्घ्यदान देउनियां द्विजगण देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णुपूजा समर्पिती ॥
स्मार्त शिवार्चनसक्त, शक्तितें शाक्तहि आराधिती ॥

चाल बदलून ऋषिगण, आश्रमवासी, जे निरंजनीं धाले ॥
अरुणोदयिं आपुलाले ध्यानीं निमग्न झाले ॥
पंच पंच उषःकालीं, रविचक्र निघों आलें ॥
चाल पहिली एवढा वेळ निजलासि म्हणुनि हरि ! कळेल नंदाला॥उठिं० ३

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं ॥
अध्यापन गुरु करिती शिष्यहि अध्ययना उदयीं ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याज्ञिकजन यज्ञिकुंडिं आहुति टाकितात पाहीं ॥
रविप्रभा पडुनियां उजळिल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे पाडसे सांवळे, उठिं कृष्णाबाई ! ॥
सिद्ध सर्वे बळिराम घेउनी गोधनें वना जाईं ॥

चाल बदलून मुनिजनमानसहंसा, गोपीमनःकमलभृंगा ! ॥
मुरहर ! पंकजपाणी ! पद्मनाभ ! श्रीरंगा ! ॥
शकटांतक सर्वेशा, हे हरि प्रतापतुंगा ! ॥

चाल पहिली कोटिरवींहुनि तेज आगळें तुझिया वदनाला ॥
होनाजी बाळा नित्य ध्यातसे हृदयीं नाममाळा !॥ घन०॥४॥

अभ्यास

(अ) **मित्र**—सूर्य. (सूर्याचीं पुढील बारा नांवें प्रसिद्ध आहेतः—मित्र, रवि, सूर्य, भानु, खग, पूषन् हिरण्यगर्भ, मरीचि, आदित्य, सवितृ, अर्क व भास्कर. हीं नांवें उच्चारून नमस्कार घालण्याची रीत आहे.) **द्विज-गण**—पक्ष्यांचा समुदाय, (पक्षी) ब्राह्मण. पक्ष्यांना पहिला अंड्यांतला जन्म; आणि दुसरा अंड्यांतून बाहेर आल्यावर पक्षीरूपांतला. ब्राह्मणालाही असे दोन जन्म मानतात; प्रथम आईबापांच्या पोटीं मिळालेला पहिला व उपनयन—मुंज या संस्कारानें मिळालेला दुसरा. **अघमर्षण**—पापनाशक विधि (हातांत पाणी घेऊन त्यावर नाकांतील श्वास सोडून तें पाणी जमिनीवर टाकणें.) **दध्योदन**—(दधि+ओदन) दहींभात. **वेत्र**—वेत. **यष्टि**—काठी. **मंथन**—ताक करणें. **अर्घ्यदान**—मंत्र म्हणून ओंजळीनें पाणी सोडणें. **वैष्णव**—विष्णु या देवतेची भक्ति करणारे. **स्मार्त**—शंकर या देवतेची उपासना करणारे. **शाक्त**—शक्ति म्हणजे देवी, तिची उपासना करणारे. **निरंजन**—निराकार, निर्विकार, निर्लेप, असें ईश्वरी स्वरूप. **पंच पंच उषःकाल**—सूर्योदयापूर्वीचा पांच घटकांचा काळ,—अगदीं पहांट. **सादर**—आलेले;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(आद्रयुक्त असाही अर्थ आहे.) **पंकज**–कमल. (पंक+ज) **पाणि**–हात. **पद्मनाभ**—(पद्म + नाभि) नाभीच्या ठिकाणीं कमळ असलेला विष्णु. **शकटांतक**—(शकट–गाडा, एक राक्षस+अंतक–मारणारा.) कृष्णानें लहानपणीं शकटरूप राक्षसाला मारिलें होतें; म्हणून त्याला हें नांव योजतात.

(आ) १ यांतील श्रीकृष्णाचीं नांवें व विशेषणें एकाखालीं एक लिहून काढा.

२ त्या वेळीं प्रातःकाळ होतांच कोणकोणत्या गोष्टींना सुरुवात करीत ?

३ 'कमलिनीपासून भ्रमर मुक्त होणें' 'दाही दिशा उजळणें.' यांवर टीपा द्या.

४ आई मुलाला शाळेंत जाण्यासाठीं सकाळींच उठवीत आहे अशी कल्पना करून आई व मुलगा यांच्यामधील एक संवाद तयार करा.

---

३४ जळाविण मासा !

परिचय

लेखक श्री. ज. नी. कर्वे हे पुणें येथील सर 'परशुरामभाऊ कॉलेज' मध्यें शास्त्रीय विषयांचे प्राध्यापक असून शास्त्रीय विषय सुगम करून सांगणारे अनेक लेख व पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत.

[माशांचें सारें जीवन पाण्यांत असतें. पाण्याशिवाय मासा जगूंच शकणार नाहीं अशी सर्वसामान्य समजूत आहे. पण या सृष्टींत सामान्य माणसाला आकलन न होणाऱ्या अनेक गोष्टी दिसून येतात, त्यांतलीच पाण्याच्या बाहेर राहूनही जगूं शकणाऱ्या इतकेंच नव्हे तर झाडावरही चढणाऱ्या माशाची गोष्ट आहे ! 'दर्यावर्दी' मासिकांत, अशा प्रकारच्या माशांची माहिती आलेली आहे, त्यांतील पुढील भाग मनोरंजक व उद्बोधक वाटेल.]

एखादा मनुष्य त्याच्या स्वभावाशीं सर्वस्वी विसंगत अशा परिस्थितींत सांपडून त्याचा कोंडमारा होऊं लागला म्हणजे त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थितीचें वर्णन करतांना आपण "जळावीण जैसा मीन" असें म्हणतों. माशांच्या जीवनाला पाणी आवश्यक आहे, त्याच्याशिवाय ते जगणें अशक्य, अशी आपल्या मनाची असलेली दृढ समजूत याला कारणीभूत आहे. सर्वसाधारणपणें ही समजूत खरी पण आहे. पाण्याबाहेर काढल्यानंतर श्वासोच्छ्वास करतां न आल्यामुळें मासे थोड्याच वेळांत मरतात.

मासे कल्ल्यांच्या साह्यानें श्वासोच्छ्वास करतात. कल्ल्यांची रचनाच अशी असते कीं, फक्त पाण्यांत विरघळलेली हवाच श्वसनाकरतां माशाला उपयोगांत आणतां येते. प्रत्यक्ष हवेंत मासा ठेवला तर त्याला या हवेचा उपयोग करतां येत नाहीं. ज्या पाण्यांत विरघळलेली हवा नाहीं किंवा तापविल्यामुळें ज्या पाण्यांतील हवा नाहींशी झालेली आहे किंवा ज्या पाण्यांत पुष्कळ मासे राहिल्यामुळें त्यांतली हवा वापरून संपली आहे, अशा पाण्यांत मासा जगूं शकत नाहीं. अर्थात् बहुसंख्य माशांनाच हें लागू आहे. पाण्याबाहेर काढलेल्या निरनिराळ्या माशांच्या जिवटपणांत फरक पडतो.

ईल आणि कार्प जातीचे मासे पाण्याबाहेर काढल्यानंतरही कित्येक दिवस जगतात. कल्ल्यांच्या आसपास असलेल्या पोकळ जागेंत जें कांहीं थोडें बहुत पाणी असतें किंवा जो ओलसरपणा असतो, त्याचा श्वसनाच्या कामीं उपयोग करून ते जगूं शकतात. समुद्र बऱ्याच ठिकाणीं खूप खोल आहे, अशा खोल पाण्यांत फार थोडी हवा विरघळलेली असते. या ठिकाणीं राहणारे मासे मिळेल तेवढी हवा आपल्या शरिरांत असलेल्या हवेच्या पिशवींत सांठवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवतात. पण कांहीं मासे असे आहेत कीं, ते दीर्घ काळपर्यंत पाण्याच्या बाहेर किंवा ज्या पाण्यांत फारच थोडी हवा मिसळलेली आहे अशा पाण्यांत जगूं शकतात. श्वसनाचा प्रश्न हे मासे कसा सोडवितात? ज्या परिस्थितींत त्यांचे भाऊबंद निश्चितपणें मरतील त्या परिस्थितींत हे मासे जगतात तरी कसे?

'गोबी' नांवाचा एक मासा आहे. हा मासा समुद्रकांठीं कांदळाचीं झाडें असलेल्या पाणथळ जागेंत, खाड्यांमधून किंवा नद्यांत राहतो. मुंबईच्या आसपास शिवडी, घोडबंदर वगैरे बाजूला हे मासे पुष्कळ आहेत. ओहोटीनंतर शेंकडो गोबी मासे खाडीच्या किंवा समुद्रकांठच्या चिखलांत आढळतात.

गोबीचे डोळे बटबटीत, फार पुढें आलेले व डोक्यावर असतात. ते पाहिले म्हणजे बेडकांच्या बटबटीत डोळ्यांची आठवण होते.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेडकाला ज्याप्रमाणें आपले दोन्ही डोळे वाटेल त्या दिशेला फिरवितां येतात, त्याप्रमाणें गोबीला देखील ते फिरवितां येतात. गोबी हा फार दक्ष मासा आहे. आपले डोळे एकसारखे सगळ्या बाजूंना फिरवून तो चोहींकडे नजर ठेवतो व खुट्ट झालें किंवा आपल्याकडे कोणी पाहतो आहे असें वाटलें तर सावध होऊन चिखलांत बुडी मारतो किंवा कांदळाच्या मुळांखालीं जाऊन लपतो. या हुशार आणि चपळ माशाला पकडणें यामुळेंच फार कठीण जातें.

संकट टळलें अशी खात्री झाल्यावर हळू हळू एक, मग दुसरा असे एकामागून एक सगळे लपून बसण्याच्या जागेंतून बाहेर पडून चिखलांत वावरूं लागतात. एखादा आडवा झालेला माणूस दोन्ही कोपरें टेंकून आपल्या शरिराचा छातीपुढचा भाग ज्याप्रमाणें वर उचलून धरतो, त्याप्रमाणें गोबीदेखील आपल्या छातीच्या परांच्या आधारानें शरिराचा पुढचा भाग उचलून धरून सर्व बाजूंना टेहळणी करीत असतो. मधून मधून आटोक्यांत आलेले किडे व माशा खाऊन तो गट्ट करतो. चिखलाच्या पृष्ठभागावरून पुढें सरकतांना तो छातीच्या परांचाच उपयोग करतो. कांदळाच्या मुळांवर व खोडांवर त्याला चढतां येतें. झाडावर चढतांना ज्याप्रमाणें आपण आपल्या हातांचा उपयोग करतों; त्याप्रमाणेंच गोबी आपल्या छातीच्या परांचा करतो पण मुख्य प्रश्न गोबी माशाच्या श्वसनाबद्दल होय. पाण्याबाहेर राहत असतांना तो श्वासोच्छ्वास कसा करतो ?

प्रथम एक गोष्ट लक्षांत ठेवायला पाहिजे कीं, प्राण्यांचीं श्वसनेंद्रियें, कल्ले किंवा फुप्फुसें यांच्यासारखीं गुंतागुंतीचीं असलीं पाहिजेत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें नाहीं. कित्येक प्राणी असे आहेत कीं, त्यांना कल्लेही नाहींत आणि फुप्फुसेंही नाहींत. पण या प्राण्यांच्या शरिराचें आवरण—कातडी—श्वासोच्छ्वासाचें काम करते. श्वसनेंद्रियांची रचना पाहिली असतां असें दिसून येईल कीं, रक्तांतील 'कार्बन डायॉक्साइड' वायु आणि शुद्ध हवेंतील 'ऑक्सिजन' वायु यांची अदलाबदल अत्यंत पातळ त्वचेमधून होत असते. म्हणजे कल्ले किंवा फुप्फुसें नसलेल्या प्राण्यांत शरिराच्या ज्या भागावर पातळ त्वचा असेल तो भाग श्वसनक्षम होऊं शकतो; मात्र त्या त्वचेला एका बाजूनें रक्ताचा व दुसऱ्या बाजूनें शुद्ध हवेचा पुरवठा झाला पाहिजे. कांहीं माशांचीं पिलें परांच्या साह्यानें श्वासोच्छ्वास करतात. शिंगाडा, शेंगळ वगैरे माशांच्या जातीचे कांहीं मार्जार–मत्स्य आंतड्यानें श्वासोच्छ्वास करतात. हे मासे तोंडानें हवा आंत घेतात, तेथून ती पोटाच्या मार्गानें आंतड्यांत जाते आंतड्याला रक्ताचा भरपूर पुरवठा होत असतो, व हें रक्त आंतड्यांत असलेल्या हवेमधून ऑक्सिजन शोषून घेतें.

आपला गोबी मासा जेव्हां जरूर पडेल तेव्हां शेपटीनें श्वासोच्छ्वास करतो. शेपूट पाण्यांत बुडवून तो बसतो व पाण्यांत मिसळलेल्या हवेंतून ऑक्सिजन शोषून घेतो. पण श्वसनाकरितां सर्वस्वी शेपटीवर बिसंबून राहणें गोबीला शक्यच नसतें. कारण भक्ष्यशोधार्थ तो पुष्कळ वेळ पाण्याबाहेर असतो. गोबीचे कल्ले डोक्याच्या दोन्ही बाजूंस असलेल्या दोन खांचांत असतात. या खांचा बऱ्याच मोठ्या असल्यामुळें कल्ल्यांच्या आजूबाजूला पुष्कळ रिकामी जागा असते. ह्या रिकाम्या जागेंत गोबी हवा सांठवून ठेवतो. दोन्ही कल्ल्यां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भोंवतालच्या या पोकळ्या गोबी माशांचीं फुप्फुसें होत व पाण्याबाहेर असतांना श्वसनाच्या कामीं तो यांचा उपयोग करतो.

अभ्यास

१ एका मोठ्या कांचेच्या भांड्यांत पाणी घालून त्यांत लहान मासे आणून सोडावे म्हणजे त्यांची हालचाल बाहेरून पाहावयास मिळेल. ते श्वासोच्छ्वास कसा करतात हें या धड्यांत सांगितलेंच आहे. घरच्या घरीं नदीच्या, विहिरीच्या किंवा नळाच्या पाण्यांत हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें ज्या पाण्यांतली हवा निघून गेली आहे अशा तापविलेल्या—तापवून थंड केलेल्या पाण्यांत हा प्रयोग करून पाहतां येईल.

२ सामान्य माणसांना सहज न समजणाऱ्या अशा कितीतरी गोष्टी या सृष्टींत पाहावयास मिळतात. मांजराला काळोखांत कसें दिसतें? सर्पाला कान कुठें असतात? कुत्र्याचें घाणेंद्रिय तीक्ष्ण कां? ढेकणाचें स्पर्शेंद्रिय कसें असतें? ही माहिती मिळवा. यावरून सृष्टिकर्त्याबद्दलं कोणती भावना तुमच्या मनांत उत्पन्न होते ती लिहा.

३ 'गोबी' माशाचें थोडक्यांत वर्णन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३५ पहांटे निजणाऱ्या मुलांस

परिचय

कवि श्री. वा. गाडगीळ हे पूर्व महाराष्ट्रांतले (द. हैद्राबाद) आधुनिक कवि होत. त्यांच्या 'काव्यलतेवर फुललेल्या फुलांपैकी कांहीं निवडक फुलें' "माझीं फुलें" या नांवाच्या संग्रहांत प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांचें सौंदर्य व सुगंध यांचा प्रत्यय प्रस्तुत एका कवितेवरूनही येईल.

[पूर्वी विद्यार्थी 'पंच पंच उषःकालीं' उठून अभ्यासाला लागत. अलीकडे ही पद्धत मोडली आहे. पण तिचें पुनरुज्जीवन होणें अवश्य आहे. या कवितेंत कवि हेंच मुलांना आळवून आळवून सांगत आहे.]

(चाल—त्रिखंड हिंडुनि धुंडितसें)

उठा मुलांनो! उठा उठा, पहाट झाली, उठा उठा!
कुक्कुट आतां आरवती, धेनू हंबरुनी उठती,
पक्षीही घरट्यांमधुनी मोदभरें जाती उडुनी
रजनी सरली सृष्टि सगळी जागृत झाली
कां तुम्ही मग निजलेले; आळस तुमचा कां न पळे? १

प्राचीकडुनी लगबगुनी लाल उषा उगवे हसुनी
पहा उठोनी तिला जरा आळस जाइल मग सारा
स्याली सोडुनि चंद्रकळा श्वेतांबर सृष्टि बाला
फुलें विकसलीं हलूं लागलीं शोभा आली
पहा पहा या बागेला कां हो तुम्ही मग निजलां? २

फूलपांखरें, मधमाशा मुंग्या उद्योगी कैशा
उडती चोहिंकडे फिरती. निजकर्तव्यीं दक्ष किती!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चैतन्यानें सर्व भरे निद्रा तुमची कां न सरे ?
शयना त्यागा कामा लागा जडता भंगा
उन्नति तुमची होईल कुदशा सगळी जाईल ३

पुष्पें अर्पुनि लता पहा वसुंधरा पूजिती अहा
तेंवि उठोनो तुम्ही अतां गुरुजन वंदा; कां निजतां ?
किलकिल पक्षी ओरडती ईशाला ते आळविती
तरी उठोनी मोहा त्यजुनी ईश्वर चरणीं
वंदा; प्रभुगुणगान करा ऐका हें मद्वान जरा ! ४

निद्रेला देऊन रजा उठा; शारदेप्रती भजा
परि राखा आरोग्य सदा; आरोग्याविण यश न कदा !
सुपुत्र होउन देशाचे द्या स्वातंत्र्य तया साचें
तुम्हां लागुनी या मम गानीं म्हणें विनवुनी
उठा मुलांनो, उठा, उठा ! पहांट झाली, उठा उठा ! ५

अभ्यास

(अ) **कुकुट**—कोंबडा. **मोदभरें**—पुष्कळ आनंद. **प्राची**—पूर्वदिशा, **चंद्रकळा**—स्त्रियांच्या एका लुगड्याची तऱ्हा. **श्वेतांबर**—पांढरें वस्त्र. **चैतन्य**—हालचाल. **शयन**—झोंप. **जडता**—आळस; मंदपणा.

(आ) १ पहांटेच्या वेळीं सृष्टिशोभा कशी असते तें सांगा.

२ यांतील शेवटच्या कडव्यांत 'सुपुत्र होउनि देशाचे। द्या स्वातंत्र्य तया साचें॥ असें म्हटलें आहे. यावरून या कवितेचा काळ केव्हांचा असावा असें तुम्हांला वाटतें ? आतां यांत तुम्ही कोणत्या शब्दांचा बदल सुचवाल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६ न्यायालयाची प्रतिष्ठा

परिचय

लेखक श्री. शिवराम श्री. वाशीकर हे पटकथा व संवाद लेखक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेतच. शिवाय त्यांनीं कादंबरी व इतिहासक्षेत्रांतही भरींव कामगिरी केली आहे. तुकाराम, ज्ञानेश्वर रामशास्त्री इत्यादि बोलपटाच्या त्यांच्या कथा व संवाद यांनीं त्यांचें नांव महाराष्ट्राच्या घराघर गेलें आहे.

[पेशवाईतील सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांच्या जीवनक्रमावर आधारलेला रामशास्त्री हा बोलपट पुष्कळांच्या पहाण्यांत असेलच. त्यांतला एक प्रसंग येथें घेतला आहे.]

स्थळ—(पेशव्यांची न्यायकचेरी. रामशास्त्री न्यायासनावर असून त्यांच्या पुढें एक खटला चालू आहे.)

भालदार—निगाह रख्खो–निगाह रख्खो–मुन्सफे अल्ला–तशरीफ आ रहें है–निगाह रख्खो अदबसे ।

दप्तरदार—(रामशास्त्र्यांना फिर्याद समजून सांगतात,) आपला वीस लाखांचा माल विसाजीपंत लेल्यांनीं लुटला अशी फिरंग्यांची फिर्याद आहे.

रामशास्त्री—तुमच्या म्हणण्याला कांहीं पुरावा ?

(लागलीच दुभाष्यानें त्याचें भाषांतर करून फिर्यादीला विचारलें.)

दुभाषी—आ सिन्योर, ते कालकेर प्रॉव्ह ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फिर्यादी फिरंगी—(पावती दुभाष्याच्या हातांत देत) सीं सिन्योर द प्राजईदाद कुश्त व्हिंती मिल्यान्स. द सिनाल की कुश्त इस्टाकी.

दुभाषी—(रामशास्त्र्यांना) पुरावा आहे. माल वीस लाखांचा होता, त्यावर भरलेल्या जकातीची ही पावती.

१ पंच—पुरावा आहे बाबा—आतां कठीण आहे.

२ पंच—त्यांत कसलं आलं आहे कठीण; विसाजीपंत कुठं आहेत? आणि त्यांना इथं आरोपी म्हणून आणावयाची कुणाची ताकद आहे?

रामशास्त्री—दप्तरदार, आरोपीच्या नांवाचा पुकारा करा.

दप्तरदार—माफी असावी. पेशवाई दौलतीचे मुख्य कारभारी सखाराम बापू यांनीं विसाजीपंतांना अभय दिलं आहे.

रामशास्त्री—तुम्हीं न्यायासनाचा हुकूम ऐकला नाहींत? आरोपीच्या नांवाचा पुकारा करा.

एकजण—(हळूच) ठिणगी तर उडाली बाबा!

दुसरा :—कसली ठिणगी—आतां कारभारी बापू आले कीं, विझून राख होईल सगळी!

(या वेळीं सखाराम बापू न्यायकचेरींत आले. रामशास्त्र्यांखेरीज सर्व लोकांनीं उठून नमस्कार केला.)

भालदार :—आस्ते कदम—निगाह रख्खो—महाराज पेशवा के दीवान सखाराम बापू की सवारी आती हैं। आस्ते कदम निगाह रख्खो।

(बापू आसनावर येऊन बसले व म्हणाले)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बापूः—शास्त्रीबुवा,

रामशास्त्रीः—न्यायासनाला उद्देशून बोलायचं असेल तर पद्धतीप्रमाणं प्रथम वंदन करा.

(सखाराम बापू निश्चयानें बसून राहतात)

रामशास्त्रीः—दप्तरदार, आरोपीच्या नांवाचा पुकारा करा, आणि तीनदां पुकारा करून आरोपी हजर झाला नाहीं, तर ढालाईत पाठवून त्याला जेरबंद करून आणा.

बापूः—(नाइलाजानें उठून नमस्कार करीत) शास्त्रीबुवा, वसईचे सुभेदार विसाजीपंत—खुद्द राज्यकर्त्यांचे जिवलग, त्यांना जेरबंदीचा हुकूम देतां—कसली धुंदी चढली आहे तुम्हांला ?

रामशास्त्रीः —हशम !

हशम :—खामोश, निगाह रख्खो—आरोपी विसाजीपंत हजर आहेत ?

(एवढ्यांत विसाजीपंत आले. त्यांना बघून फिरंगी चवताळून बोलूं लागले.)

फिरंगीः —सिन्योर अक्वल ये सुझेद !

हशम :—खामोश, निगाह रख्खो.

(विसाजीपंत येऊन सखारामबापूंजवळ बसले.)

दप्तरदार :—हेच आरोपी विसाजीपंत लेले; हजर आहेत.

रामशास्त्री :—विसाजीपंत, तुम्ही आरोपी आहांत; तुम्हांला बसतां येणार नाहीं.

(विसाजीपंत उभे राहतात.)

रामशास्त्री :—गलबतावरचा वीस लक्षांचा माल तुम्हीं लुटला, असा तुमच्यावर आरोप आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बापूः—लुटला ? पेशव्यांच्या सुभेदाराला तुम्ही काय चोर दरोडेखोर समजतां ?

रामशास्त्रीः—(किंचित् दरडावणीच्या सुरांत) न्यायाच्या कामांत ढवळाढवळ करण्याचा आपल्याला मुळींच अधिकार नाहीं. (सखारापबापू गप्प बसतात) विसाजीपंत, आरोप तुम्हांला मान्य आहे कीं नाहीं ?

विसाजीः—नाहीं. सुभेदार या नात्यानं मीं तो माल केवळ जप्त केला होता.

रामशास्त्रीः—अस्सं ! मग तो माल तुम्ही सरकारांत जमा केलाच असेल. बापू पेशवाईचे मुख्य कारभारी आहेत, त्यांच्या सहीची वीस लाखांची पावती आणा म्हणजे झालें.

(लोकांत चुळबूळ सुरू होते.)

रामशास्त्रीः—काय, आहे पावती ?

विसाजीः—याचं उत्तर मी देत नाहीं.

रामशास्त्रीः—ठीक आहे; गलबतावरचा माल वीस लक्षांचा होता, याबद्दल ही जकातीची पावती ! आहे तुम्हांला मान्य ?

विसाजीः—मला इथं कांहींच सांगायचं नाहीं.

रामशास्त्रीः—ठीक आहे; पंचमंडळी, ही पावती बघा, अस्सल आहे. बोला, आरोपी दोषी आहे कीं निर्दोषी ?

बापूः—शास्त्रीबुवा, नीट विचार करा. विसाजीपंतांचा दर्जा तुम्हांला माहीत आहे. पेशव्यांशीं असलेला त्यांचा संबंध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जगजाहीर आहे. म्हणजे हा खटला तुम्ही पंतांच्या विरुद्ध नव्हे तर खुद्द पेशव्यांच्या विरुद्ध चालवीत आहांत !

रामशास्त्रीः—बापू, विसाजीपंत सुभेदार असले तरी ते न्यायमंदिराच्या बाहेर. इथं न्यायासनासमोर ते आरोपी म्हणून उभे आहेत. त्यांचा दर्जा, तुमचा अधिकार, किंबहुना खुद्द राज्यकर्त्याची सत्ता यांपैकीं कुणाचीही पर्वा न्यायदेवतेला नाहीं, तिचा प्रतिनिधि असलेल्या या न्यायासनाला नाहीं किंवा पंचांनाही नाहीं.

पंचः—खरं आहे.

बापूः—या पंचांत पुण्यांतले प्रतिष्ठित आहेत. त्यांना पुण्यांत राहायचं आहे. एका परदेशी फिरंग्याच्या वतीनं राज्यांतल्या सुभेदाराविरुद्ध—

रामशास्त्रीः—बापू, माझ्या कचेरींत माझ्यासमोर पंचांवर दडपण आणूं पाहतां. न्यायाच्या इभ्रतीसाठीं तुम्ही इथं राहणं इष्ट नाहीं. मी तुम्हांला फर्मावतों, तुम्ही येथून निघून जा.

बापूः—आणि नाहीं गेलों तर ?

रामशास्त्रीः—न्यायासनाचा उपमर्द केल्याबद्दल तुम्हांला कडक शासन करावं लागेल.

(सखारामबापू तावातावानें निघून जातात.)

रामशास्त्रीः—(बापू गेल्यावर पंचांना उद्देशून) पंच मंडळी, न्यायाला स्मरून, ईश्वराला स्मरून, कुठल्याही सत्तेची तमा न धरतां सांगा, आरोपी दोषी कीं निर्दोषी ?

पंचः—दोषी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(प्रेक्षकांत खळबळ उडते.)

रामशास्त्री :—आरोपी विसाजीपंत, तुमच्यावरील आरोप पुराव्यानं सिद्ध झाला आहे. तुम्ही गुन्हेगार आहांत. तुमच्या या गुन्ह्याची शिक्षा म्हणून हुकूम करण्यांत येत आहे कीं, तुम्ही फिर्यादी फिरंग्यांना वीस लक्ष रुपये द्यावेत, आणि दीड लक्ष रुपये गुन्हेगारी म्हणून सरकारांत आदा करावी,

(लोक आनंदानें जयजयकार करतात)

अभ्यास

(अ) या धड्यांत फिर्यादी फिरंगी यांच्या तोंडचे शब्द अर्थातच पोर्च्युगीझ भाषेंतले आहेत. **सिन्योर**—साहेब. **सीं**—होय. **क्वालकेर**—कांहीं. **व्हिंती**—वीस. **मिल्यास**—लाख. **प्रॉव्ह**—पुरावा.

(आ) १ रामशास्त्र्यांच्या निःस्पृहतेच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यांनीं खुद्द राघोबादादा पेशव्यांच्या तोंडावर त्यांना 'देहांत प्रायश्चित्ता'—ची शिक्षा सुनावल्याची गोष्ट मराठ्यांच्या इतिहासांत कायमचें स्थान पटकावून बसली आहे. ती गोष्ट वाचून तुमच्या शब्दांत लिहून काढा.

२ या धड्यांत आलेल्या सखाराम बापू व विसाजीपंत सुभेदार यांची अधिक माहिती मिळवा.

३ 'निगाह' 'तशरीफ' 'जेरबंदी' 'दीवान' या शब्दांचे उगम व अर्थ सांगा.

४ कोणत्याही राज्यांतील न्यायखातें हें स्वतंत्र असून प्रसंगीं सरकारी अधिकाऱ्यांवरही वचक बसविणारें पाहिजे. भारताच्या स्वतंत्र लोकराज्याच्या घटनेंत ही तरतूद कशी केली आहे त्याची माहिती मिळवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३७ आधुनिक मनाचे श्लोक

परिचय

[श्री समर्थांचे मनाचे श्लोक प्रसिद्धच आहेत. त्यांत मनाला सन्मार्गानें जाण्याचा उपदेश केला आहे. इथें वृत्ताच्या व नांवाच्या बाबतींत श्री समर्थांचें अनुकरण आहे, पण उपदेशाच्या आवरणाखालीं हल्लीच्या ढोंगी लोकांवर हल्ला चढविला आहे !]

मना, सत्यसंकल्प सारा त्यजावा
स्वताचा बडेजाव लोकां कथावा !
धरावा मनीं पूर्ण विश्वास बाणा
नसे अन्य माझ्या परी तो शहाणा ! ॥ १ ॥

भले ज्यां दुजे बोलती त्यांसि निंदीं !
दुजे निंदिती त्यांसि साष्टांग वंदीं !
भले लोक जाती न तो मार्ग सेवीं !
प्रतिष्ठा तुझी वाटते जे रहावी ! ॥ २ ॥

मना, देवधर्मा तुवां ना भुलावें !
कथा कीर्तनीं ना कधीं तूं खुलावें !
परी जाय तेथें न संधी त्यजावी
बरी दांभिका भक्ति ती वागवावी ! ॥ ३ ॥

मना, आंत जातांच निर्खोनि पाहें
कुणाचें जुतें तें नवें छान आहे !
कथा रंगीं येतां हळू तूं उठावें !
जुत्याच्यासही यत्पलाये करावें ! ॥ ४ ॥

नको धाक घेऊं मना मालकाचा !
तुझा जीर्ण जोडा नको लोभ त्याचा !
मना, ठेव तेथें नको आणुं तोही
तया मालकाची बरी सोय पाहीं ! ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जरी सांपडे छत्रिही एक छान
पहावी तुवां आपुली सोय कां न ?
बरी खांकुटी मारुनी चालवावी !
तथा ना कुणाला कुशंकाहि यावी ! ॥ ६ ॥

नको मात्र चोरूं कुणाचीच काठी
जरी सांपडे तीच बैसेल पाठीं !
स्वतःचें नको साध्य व्हायासि घाता
बरें योजुनी सोड बापा अहंता ! ॥ ७ ॥

यदा राउळीं तूं प्रवेशोनि घेसी
प्रभूच्या पुढें दीर्घसा एक देशी
नमस्कार ठोकोनि नाकास घांस !
हळू गाल फोडीं नको घेउं त्रास ! ॥ ८ ॥

तसा ठेविं पैसा न तार्टीं कदाही !
मना, रीत ही आमुतें योग्य नाहीं
किती देव मोठा अम्हीं काय द्यावें ?
तयाचेंच कांहीं मिळे तैं पहावें ! ॥ ९ ॥

'स्वयंसेवक', गोवा

अभ्यास

(अ) **सत्यसंकल्प**—चांगले बेत, चांगल्या योजना. **बाणा**—अभिमान, शेखी. **दांभिक**—ढोंगीपणाची (दंभ—ढोंग + इक) **जुतें**—पायतण. **यत्पलाये**—पळून जाणें. ('यःपलायते' या संस्कृत शब्दापासून) **राऊळ**—देऊळ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(आ) १ यांत वर्णिलेल्या गोष्टी करणारे लोक ठिकठिकाणीं आढळतात. इथें फक्त त्यांच्या मनांतले खोल विचार कवीनें धीटपणानें व्यक्त केले आहेत. आपली वागणूक अर्थातच इथें वर्णन केलें आहे त्याच्या उलट असावयास पाहिजे.

२ श्री. प्र. के. अत्रे यांनीं आपल्या 'झेंडूच्या फुलां'त असलेच कांहीं श्लोक दिले आहेत ते मिळवून वाचा.

३ देवालाही 'बनविण्या' साठीं इथें कोणता कोटिक्रम योजला आहे ?

४ 'सोन्याच्या कुंची'ची गोष्ट शिक्षकांना विचारा.

---

३८ व्यसन

परिचय

लेखक श्री. ना. म. तान्हानकर हे कवि, लघुकथालेखक, नाटककार इत्यादि नात्यांनीं महाराष्ट्र वाङ्मयांत मोलाची भर घालणारे गृहस्थ सरकारी रेव्हिन्यु खात्यांत नोकर आहेत. सरकारी नोकरी सांभाळून साहित्यसेवा करणाऱ्या वाङ्मयभक्तांत त्यांचा क्रमांक बराच वरचा असून 'सह्याद्रि', 'किर्लोस्कर', 'किरात' इत्यादि नियत कालिकांत त्यांचे लेख वारंवार प्रसिद्ध होत असतात. आपल्या लोकांतील दुर्गुण नाहींसे होऊन गुणांची वाढ व्हावी आणि आपलें राष्ट्र या गुणांच्या जोरावर उत्कर्षाला चढावें असा हेतु बहुधा त्यांच्या प्रत्येक लेखांत दिसून येतो. 'कलेसाठीं कला' कीं 'जीवनासाठीं कला' या वादांत त्यांचा कल दुसऱ्या मताकडे असलेला दिसतो.

[एक दारुड्या आणि दुसरा गांजेकस यांची आपापलें व्यसन झांकून ठेवण्याच्या पायीं एकदां कशी गंमत उडाली हें पुढील कथेंत पाहावयास मिळेल.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोज भस्माचे पट्टे लावणारे अण्णासाहेब व कडकडीत नैष्ठिक वैष्णव म्हणून प्रसिद्धि पावलेले भाऊसाहेब अशा रीतीनें समोरासमोर येतील असें कुणाच्या स्वप्नांतसुद्धां आलें नसेल.

दोघेही जिवश्च कंठश्च स्नेही म्हणून गाजत होते; पण दोघांचीही व्यसनें एकमेकांना अज्ञात होतीं. धर्म हा त्यांचा बोलण्याचा विषय, मनःसंयम पाहिजे हेंच दोघांचें ठाम मत आणि इतकें असून दोघेही व्यसनी !

व्यसन—पण त्यांतही त्यांनीं संयम राखला होता. अण्णासाहेब अंथरुणाला पाठ लावतांनाच दारूचा शिसा रिकामा करीत आणि भाऊसाहेबांची घरांतील मंडळी झोपीं गेल्यावर गांजा मळायला सुरवात होई. उगवत्या सूर्याला त्यांच्या व्यसनाचा मागमूसहि नव्हता. कारण ऐन पहांटेस दोघेही स्नान करून आपल्या कुलदैवतांच्या पूजेंत गर्क होत !

आपलें व्यसन कुणालाही न कळावें यासाठीं शक्य ती खबरदारी ते घेत होते. अण्णासाहेबांचे दारूचे शिसे अगर भाऊसाहेबांचा गांजा त्यांच्या घरांत शिरतांना कधींच कुणाला दिसला नव्हता, आणि दिसला असला तरी अशा आचरणवंताबद्दल कोण भलतीच शंका घेईल ?

पण पाण्यांत पडलेला मुडदा कधींतरी वर आल्याशिवाय राहत नाहीं म्हणतात——

त्या दिवशीं अण्णासाहेबांची मनःस्थिति अत्यंत बेचैन झाली होती. कोर्टांत विरुद्ध बाजूच्या वकिलानें केस जिंकली होती आणि घरीं येतात तों सायंकाळच्या मेलची एक दोन पत्रें वाचून तर त्यांची परिस्थिति खुळ्यासारखीच झाली !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरांत जेवायला नको म्हणून सांगून ते एकदम निद्रागृहांतील कपाट खोलण्यास गेले. तेथें पाहतात तों त्यांच्या साऱ्या बाटल्या रिकाम्याच होत्या. आजपर्यंतचा कधींहि न टळणारा नियम चुकणार होता. मुंबईच्या एजंटानें कांहीं तरी घोटाळा केला खास.

हळूहळू म्यनिसिपालिटीनें आपले रात्रदर्शक दिवे लावले. अण्णासाहेबांनीं अंथरुणावर झोंपण्यासाठीं शिकस्त करून पाहिली, पण त्यांना झोंप प्रसन्न होईना. दारूचा नैवेद्य पाहिजे होता तिला ! जीभ सुकल्याचा त्यांना भास होऊं लागला. त्यांचें डोकें फारच दुखूं लागलें. व्यसन उघडें तर होतां नये, आणि दारू तर प्यालीच पाहिजे; त्यांच्या डोक्यांत विचार आला. घरीं औषधासाठीं म्हणून बाटली खरेदी करावी आणि—

अतिशय आनंद झाला एकदम त्यांना ! पण लगेच हृदयाच्या एका कोपऱ्यांतून भीतीचें वादळही उठण्याचा संभव दिसूं लागला. त्यांनीं सर्व बाजूंनीं विचार करून बाटली घरीं न आणण्याचें ठरविलें.

ते उठले, जरा निराळा पोषाख करून डोळ्यांना चष्मा लावून गांवाबाहेच्या पारशाच्या दुकानाशीं जाऊन त्यांनीं बाटली खरेदी केली व वाटेंत गांवाबाहेरच मारुतीच्या देवळांत सामसूम पाहून ती रिकामी केली. बाटली जवळच्या तळ्यांत फेकून स्वारी घरीं निघाली. आतां झोंप घाई करील असें वाटल्यावरून त्यांनीं पाऊल झपाझप टाकण्यास सुरुवात केली.

वारा सुटला होता. थंडी पण मी म्हणत होती. अण्णासाहेबांचें डोकें पण तारवटल्यासारखें झालें होतें, तरी ते रस्ता कापीत होते; तोंच समोरून मोटारचा लाईट आला. मोटार बघतांच आपलें बिंग उजेडांत येणार म्हणून अण्णासाहेब फारच भ्याले. त्यांचे पाय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लटपटूं लागले. ते रस्त्याच्या अगदीं बाजूला झाले. मोटार भुर्कन् निघून गेली. पण त्याच वेळीं मोटार अंगावर आल्याच्या काल्पनिक भ्रमानें अण्णासाहेब बाजूला होऊं लागले व धाडकन् गटारांत पडले!

पिसाटपुरचीं गटारें आधींच घाणीविषयीं प्रसिद्ध आणि त्यांतही दिवस पावसाळ्याचे. जागोजागीं पाण्याचीं डबकीं सांचलीं होतीं. आणि त्यांत वर्षाची सारी घाण तरंगत होती. अण्णासाहेब पडले तिथेंसुद्धां जवळ जवळ कंबरभर पाणी होतें. आंत घाण व वर डांस घोंघावत होते. अण्णासाहेब पडले व घाणींत मढले. त्यांना वरेंच लागलेंहि होतें; पण चोरटेपणामुळें व थोड्या फार निशेमुळें त्यांना कांहींच बोलतां येत नव्हतें.

ते रस्त्यावर आले त्यावेळीं त्यांना खास त्यांच्या बायकोनेंसुद्धां ओळखलें नसतें असें स्वरूप प्राप्त झालें होतें! अद्याप त्यांची निशा साफ गेली नव्हती. गांवाला सुरुवात झाली होती.

* * *

ऐन बाराचा सुमार होता तो. भाऊसाहेब गांजा पिऊन तर्र झाले होते. त्यांना आपल्या दाराशीं कोणी तरी घाणेरडा चोर उभा असावा असा संशय आला. ते बसले होते तेथून दरवाजाच्या फटींतून त्यांना त्याची हालचाल दिसत होती; चोर घरांत शिरण्याचा प्रयत्न करतो आहे असें वाटतांच ते एकदम उठले व दार उघडून त्यांनीं त्यांच्या थाड थाड थाड तीन मुस्कुटांत ठेवून दिल्या! भाऊसाहेबांसारख्या उमद्या पुरुषानें ऐन तारेंत असतांना व घरचा मालक चोरांना मारतो या ऐटींत थोबाडींत मारल्या होत्या त्या! त्यांच्या हातांतील आंगठ्या इतक्या जोरानें चोराच्या गालावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागल्या कीं तेथें फुटून त्यांतून रक्त वाहूं लागलें व तो कोलमडून खालीं पडला !

पण त्या क्षणीं दोघांचीहि निशा उतरली ! भाऊसाहेब घरांत धावले व त्यांनीं पाणी आणून तें चोराच्या डोळ्यांस लावून डोक्यावर शिंपडण्यास सुरवात केली.

फट् म्हणतां ब्रह्महत्या होऊन आपण कायद्याच्या कचाट्यांत सांपडतों कीं काय असें भाऊसाहेबांना वाटलें. हळूहळू चोरानें डोळे उघडले. दोघांनीं एकमेकांकडे पाहिलें व ओळख पटल्यामुळें आश्चर्याचा अतिरेक होऊन दोघांनाही आकाशांतून लोटून दिलेल्या त्रिशंकूप्रमाणें हवेंत अधांत्री लोंबकळल्याचा भास होऊं लागला !

'अण्णासाहेब, अरे, काय माझ्या हातून घडलें हें ! इतक्या रात्रीं माझ्याकडे अशा वेशांत तूं येशील असें माझ्या स्वप्नींहि आलें नसतें ! अरे, असा गटारांत कधीं पडलास आणि त्यावर तुला मारून मी आणखी दुःख दिलं. चल, आंत चल' भाऊसाहेब कळवळून म्हणत होते.

गांजाच्या तारेंत आपण चोर पकडायला गेलों आणि वाघाची शिकार करायला जाऊन घरच्या गाईला गोळी घालावी तसें जानी दोस्त अण्णासाहेबांच्याच श्रीमुखांत ठेवून दिल्या, याबद्दल त्यांना राहून राहून वाईट वाटत होतें. इतक्या दिवसांचा जुना दोस्त अण्णासाहेब रात्रीं खास कांहीं कामासाठीं आपणाकडे येत असतां वाटेंत अडखळून पडला असेल किंवा अडखळून पडून चिखलांत बरबटलेल्यामुळें आपल्या घरीं मदतीच्या अपेक्षेनें आला असेल आणि आपण त्याच्या संकटाची कल्पना न घेतां गांजाच्या अंमलांत त्याला पाणी प्यायला लावलें, यापेक्षां कमीपणाची गोष्ट उरली कोठें, हेच विचार भाऊसाहेब करीत होते !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—आणि अण्णासाहेब आपल्या व्यसनाबद्दल परमेश्वरानें आपणास आपल्या मित्राकरवीं हें योग्य शासन दिलें असें समजत होते. इतकें झालें तरी दोघांनाही आपापल्या अपराधांचीं मूळ कारणें कळलीं नाहींत. दोघांनींहि चार बाता देऊन एकमेकांचें समाधान केलें. अण्णासाहेब 'झोंप येईना म्हणून फिरायला निघालों, वाटेंत मोटारच्या भीतीनें बाजूला झालों व अडखळून गटारांत पडलों' एवढें साधारण खरें बोलले; पण पुढें जें त्यांनीं आपल्या मित्राकडे आपण कपडे बदलण्यासाठीं आलों म्हणून सांगितलें तें तितकें खरें नव्हतें. भाऊसाहेबांचे घरांत ते आपलें घर म्हणून समजूनच शिरत होते! अशा परिस्थितींत ते भाऊसाहेबांकडे कधींच पुऱ्या शुद्धीवर असते तर गेले नसते. भाऊसाहेबांनीं आपली चोराची कल्पना सांगून टाकली; व ती थोडी फार खरीही होती. पण गांजाच्या तारेंत नसते तर चौकशी न करतां ते एकदम आंगावर घुसले नसते, एवढेंच नव्हे तर चोरभयानें थोडेसे विचारांत पडले असते ही गोष्ट अगदीं सत्य आहे!

दोघांही मित्रांनीं आपलें व्यसन आजपर्यंत लपवलें होतें व या वेळींहि तें उघडें झालें नाहीं आणि त्याचा परिणाम त्यांच्या अब्रूचें कांचेचें भांडें तडकलें नाहीं! व्यसन उघडें झालें असतें तर कदाचित् ते निर्लज्जही झाले असते; पण या वेळीं त्यांनीं आपापल्या व्यसनांना मूठमाती देण्याचा मनांत निश्चय केला.

आणि दुसऱ्या दिवसापासून—

दोघांनींही व्यसनाची वेळ संपून जाईपर्यंत आपआपल्या कुल-देवतांपुढें भजन सुरू ठेवण्याचा क्रम सुरू केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'साधू साधू' म्हणून सारें जग त्यांना आज ओळखीत आहे. पण आपल्या गटारांतील गाडलेली घाण रस्त्यावर उघडी करण्याच्या हेतूनें कोणी बुवाबाजीविध्वंसक शास्त्री स्वतःचा मोठेपणा वाढविण्यासाठीं आपणांवर चाल करून येईल कीं काय अशी भीति त्या उभयतांच्या अतःकरणांत अद्याप ठाणें धरून आहे !

अभ्यास

(अ) १ या धड्यांत ज्या पिसाटपुरचें वर्णन आलें आहे तसलीं 'पुरें' महाराष्ट्रांत थोडीथोडकीं नाहींत. त्यांची आरोग्यविषयक सुधारणा होण्यासाठीं तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?

२ 'नैष्ठिक' 'निशा' 'मूठमाती देणें' 'बुवाबाजी' यांचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग करून दाखवा.

३ या धड्यांत आलेल्या म्हणी एकाखालीं एक मांडून त्यांचा अर्थ सांगा.

४ 'दारूपासून होणारे अनर्थ' या विषयावर एक १५ ओळींचा परिच्छेद लिहा.

---

३९ दारुड्याचें जीवन

परिचय

व्यसन म्हटलें कीं तें कसलेंही असो; वाईटच. पण त्यांतल्या त्यांत दारूचें व्यसन महाभयंकर होय. या व्यसनापायीं कैक कुटुंबें धुळीस मिळालीं आहेत. सुदैवानें आपल्याकडे हें व्यसन पुरुषांपुरतेंच मर्यादित होतें. आतां सरकारनें कायद्यानें त्याचें उच्चाटन करण्याचें ठरविलें आहे. पण कायद्यापेक्षां लोकमतांत बदल घडवून आणल्यानेंच ही दारूबंदी चिरस्थायी होईल याचीही सरकारला जाणीव आहे. म्हणून सरकारनें एक दारूबंदी समिति नेमून तिच्यामार्फत प्रचारकार्यही चालविलें आहे. डॉ. रामभाऊ भोगे यांनीं या कार्यासाठीं कांहीं काव्यें लिहिलीं आहेत, त्यांतला हा एक लहानसा भाग आहे.

[भावाच्या संसाराची दारूमुळें होत असलेली धूळधाण पाहून प्रेमळ बहिणीचें मन गहिंवरून येतें; आणि पहाटेच्या प्रहरीं दळतांना ती आपलें सारें मनोगत ओव्यांतून उघड करीत असते. स्त्री-जीवनाचे पडसाद त्यांच्या ओव्यांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिबिंबित होत असतात. प्रस्तुत ओव्यांतून एका भगिनीचें हृदय आपणांस पाहावयास मिळेल.]

(चाल : ओव्या)

सखे मांडिलें दळण । दळूबाई दळूं आतां ॥
जीवनाची गाऊं गाथा । दळतांना ॥ १ ॥

माझा ग भाऊराया । आहे एकुलता एक ॥
दिसण्यांत तो सुरेख । आहे बाई ॥ २ ॥

काय वर्णू त्याची कांती । दांत जैसे शुभ्र मोती ॥
नयन तारे चकाकती । गगनीं जेवीं ॥ ३ ॥

शेतीभाती होती सारी । भाऊरायाच्या संसारीं ॥
दारूमुळें गेली सारी । कर्जापायीं ॥ ४ ॥

पोटासाठीं गिरणींत । करूं लागला चाकरी ॥
पाणी रक्ताचें तो करी । रात्रंदिन ॥ ५ ॥

घर घर गिरणीची । माती झाली शरीराची ॥
संवय जडली दारूची । नाश होई ॥ ६ ॥

पगाराचा पैसा सारा । जातो कलालाच्या घरीं ॥
नाद दारूचा हा भारी । भाईराया ॥ ७ ॥

भाईरायाचा संसार । दारूपायीं वायां गेला ॥
दिवसाढवळ्या घाला पडला । व्यसनापायीं ॥ ८ ॥

नको जाऊं भाऊराया । ताडी माडी पिण्यासाठीं ॥
घरीं उरला ना पैका । बालकांच्या दुधासाठीं ॥ ९ ॥

घड नाहीं घडुत्याला । वहिनीच्या रे अंगाला ॥
हिंवाळ्यांत ओढण्याला । नाहीं कांहीं ॥ १० ॥

नव्या नवसाचा बाळ । बाळ तुझा विश्वनाथ ॥
आज झालासे अनाथ । दारूपायीं ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भांडीं कुंडीं गेलीं सारीं । कर्जापायीं लिलावांत ॥
आतां दुपारची भ्रांत । पडली असे ॥ १२ ॥
आली बाटली घरांत । लक्ष्मी चालली रस्त्यांत ॥
अब्रू मिळाली मातींत । बाटलीनें ॥ १३ ॥
पोराबाळांना उपवास । घरीं सदा वनवास ॥
दारूबाजीचा तो त्रास । वर्णू किती ॥ १४ ॥

अभ्यास

१ यांत दारूपायीं एकाद्या मूळच्या सुखी कुटुंबाची कशी वाताहात होते याची करुणकहाणी वर्णिली आहे. घरची शेतीभाती असून ती नष्ट झाल्यामुळें पोटासाठीं गिरणींत रावणारे कितीतरी लोक तुम्हांला आढळतील. अशा एकाद्याच्या गृहस्थितीचें निरीक्षण करून ती तुमच्या शब्दांत आपल्या एकाद्या मित्राला लिहून कळवा.

२ 'नव्या नवसाचा बाळ,' 'लक्ष्मी रस्त्यांत चालली' यांचे अर्थ स्पष्ट करा.

नंदिनीचा प्रकोप !

परिचय

[एकदां विश्वामित्र राजा वसिष्ठ ऋषींच्या आश्रमास गेला असतां तेथें त्यानें कामधेनूची मुलगी नंदिनी पाहिली. इष्टवस्तु उत्पन्न करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे असें पाहून तो ती गाय वसिष्ठांजवळ मागूं लागला. वसिष्ठ ऋषींनीं आम्हां आश्रमवासीयांना नंदिनीचा किती उपयोग आहे, हें परोपरीनें समजून सांगितलें. पण विश्वामित्र आपला हट्ट सोडीना. ह्या प्रसंगावर हा नाट्यरूप संवाद आहे.]

[**स्थळ**–वसिष्ठ ऋषींचा आश्रम. वसिष्ठ ध्यानस्थ बसले आहेत. अशा स्थितींत विश्वामित्र राजा तेथें येतो. इतक्यांत ऋषि डोळे उघडतात. विश्वामित्र त्यांच्या दृष्टीस पडतो.]

विश्वामित्र :— ऋषिवर्यांस वंदन करितों.

वसिष्ठ :—राजा, तुझें कल्याण असो. तुझें कुशल आहे ना ? ह्या वेळीं तूं इकडे कसा आलास ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विश्वामित्र :—भगवन्, आपल्या कृपेनें माझें कुशल आहे. मृगयेच्या निमित्तानें अरण्यांत आलों होतों. मृगयेच्या नादांत वेळाचें भान राहिलें नाहीं. सायंकाळ झाला म्हणून आपल्या आश्रमाचें व आपलें पवित्र दर्शन घ्यावें असें योजिलें.

वसिष्ठः :—वा ! फार उत्तम गोष्ट केलीस. अतिथीचें-राजाचें आतिथ्य करणें; हें आम्हां गृहस्थाश्रम्यांचें एक प्रमुख कर्तव्यच आहे. तुझ्या आगमनानें मला फार आनंद होत आहे.

विश्वामित्र :—भगवानांनीं कोणताहि त्रास घेऊं नये. मी एकटाच नाहीं. मजबरोबर अमात्य, सेनापति व थोडें सैन्यहि आहे. विश्रांतीस निवाऱ्याची जागा मिळाली हें पुष्कळ आहे.

वसिष्ठ :—राजा, थकून भागून आलेल्या अतिथींची सेवा जर येथें झाली नाहीं तर आश्रमानें आपला धर्म पाळला नाहीं असें होईल. इतक्या माणसांची व्यवस्था कशी होईल ही चिंता नको. हे शिष्य आपली सर्वांची व्यवस्था ठेवतील.

शिष्यः—(पुढें होऊन) महाराज, चलावें. आपल्यासाठीं पर्णकुटी सिद्ध केली आहे.

× × × ×

(स्थळ—एक पर्णकुटी, विश्वामित्र व त्यांचा अमात्य बसले आहेत.)

विश्वामित्र :—अमात्य, पाहिलंत ना रात्रीच्या भोजनाचा थाट ! आमच्या राजवाड्यांतही इतक्या लौकर एवढ्या माणसांची व्यवस्था अशा उत्तम रीतीनें आम्हांला करतां आली नसती. या अरण्यांत वास करणाऱ्या ऋषींच्या घरीं ही साधनसंपत्ति कोठून व कशी बरं आली ?

अमात्य :—महाराज, मीही आश्चर्यमूढ झालों. म्हणून ऋषिकुमारांजवळ चौकशी केली. तेव्हां यांतलें मर्म समजलें. ऋषिवर्यांपाशीं सुरधेनु नंदिनी आहे. तिच्या सामर्थ्यामुळें हा सर्व पाहुणचार झाला !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणींही अतिथि येवो त्याचें आदरातिथ्य असेंच होतें, हें विशेष आहे. वसिष्ठ ऋषि धन्य होत !

विश्वामित्र :—(आश्चर्यानें व असूयेनें) काय ? नंदिनीचें एवढें सामर्थ्य ! व त्यामुळें हे धन्यवाद घेतात ! ठीक. आम्हांला लाजविणारें हें वैभव ह्या रानांत काय कामाचें ? तें आमच्या राजवाड्यांत नेलें पाहिजे.

अमात्य :—महाराज, क्षमा असावी. पण अशी गोष्ट मनांत येऊं नये असें वाटतें. ह्या आश्रमांत कितीतरी विद्यार्थी विद्यार्जन करीत आहेत, कितीतरी ऋषींचीं कुटुंबें येथें आहेत; आपल्यासारखे अतिथि येतच आहेत. शिवाय अनाथ, अपंग इत्यादींनाही येथें आश्रय मिळत असतो असं समजतें. तेव्हां आपल्या आतांच्या इच्छेमुळें ह्या सर्व गोष्टींना उणेपणा आणल्यासारखें होणार आहे म्हणून....

विश्वामित्र :—(कठोरपणें) नाहीं ! माझी इच्छा सफल झालीच पाहिजे ! ही नंदिनी आमच्या गो-शाळेंत आज गेलीच पाहिजे ! तुम्ही ऋषिवर्यांस सांगून ती घेऊन चला.

अमात्य :—महाराज, आपणांस पुनः नम्रपणें विनंति आहे कीं आपल्यापेक्षां ऋषिवर्यांनाच नंदिनीची.....

विश्वामित्र—(मध्येंच) नाहीं. मीच जाऊन ऋषींना विचारतों—मनांत आलें आणि तें झालें नाहीं तर मी विश्वामित्र राजा कसला ?

× × × ×

(वसिष्ठ प्रातःस्मरण करताहेत तोंच विश्वामित्र तेथें येतो.)

विश्वामित्र :—भगवन्, रात्री आमचें आदरातिथ्य फारच उत्तम प्रकारें झालें. पारिजाताला येथील कुड्यानें लाजविलें !

वसिष्ठ :—राजा, गृहस्थाश्रम धर्माचें पालन मीं केलें. ह्यांत मीं अधिक तें काय केलें ? तुझ्या राज्यांत आश्रमधर्म सुखानें पाळतां येतो याचें श्रेय तुलाच आहे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विश्वामित्रः—भगवन्, आपली नंदिनी आपण मला द्यावी अशी माझी इच्छा आहे.

वसिष्ठः—राजा, जिच्यामुळें माझा आश्रमधर्म यथासांग पार पडतो ती धेनु मला कशी देतां येईल ?

विश्वामित्र—भगवन्, माझी इच्छा पूर्ण झाली पाहिजे. आपण म्हणाल तितकें द्रव्य मी आपल्याला देतों.

वसिष्ठ—राजा ब्राह्मणाला गोविक्रय करितां येत नाहीं हें तुला काय ठाऊक नाहीं ? द्रव्य आम्हांला, तपस्व्यांना मृत्तिकेसमान आहे ! तेव्हां.....

विश्वामित्र—आपणाला मी दहा हजार गाईच देतों. मग तर झालें.

वसिष्ठः—राजा, हा विनिमय मला करतां येत नाहीं ! माझ्या विद्यार्थ्यांना विद्याभ्यास करावयाचा आहे. इतक्या गाई.....

विश्वामित्रः—(जरा कठोरपणानें) ऋषिवर्य, माझें सगळें राज्य मी आपल्यास देतों पण नंदिनी नेण्याची माझी मनीषा सिद्धिला जायलाच हवी.

वसिष्ठ :—नृपा, असल्या मोहाला का मी बळी पडूं ? अरे, आम्हां तपस्व्यांना राज्य रे काय करायचें ? राज्य करणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. अध्ययन व अध्यापन हेंच ... .

विश्वामित्र :—(क्रोधानें लाल होऊन) वसिष्ठ ! ह्या सम्राट विश्वामित्राची इच्छा म्हणजे ती आज्ञाच आहे हें अजून आपल्या लक्षांत येत नाहीं काय ? आपल्यासारख्या पूज्य व्यक्तीचा अपमान होऊं नये म्हणून मी विनय सोडला नव्हता. पण आपण कोणताच पर्याय मान्य करीत नाहीं. मी फिरून एकवार सांगतों कीं, नंदिनी माझी झालीच पाहिजे. माझ्या सामर्थ्याची कसोटी आपण पाहूं नये हें बरें !

वसिष्ठ :—(अगदीं शांतपणें.) राजा तुझा आपल्या क्षात्र सामर्थ्यावर इतका विश्वास आहे, ठीकच आहे. तूं त्याचा उपयोग सुखेनैव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करूं शकतोस ! माझी तपस्या हेंच माझें बल; शांति हीच माझी शक्ति; क्षमा हेंच माझें शस्त्र; तूं कांहींही कर मला तुझी अयोग्य इच्छा पूर्ण करितां येत नाहीं.

विश्वामित्र :—ठीक आहे ! मीच माझी इच्छा पूर्ण करतों. (अमात्याकडे वळून) अमात्य, सैनिकांकरवीं त्या नंदिनीला घेऊन चला.

(सैनिक नंदिनीला ओढून नेत आहेत. ती ओढ घेत आहे. ते तिला चाबूक मारतात. ती दावें तोडून धावते व वसिष्ठऋषीपुढें येऊन म्हणते—)

नंदिनी :—भगवन्, माझा त्याग कां बरें करतां ? मला राजाकडे कां पाठवितां ? माझ्या पाडसाची व माझी ताटातूट कां हो करितां ? मला चाबकाचे फटकारे बसताहेत हे आपणांला पाहवतात का ?

वसिष्ठ : माते, शांत हो. मी तुझा त्याग कसा बरें करीन ? तुझ्या अंगावरचे वळ माझ्या अंगावर उठताहेत. राजाची समजूत मीं पुष्कळ केली पण त्याला शक्तीचा व सत्तेचा मद चढला आहे ! मी पडलों ब्राह्मण. क्षमा हेंच माझें शस्त्र. माझ्या मनोरूप दरींत विवेकरूपी सिंह जागता पहारा करीत आहे, त्यामुळें मला राजाचें शासन करितां येत नाहीं. तूं हें सर्व जाणतेस. तुला रुचेल तें तूं करावेंस. अधिक काय सांगूं ?

नंदिनी :—गुरो, आतां सारें समजलें. तुमची इच्छा नसतांना काळही मला नेऊं शकत नाहीं. मग ह्या राजाची काय कथा ! ब्राह्मतेज काय चीज आहे, हें मीच आतां दाखविंतें.

(नंदिनी अंग झाडते व निरनिराळ्या प्रकारचें सैन्य उत्पन्न करिते. तें सैन्य विश्वामित्राच्या सैन्याची दाणादाण करून त्यांना पळतां भुई थोडी करिते. विश्वामित्र स्तंभित व लज्जित होतो. त्याच्या तोंडून उद्गार निघतात. 'धिग् बलं क्षत्रिय बलम् ब्रह्मतेजो बलं बलम्').

वसिष्ठ :—(अश्रुपूर्ण नेत्रांनीं) माते, मजसाठीं तुला फार कष्ट पडले. क्षमा कर. (तिच्या अंगावरून हात फिरवतात !)

(सर्व आश्रमांत आनंदीआनंद होतो.)

—सदाशिव रामकृष्ण नारगोलकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar